म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

संग्रहालय क्रमांक
९८
८६१२

लेखक पदमजी बाबा

सन
१८७५

पुस्तकाचें नांव लाभालाभ

९८

सं. क्र ४६२

लाभालाभ

निबंध

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४५२
सन-१८९९

# लाभालाभ.

# INDIA HINDU,

AND

# INDIA CHRISTIAN:

OR

## WHAT HINDUISM HAS DONE FOR INDIA,

AND

## WHAT CHRISTIANITY WOULD DO FOR IT.

AN APPEAL TO THOUGHTFUL HINDUS.

TRANSLATED BY

REV. BABA PADMANJI.

मुंबईमध्यें

विक्टोरिया प्रिंटिंग वर्क्स छापखान्यांत छापिला.

१८९५.

*Price two Annas.* किंमत दोन आणे.

1मे. १२९

# लाभालाभ;

म्हणजे

## ब्राह्मणधर्मानें हिंदुस्थानाकरितां काय केलें

आणि

## ख्रिस्ती धर्म त्याकरितां काय करील.

(विचारशील हिंदूंस विनंती.)

---

"तुह्मी त्यांच्या फळांवरून त्यांस ओळखाल."

**ख्रिस्ती शास्त्र.**

"जें सत्य नव्हें तें स्वदेशप्रीतियुक्त असूं शकत नाहीं."

**राजा सर माधवराव.**

"जो रोग तुझ्यासंगतीं जन्मला आहे, तो तुझा नाश करील; डोंगरांतील जें औषध तुझ्यासंगतीं जन्मलें नाहीं, तें तो रोग बरें करील."

**एक हिंदु कवि.**

---

THE CHRISTIAN LITERATURE SOCIETY.

12 *mo.* 1st *Edition.* 1,000 *Copies.*

---

SOLD AT THE DEPÔT OF THE BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.

---

BOMBAY:

PRINTED AT THE VICTORIA PRINTING WORKS.

1894.

---

*Price two Annas.*

किंमत दोन आणे.

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

उपोद्घात. .... .... .... .... ३

भाग पहिला.

ब्राह्मणधर्मी हिंदुस्थान. .... .... .... १८

हिंदुधर्माचीं फळें. .... .... .... .... १८

१. रोगी प्रकृति व अल्पायुष्य. .... .... १८

२. दारिद्य..... .... .... .... .... २२

३. राष्ट्रीय अज्ञान. .... .... .... .... २७

४. बुद्धीची दुर्बलता. .... .... .... २९

५. राज्यप्रकरणीं अपकारक परिणाम. .... ३२

६. अनिर्बंधक राज्य व परमतासहन. .... .... ३२

७. जात. .... .... .... .... .... ३६

८. स्त्रियांचा मानभंग व त्यांची क्रूर वागणूक. ४४

९. मनुष्यास पशुसमान केलें आहे. .... ५१

१०. अनेक देवमत. .... .... .... ५२

११. पशुभक्ति. .... .... .... .... ५७

१२. मूर्तिपूजा. .... .... .... .... ६०

१३. अद्वैतमत. .... .... .... .... ६२

१४. ईश्वराविषयीं नीच कल्पना. .... .... ६५

१५. लूट, खून व नरयज्ञ हीं करण्याविषयीं धर्माची मंजुरी. .... .... .... .... .... ६९
१६. नीति, अनीति, पापपुण्य, धर्मअधर्म, यांच्यांतील जो अनादिसिद्ध भेद तो नाकारणें. .... ७०
१७. पापक्षमेचे निरर्थक उपाय. .... .... ७३
१८. धर्माचरणास सहाय होत नाहीं. .... ७६
१९. वृथा भयांनीं जन्मवर व्याकुल असणें. .... ७९
२०. मरणसमयींची निराशा किंवा खोटी आशा. ८३
२१. सकल विश्वाच्या हक्कदार धन्याविरुद्ध बंडाळी. ८८
२२. देव दुर्बल आहेत हें हिंदुस्थानाच्या स्थितिवरून दिसून येतें. .... .... .... .... ९१
२३. हिंदुधर्माविषयीं अभिमान. .... .... ९२
२४. हिंदुधर्म सुधारण्याजागा नाहीं. .... .... ९६

---

भाग दुसरा.

**ख्रिस्ती धर्मी हिंदुस्थान** .... .... .... ९९
उपोद्घात. .... .... .... .... ९९
**ख्रिस्ती धर्मापासून होणारे लाभ.** .... .... १०
१. अधिक चांगलें आरोग्य आणि दीर्घायुष्य १०
२. संपत्तीची वृद्धि होईल. .... .... .... १०
३. सत्य ज्ञानाचा प्रसार होईल. .... .... १०

४. बुद्धिबल प्राप्त होईल. .... .... .... १०९
५. राष्ट्रांची उन्नति होईल. .... .... .... ११०
६. जनव्यवहारिक व धर्मसंबंधी स्वातंत्र्य भोगायास मिळेल. .... .... .... .... १११
७. मनुष्याचें बंधुत्व कबूल केलें जाईल. .... ११२
८. मनुष्यामनुष्यांमध्यें न्यायाची वृद्धि होईल. .... ११३
९. प्रत्येक मनुष्यास आपली स्वतंत्रता भोगण्यास मिळेल, आणि सामाजिक सुधारणेचे अडथळे दूर होतील. .... .... .... .... ११४
१०. मनुष्यजातीचें दुःख कमी होईल व सुख वाढेल. ११६
११. स्त्रियांस योग्य पदावर बसवावें. .... .... ११८
१२. मनुष्य पशुसारिखा नीच मानला जाणार नाहीं. १२२
१३. पशुभक्ति आणि मूर्त्तिपूजा यांचा लय होईल. १२२
१४. एकच जो खरा देव त्याचीच भक्ति मात्र लोक करितील. .... .... .... .... १२५
१५. सुवंद्य असा देव प्राप्त होईल. .... .... १२६
१६. बरें व वाईट ह्यांचा जो अनादि भेद आहे तो ओळखिला जाईल. .... .... .... १३०
१७. पापाची खरी क्षमा मिळेल. .... .... १३०
१८. पवित्राचरणाची वृद्धि होईल. .... .... १३५
१९. जन्मांतील वृथा भयांपासून मुक्त होणें. .... १३८
२०. ख्रिस्ती धर्म हा आशेचा धर्म आहे. .... १४१
२१. खरे ख्रिस्ती जगताच्या प्रभूचे दत्तपुत्र आहेत. १४४

२२. ख्रिस्ती धर्म अझून सर्व जगांत पसरेल. .... १४७
२३. ख्रिस्ती धर्माविषयीं साक्षी. .... .... १५५
२४. उपसंहार. .... .... .... .... १५८
एक राष्ट्रीय धर्म. .... .... .... .... ... १५९
हिंदुस्थानचा भावी धर्म. ... ... ... १६१

१९.१.२१

# लाभालाभ.

## उपोद्घात.

" जुनी व्यवस्था बदलून नवीस जागा देती. "

**हिंदुस्थान अवस्थांतर पावत आहे.**—हिंदुस्थान हा देश आज सुमारें तीन हजार वर्षे पुष्कळ अंशीं स्थिर राहिला आहे. त्याच्यामध्यें कांहीं फेरफार झाले खरे, परंतु एकंदरीनें पाहतां लोक आपल्या वडिलांच्या चालीप्रमाणें चालत आले.

परंतु ह्या शतकांत उलटापालट होत चालली आहे. पश्चिमेकडील कलाकौशल्यें व नवीन युक्ति ह्या देशांत येत चालल्या आहेत, विस्तव पाडण्याकरितां किंवा दिवा पेटविण्याकरितां गार आणि चकमक यांच्या ऐवजीं लोक आगकाड्यांचा वापर करूं लागले आहेत. दिनमान मोजण्याच्या

जुन्या रीती जाऊन त्यांच्या जागीं घड्याळें आलीं आहेत. प्रवास करण्यासाठीं पालखींत किंवा बैलगाडींत बसून जाण्याचें सोडून लोक आगगाड्यांतून जाऊं लागले आहेत. हातानें सूत कांतून वस्त्रें विणण्याच्याबद्दल वाफेच्या योगानें हजारों चाल्या व धोटीं फिरत आहेत. पूर्वीप्रमाणें ग्रंथांच्या प्रती एक एक पान लिहून होत नाहींत, तर छापखान्याच्या योगानें हें काम मोठ्या जलदीनें चालत आहे. हिंदु लोकांच्या वाडवडिलांस वर्तमानपत्रें ह्मणजे काय हें ठाऊक नव्हतें. तीं आतां अर्वाचीन हिंदु मोठ्या उत्सुकतेनें वाचीत असतात.

याचप्रमाणें पश्चिमेकडील विद्याही लोकांनीं आदरली आहे. हिंदु ग्रंथकारांनीं घरांत बसून खगोलभुगोल विद्येचे ग्रंथ आपल्या डोक्यांतील कल्पनेनें रचिले. परंतु आतां तीं पुस्तकें सोडून देऊन लक्षपूर्वक अवलोकन करून व अनुभव घेऊन लिहिलेल्या शास्त्रीय ग्रंथांचा लोक अभ्यास करूं लागले आहेत. मेरु पर्वत व क्षीर मधु इ० चा सप्त समुद्रांचा लोकांनीं त्याग केला; सूर्य चंद्रास राहू केतूंचीं ग्रहणें लागतात असें मानणारास आतां अज्ञानी समजतात. राष्ट्राची विद्या ह्मणून राहिली नाहीं, सर्व जगांत असेंच झालें आहे.

याचप्रमाणें राज्यप्रकरणांतही या देशांत उलटापालटी झाल्या आहेत. जुलमी सरकारच्या अधिकाराला मुकाट्यानें वश न होतां प्रजेचे हक्क काय आहेत, हें लोकांस समजूं

लागलें आहे. राष्ट्रीय सभा ( **न्याशनलकांग्रेस** ) वर्षोवर्षी भरत आहेत, व राज्यकारभारांत आमचें मत असावें असें लोक सरकारापाशीं मागणें करीत आहेत.

हे सर्व फेरफार देशास हितावह झाले आहेत. जर कोणी हिंदु आगकाड्या परदेशच्या लोकांनीं केल्या आहेत ह्मणून त्यांचा उपयोग करणार नाहीं, अथवा त्याच निमित्तानें आगगाडींतून प्रवास करणार नाहीं, किंवा वर्तमानपत्र वाचणार नाहीं, तर इतर लोक त्याला वेडा ठरवितील. त्याचप्रमाणें हिंदु लोकांचें खगोलभूगोलवर्णन खरें मानून चालणें हें वेडेपण होय. हिंदुस्थानांतील जुलमी राज्याचा शेवट झाला आहे. सरकार लोकांस हळु हळु देशाच्या राज्यकारभाराचा हिस्सा अधिकाधिक देणार आहे.

**मोठा प्रश्न.**—परंतु ह्यापेक्षां एक मोठा प्रश्न आहे. तो हा कीं, हिंदुस्थानानें पश्चिमेकडील लोकांचीं **कलाकौशल्यें** व **विद्या** हीं जशीं आदरलीं आहेत, तसा तिकडील लोकांचा **धर्म**ही स्वीकारावा कीं काय ?

ख्रिस्ती धर्म हा जरी सांप्रतकाळीं **पश्चिमेकडील** लोकांचा चालू धर्म आहे, तरी युरोपियन लोकांनीं तो **पूर्वेपासून** घेतला असें सर्व कबूल करितात. त्याच्या स्थापकाचा जन्म एशियांत झाला, आणि प्रथम युरोपांत त्याची घोषणा एशियांतील मिशनेरींनीं केली.

हिंदुस्थानांतील लोकांस हा खरचा प्रश्न इतर सर्व प्रश्नांपेक्षां अत्यंत महत्वाचा आहे. आणि त्याचा त्यांनीं मोठ्या काळजीनें विचार करावा. मडकें धड आहे किंवा नाहीं हें ठोठावून पाहिल्याशिवाय कोणतीही बाई तें विकत घेत नाहीं; अथवा एखाद्या व्यापाऱ्यास आपली सर्व संपत्ति देऊन एक रत्न विकत घ्यायाचें असलें तर तो त्याची मोठ्या काळजीनें चौकशी केल्याशिवाय तें घेईल काय? आत्म्याचें तारण तर ह्यापेक्षां अत्यंत मोठ्या मोलाचें आहे.

**खोटी स्वदेशभक्ति.**—स्वदेशभक्ति ह्मणजे स्वदेशप्रीति. खरी स्वदेशप्रीति ही इतकी थोर व स्तुत्य आहे कीं, बहुत मनुष्यें ती आपल्यापाशीं नसतांही तिची बतावणी करितात. स्मैल्स नामक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, " सांप्रतकाळीं स्वदेशभक्तीच्या नांवानें जें खपतें तें बहुतेक अंशीं केवळ शुद्ध मताभिमान व एक कल्लीपणा असतो, आणि तें राष्ट्रीय दुराग्रह, राष्ट्रीय दिमाख, आणि राष्ट्रीय द्वेष यांच्या रूपानें दिसण्यांत येतें. "

ह्या खोट्या स्वदेशभक्तीचें अत्यंत वाईट रूप हिंदुस्थानांतील कित्येक लोकांमध्यें दिसत आहे. परलोकवासी सर एच. मेन यांनीं कलकत्ता युनिवर्सिटीच्या कानवोकेशनापुढें एक भाषण केलें त्याला वीसांहून अधिक वर्षें झालीं, त्यावेळीं ते असें ह्मणाले कीं, " एतद्देशीय इतिहास, जनरुढि, व श्रद्धेय विषय ( धर्म ) यांचे वर्जित भाग जे नवी-

न ज्ञानशिक्षित तरुणांनीं संपादित केलें आहे त्याच्याशीं व ज्या नवीन सुधारणेची त्यांस उमेद आहे तिच्याशीं एका अर्थानें पुरतेंपणीं जुळतात, असें मोठ्या परिश्रमानें प्रयत्न करून दाखविणारे व मूर्खपणानें प्रतिक्रियेसाठीं आपली विद्या खर्चीं घालणारे अशा मोठ्या शिक्षित लोकांच्या उद्योगाविषयीं नित्य माझ्या वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येत आहे............याचें कांहीं कां कारण असेना, परंतु ह्या प्रयत्नापेक्षां दुसरी मोठी चूक नाहीं, आणि ज्या स्थितींत सांप्रत हा देश आहे, त्या स्थितीच्या संबंधानें पाहिलें असतां ह्या चुकीपेक्षां नाशकारक अशी दुसरी चूक नाहीं."

ही "**नाशकारक चूक**" तर प्रस्तुत काळीं फारच माजली आहे, आणि ती बंगाल्यांतच अडकून राहिली आहे असें नाहीं. "हिंदु" या नांवाचें मद्रासेकडे एक वर्तमानपत्र निघत असतें, त्याचे कर्ते असें ह्मणतात कीं, "अलीकडे आमच्या कित्येक शिकलेल्या स्वदेश बांधवांमध्यें अशी प्रवृत्ति पाहण्यांत येतें कीं, बुद्धिविरुद्ध जी प्रतिक्रिया ती होण्याकरितां ते आपल्या मनोशक्ति खर्चीं घालतात. ज्या सामाजिक चाली व संस्था दुष्परिणामकारक आहेत, व ज्या गतकालांतील अधिक साध्या व कमी सुधारलेल्या स्थितींचीं फळें आहेत, त्यांचें ते श्रमपूर्वक प्रतिपादन करितात इतकेंच नाहीं, तर त्या पाळिल्यानें एक प्रकारचें

पुण्य मिळतें असेंही त्यांचें ह्मणणें आहे. त्यांच्या मतें आमच्या वाडवडिलांनीं जें कांहीं केलें त्यांत कांहींच खोटें नव्हतें. हिंदुस्थानांतील सर्व कांहीं मूर्त्तिमंत सद्गुणच आणि परदेशाचें सर्व कांहीं त्याच्या उलट."

मुंबईंत निघणाऱ्या सुबोधपत्रिका नामक पत्रांत वरील अभिप्रायाचें पुष्टीकरण केलें आहेः—

"आतांच्या काळांत स्वदेशप्रीतीचा अर्थ आपलें जें कांहीं आहे त्याची डोळे झांकून स्तुति करणें व परक्याचें जें आहे त्याचा हडसून निषेध करणें, असा करितात. एखादी चाल वरी असो, वाईट असो; ती आपली आहे ह्मणून तिची वाखाणणूक केलीच पाहिजे. जो हिंदु नाहीं तो जर आमचें कर्त्तव्य आह्मांस शिकवितो; आणि त्याचें शिकविणें जरी यथार्थ असलें; तरी तो हिंदु नाहीं, ह्मणूनच त्याला आह्मीं काय करावें हें शिकविण्याचा अधिकार नाहीं. हेंच सांप्रतचें युगमहात्म्य आहे. सत्याला किंवा सरळ वर्त्तनास मान नाहीं. जे लोक अशा विचारांचे ताब्यांत आहेत ते कधीं सुधरणार नाहींत. आणि ते खचीत आपल्याच हातानें आपला नाश करून घेतील" (१७ ज्यून १८८८).

अशा प्रकारच्या वर्त्तनक्रमांत कांहीं नवें नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. पंध्राशें वर्षांमागें जुलियन बादशहानें युरोपांत असाच प्रयत्न चालविला होता. हिंदुस्थानांतील एक बुद्धिवान ग्रंथकर्त्ता असें ह्मणतो कीं,—

"इतिहासावरून आपणांस असें समजतें कीं, ज्या ज्या नवीन सत्यतेचा शोध लागतो त्याचा उपयोग प्राचीन वृथा धर्माचा अर्थ सांगण्याकडे लावावा असा मनुष्याचा स्वभाव आहे, असें स्पष्टीकरण धुत्कारून दिल्यावरच सत्याला मनांत प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा होतो. अशा प्रकारच्या बुद्धिक्रांतींतून हिंदुस्थान सांप्रत गमन करीत आहे."

हाच लिहिणारा आणखी असें ह्मणतो कीं, "ह्या उलटापालटीचें शोचनीय रूप हें एक खरोखर ह्मटलें तर आमच्या शिकलेल्या तरुण जनांचें दांभिक आचरण होय."

सर्व सद्वर्त्तनास सत्याचा आधार असतो, आणि दांभिकपणाच्या पायावर उभारलेली स्वदेशप्रीति केवळ फट आहे.

**विस्तीर्ण अवलोकन करण्याचें अगत्य.**—घडलेल्या गोष्टीच्या अपुरत्या माहितीवरून जीं मनुष्यें अनुमान करितात, त्यांस हिंदु लोक एक अर्थबोधक उपमा देतात, ते त्यांस "आड्यांतील बेडूक" ह्मणतात. हिंदु पंडित असे आहेत. त्यांची सर्व विद्या कांहीं संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करून संपादिलेली असती. त्याशिवाय त्यांस दुसरें कशाचेंही ज्ञान नसतें. संस्कृत ग्रंथांत सर्व विद्याभांडार भरलेलें आहे, आणि शास्त्रें व पुराणें खेरीज दुसरें कांहीं शिकणें व्यर्थ आहे, असें त्यांस वाटतें.

जे हिंदु लोक स्वदेश सोडून कधीं बाहेर गेले नाहींत, तेही बहुतकरून अशाच स्थितींत आहेत. कांहीं वर्षांमागें कलकत्यामध्यें अशा लोकांपैकीं कित्येकांनीं लग्नाच्या चालीविषयीं एका सभेपुढें भाषणें केलीं. त्या सभेच्या अध्यक्षस्थानीं दाक्तर राजेंद्रलालमित्र हे होते. त्यांचीं भाषणें ऐकून ह्या विद्वान गृहस्थाच्या मनावर जी छाप उठली ती त्यांनीं येणेंप्रमाणें दर्शविली आहे :—"जें कांहीं आमचें आहे तें सर्व चांगलें, आणि जें कांहीं ठराव चालत आलें आहे त्यांत कांहीं ढवळाढवळ करूं नये."

डेकन कॉलेजांतील संस्कृत विद्येचे प्रोफेसर दाक्तर भांडारकर हे सांप्रतकाळीं हिंदुस्थानांतील महा विद्वानांपैकीं आहेत. त्यांस सरकारानें ओरिएंटल कांग्रेस नामक महा विद्वानांच्या परिषदेस हिंदुस्थानांतील विद्वानांचे प्रतिनिधि करून युरोपास पाठविलें होतें; ते काय ह्मणतात ?

"कोणी मनुष्य अमुक एका देशांत अमुक सामाजिक व धर्मसंबंधी चाली व संस्था व अमुक प्रकारच्या कल्पना यांत जन्मलेला असला ह्मणजे त्याला वाटतें कीं, त्या चाली, त्या संस्था व त्या प्रकारच्या कल्पना ह्या अगदीं उत्तम असून बुद्धीसही अनुसरून आहेत, आणि जर तो मनुष्य कुशल बुद्धीचा नसला, तर त्याला त्यांजमध्यें कांहींच दुषणार्ह दिसणार नाहीं. परंतु जेव्हां त्याला दुसऱ्या चाली दुसऱ्या संस्था आणि दुसरे विचार हीं कळून येतात, व

नं. १२९१

त्या तो आपल्या परिपाठांतील त्याच गोष्टींशीं ताडून पाहतो, तेव्हां आपल्यांत जें कांहीं वाईट असेल तें त्याला समजूं लागतें, आणि आपल्यापेक्षां कोणतें चांगलें व संयुक्तिक आहे हें दिसूं लागतें."

" आतां मी जें कांहीं तुह्मास सांगणार आहे तें कित्येकांस कदाचित् आवडणार नाहीं, तरी तें सांगणें हें माझें कर्त्तव्य आहे. सांप्रतच्या काळांत आमच्यामध्यें गुणदोषांकडे डोळेझांक करण्याचा असा कांहीं स्वभाव उत्पन्न झाला आहे कीं, तेणेंकरून आह्मी आपली व आपल्या पूर्वजांची योग्यायोग्य विचार न करितां वाखाणणूक करितों. आमच्या संस्था व आमच्या प्राचीन ग्रंथक गोष्टी ह्यांतील आह्मांस सर्व कांहीं बरेंच दिसतें आणि प्राचीन हिंदु लोक सृष्टपदार्थविज्ञान, नीतिशास्त्र, व व्यवहारशास्त्र, व सर्व कलाकौशल्यें यांच्यामध्यें फार प्रविण होते, इतके प्रविण होते कीं, सांप्रतकाळच्या युरोपियन लोकांपेक्षांही ते श्रेष्ठ होते इतकेंच नाहीं, तर आपल्या विद्येंत जीं अगदीं उघड् उघड् दूषणें आहेत, ह्मणजे खातरी लायक ऐतिहासिक लेखांचा जो आमच्यामध्यें अभाव आहे, व तशींच दुसरीं व्यंगें तीं देखील मुळींच नाहींत असें ते ह्मणतात. असा भाव जोंपर्यंत आमच्या लोकांत आहे, तोंपर्यंत आमच्या प्राचीन इतिहासाची व आमच्या लोकांचे गुणदोषांचें प्रकाशन होण्याची आशा नाहीं, आणि आमचा भाग्योदय होण्याचीही आशा नाहीं. "

तर खरे नियम हे आहेत कीं, सर्व हितकारक राष्ट्रीय गोष्टींचें रक्षण करावें. आणि कोणताही श्रद्धेय विषय (धर्ममत) अथवा कोणतीही चाल जर असत्य असली, तर तो विषय किंवा ती चाल टाकून द्यावी आणि जगाच्या कोणत्याही भागांतील सुधारणूक आदरावी.

**ख्रिस्ती धर्माविषयीं हिंदु लोकांचा विरुद्धभाव.**— हिंदुस्थानांत जेव्हां आगगाडी सुरू झाली, तेव्हां हिंदु सुशिक्षितावस्थेचें सानंदाश्चर्य करणारे अशा कित्येक लोकांस ती आवडली नाहीं. संस्कृताच्या ऐवजीं इंग्लिश भाषेचा अभ्यास करणें ही मोठी चूक आहे असें पंडित लोकास वाटतें. स्त्रिशिक्षण कुच कामाचें असें अज्ञान ह्मातान्या आयाबायकांचें ह्मणणें आहे. आपल्यांतून कोणी ख्रिस्ती होत असला तर बहुत हिंदु लोक त्याला आडवे येतात आणि त्याचा हेतु सिद्धीस न जावा ह्मणून आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करितात.

हिंदुस्थानानें पश्चिमेकडील विद्या व कलाकौशल्यें यांचा स्वसंतोषानें स्वीकार केला आहे हें आह्मीं वर दर्शविलेंच आहें. सर्व विषयांपेक्षां धर्म हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. कोणी मनुष्यानें सर्व जग मिळविलें व आपला जीव गमाविला तर त्याला काय लाभ होईल असा जो एक प्रश्न आहे तो अत्यंत योग्य आहे. पश्चिमेकडील लोकांचा धर्म, त्यांच्या विद्या व कला ह्यांच्यापेक्षां विशेष ग्राह्य असेल. निदान

हिंदुस्थानाच्या सुशिक्षितावस्थेची व्यर्थ बढाई मारण्याविषयीं बंगाली लोक विशेषेंकरून तयार आहेत. कांहीं काळामागें मि० मनमोहन घोस यांनीं असें ह्मटलें होतें कीं:

" हिंदुस्थानच्या प्राचीन सुशिक्षितावस्थेचा माझ्याठायीं यथान्याय अभिमान आहे. परंतु अयोग्य व अतिशयोक्तीनें भरलेला असा मान जुन्या काळाला दिल्यानें आपली पुष्कळ हानि होते, असें ह्मणून दाखविणें हें माझें कर्त्तव्य आहे. हिंदुस्थानाची प्राचीन सुशिक्षितावस्था युरोपांच्या सुशिक्षितावस्थेपेक्षां फार श्रेष्ठ होती असें बोलणें जें बहुतकरून सर्व जाहीरसभांमध्यें ऐकण्यांत येतें त्याची मला ओकारी आली आहे. "

**खरी स्वदेशभक्ति.**—आपले वृद्ध राजकार्य धुरंधर पुरुष सर टी. माधवराव यांचें ह्मणणें प्रत्येक स्वदेशभक्ताच्या अंतःकरणावर कोरलेलें असावें. तें असें कीं **जें सत्य नव्हे तें स्वदेशासक्त नाहीं. सत्य जय पावतें** अशी एक ह्मण आहे. ज्या विश्वासाला ( धर्माला ) व आचरणाला सत्याचा आधार नाहीं तो शेवटीं लयास जाईल. असत्याचें राज्य जरी दीर्घकाल चाललें, तरी शेवटीं सत्यापुढें त्यानें नेटें टेंकलेच पाहिजेत. मिल्टन नामक एक विद्वान कवि ह्मणतो कीं, " सत्यासत्याची झोंबी होऊं द्या. निष्कपट व मोकळ्या झुंजांत सत्याचा पराजय झाल्याचें कोणास ठाऊक आहे काय " ?

तो पारखायाजोगा आहे. ख्रिस्ती धर्म आपली परीक्षा करून घ्यायाला नाकबूल नाहीं, आणि अविचारानें कोणीं आपला स्वीकार करावा असेंही तो ह्मणत नाहीं. तो ह्मणतो कीं, "सर्व गोष्टींची पारख करा; जें चांगलें आहे तें बळकट धरा." हाच शाहणपणाचा मार्ग आहे. बहुत राष्ट्रें अत्यंत अज्ञानावस्थेंत व देवभोळेपणांत बुडालीं आहेत. त्यांनीं शोध केल्यावांचून त्यांची स्थिति सुधारणें अशक्य आहे.

**धर्माची पारख त्याच्या फळावरून करावी.**— आजपर्यंत जगांत जे धर्मगुरू होऊन गेले त्यांत परमश्रेष्ठ असा जो झाला त्यानें ह्मटलें आहे कीं, "त्यांच्या फळांवरून त्यांस ओळखाल." परीक्षा करण्याची ही उत्तम कसोटी आहे.

सर्व चांगुलपणाचा व दयेचा उगम असा जो परमेश्वर त्यानें दिलेल्या धर्माचा जे स्वीकार करितात, त्यांच्या संसारसुखाची त्या धर्माकडून वृद्धि झाली पाहिजे; त्याकडून त्यांचें विद्याशिक्षण वाढलें पाहिजे, त्यानें सर्वांस सारखे हक्क द्यावे; दुर्गुणांचा अवरोध करावा, सद्गुणांस प्रोत्साहन द्यावें; आणि आपल्या स्थापकाविषयींच्या श्रेष्ठ कल्पना लोकांच्या मनांत भराव्या. परंतु ज्या धर्माचीं फळें याच्या उलट आहेत तो धर्म देवापासून आलेला नाहीं.

ही पारख करतांना एका गोष्टीविषयीं जपलें पाहिजे. ती ही कीं, कोणत्याही धर्माची परीक्षा त्याच्या **असल** फलां-

वरून करावी. ज्या धर्मांत न्यायानें वर्त्तण्याविषयीं कडकडीत आज्ञा असून त्याचे कित्येक अनुयायी तसे वागत नाहींत, त्यांच्या वर्तनावरून त्या धर्माला दोष लावणें योग्य नाहीं. ज्या धर्माची आज्ञा व त्याच्या अनुयायींचें आचरण हीं परस्परांशीं जुळतात तेव्हां मात्र त्या धर्माची स्तुति करणें अथवा त्यास दोष लावणें योग्य आहे.

तसेंच कोणत्याही धर्माचा साधारण आशय जमेस धरिला पाहिजे. हिंदुधर्माचे परस्पर विरुद्ध असे पुष्कळ ग्रंथ आहेत. त्यांत बहुतकरून जें पाहिजे तें मत प्रतिपादन करण्यास वचनें सांपडतात, तर हिंदुधर्माचा विचार पृथक पृथक वचनांवरून करायाचा नाहीं. तर त्याचा एकंदर आशय काय आहे तो पाहिला पाहिजे.

कोणत्याही धर्मांत कांहीं उत्तम ज्ञान किंवा उपदेश आहे इतकें दाखविणें बस नाहीं, स्वच्छ झऱ्यांतून एकाच काळीं गोड व कडू पाणी वाहत नाहीं. सत्य व निष्कलंक असा जो एकच परमेश्वर त्याच्या धर्मांत बऱ्या वाईटाचें मिश्रण असणें हें अगदीं अशक्य आहे. तो पूर्ण सत्य असला पाहिजे. ज्या धर्मांत बऱ्यावाईटाचें मिश्रण आहे तो **मनुष्यकृत** धर्म होय, **ईश्वरकृत** नव्हे.

कोणी मनुष्य भोजनास बसला असतां त्याच्या भोजनांतील कांहीं पदार्थ चांगले व पथ्यकारक असें सिद्ध करून देण्याचें प्रयोजन नाहीं; परंतु जर त्यांतील केवळ एक पदा-

र्थ विषारी आहे तर त्यानें तें भोजन घेऊं नये. त्याप्रमाणेंच एखाद्या धर्मांत कांहीं चांगल्या आज्ञा असल्या, तरी दुसऱ्या त्याच्या उलट असल्या तर तो धर्म सोडला पाहिजे.

कोणत्याही धर्माचीं फळें तो धर्म आचरणाऱ्या व्यक्तीवर जे परिणाम होतात त्यांवरून चांगलीं दिसून येत नाहींत, तर त्याचा सर्व राष्ट्रावर काय परिणाम घडला आहे हें दाखविल्यानें तीं चांगलीं दिसण्यांत येतात. आज तीन हजार वर्षांपासून हिंदु लोक आपल्या धर्माचें अनेक रूपांनीं आचरण करीत आहेत. तर त्याचीं फळें काय आहेत? ह्या प्रश्नाचा विचार करितांना हिंदुधर्मावर कोणत्या गोष्टी अवलंबून आहेत व इतर कारणांवर कोणत्या आहेत हें पाहिलें पाहिजे. कित्येक जनावरें स्वभावतः क्रूर असतात, व कित्येक सौम्य असतात. राष्ट्रांचीही त्यांच्या धर्मखेरीज करून अशीच गोष्ट आहे.

**हिंदु लोकांचे सद्गुण.**— हिंदुधर्माच्या फळांविषयीं जें कांहीं ह्या पुस्तकांत लिहिलें त्यांत केवळ वाईट फळें मात्र सांगितलीं आहेत; तरी तीं त्याचीं स्वाभाविक फळें होत. दुसऱ्या अर्थी हिंदु लोक साधारणतः आपल्या धर्मापेक्षां चांगले आहेत असें सर्व कबूल करितात. बिशप काडवेल ह्मणतात कीं, "हिंदुस्थानांतील सर्व गोष्टी वाईट आहेत असें माझें अगदीं ह्मणणें नाहीं. तर ते अशा धर्माचे अनुयायी असतांही त्यांच्यामध्यें इतके चांगले गुण असावे

याचें मला उलटें आश्चर्य वाटतें. ह्या आश्चर्याचा उलगडा मी असा करितों कीं, ईश्वरानें आपल्या सूत्राच्या शिकविण्याकडून व परंपरागत अनुभवाच्या द्वारें त्यांस पुष्कळ उत्तम देणग्या दिल्या आहेत. हिंदुस्थानच्या लोकांमध्यें जे गुण मला दिसून येतात त्याचें मला फार कौतुक वाटतें. त्यांच्या धर्मशीलतेचें मला आश्चर्य वाटतें, त्यांच्या मिताहाराची मी तारीफ करितों; त्यांची सहनशीलता, सौम्यता, सुमनता व आदरउपचार हीं पाहून मला आश्चर्य वाटतें. त्यांच्यामध्यें गांवकी व जनसमाजाची रीत ह्यांपैकीं जो प्राचीन काळाचा अवशेष राहिला आहे त्याचें मला आश्चर्य वाटतें. इतकेंच कीं, खिस्ती धर्माकडून मात्र जीं व्यक्तीचीं व राष्ट्राचीं विशेष महत्वाचीं मूलतत्वें उत्पन्न होतात तीं ह्या व दुसऱ्या जातीच्या गुणांस जोडलीं जावोत, ह्मणजे त्यांपासून असा सुपरिणाम होईल कीं, त्याविषयीं हिंदुस्थानाला अथवा खिस्ती धर्माला लाज वाटणार नाहीं. ”

**मार्ग दाखविण्याकरितां प्रार्थना.**— “ ज्यास सत्य जाणण्याची इच्छा आहे तेच वाद करण्यास योग्य आहेत ” असें जें एका हिंदु टीकाकाराचें ह्मणणें आहे तें यथार्थ आहे. ह्याच्या बरोबर ईश्वराकडून प्रकाश मिळवावा. पुढील प्रार्थना १९ शें वर्षांमागें एका प्राचीन सत्यशोधकानें लिहिलेली आहे. ती ह्या काळांतील सत्यशोधकानेंही आपलीशी करावी.

"हे प्रभो, तूं प्रकाश, मार्ग, सत्य व जीवन आहेस. तुजमध्यें कांहीं अंधार, भ्रम, व्यर्थता किंवा मरण नाहीं. ज्या प्रकाशावांचून अंधार, ज्या मार्गावांचून भ्रमण, ज्या सत्यावांचून चूक, व ज्या जीवनावांचून मरण आहे, असा तूं आहेस. हे प्रभू, प्रकाश होवो असें ह्मण, ह्मणजे मी प्रकाश पाहीन; मी मार्ग पाहीन व भ्रमण करणें चुकवीन; मी सत्य पाहीन व असत्य टाळीन, मी जीवन पाहीन व मरण चुकवीन. जो माझा अंध आत्मा अंधारांत व मृत्यूच्या छायेंत बसला आहे त्यास प्रकाशीत कर, आणि शांतीच्या मार्गांत मला ने."

---

# भाग १.

---

## ब्राह्मणधर्मी हिंदुस्थान.

### हिंदु धर्माचीं फळें.

हिंदुधर्मापासून झालेले कित्येक परिणाम खालीं सांगितले आहेत.

### १. रोगी प्रकृति व अल्पायुष्य.

हा परिणाम अनेक रीतींनीं झालेला आहे.

**१. नातलगांमध्यें साटेलोटे (बदलाचें लग्न)**

**यास सहाय करण्यानें.**–एक नामांकित वैद्य असें ह्मणतो कीं, "रोगी लेंकरें जन्मण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांत मुख्य कारण जवळच्या नात्यांत अदलाबदलीचें लग्न करणें हें एक होय. हिंदु लोकांमध्यें बहुतकरून एक लक्ष पोटभाग झाले आहेत, प्रत्येक पोटभाग इतर सर्व भागांपासून अगदीं वेगळा आहे." प्रोफेसर रंगनाथ मुदलियार पुढील दृष्टांत देतातः—

"मद्रासेंत राहणारे मुदलियारांमध्यें पन्नास भाग किंवा भेद आहेत. ह्या माझ्या बोलण्यांत अतिशयोक्तीचा दोष माझ्या पदरीं येईल असें मला वाटत नाहीं. ह्या भागांतील लोकांमध्यें शरीरसंबंध हाते नाहीं, हीच अदलाबदलीच्या लग्नाची अडचण नायडु, पिल्ले व रेड्डी ह्या लोकांमध्यें आहे. अशा प्रकारें अगदीं जवळच्या नातलगांमध्यें शरीरसंबंध जडल्यानें, व इतक्या आकुंचीत मर्यादेंत नवरा किंवा नवरी घेण्याचें अगत्य पडल्यानें प्राणिधर्मशास्त्राच्या व समाजाच्या संबंधानें जे अनहित होतें त्याविषयीं पाल्हाळ करून बोलण्याचें प्रयोजन नाहीं."

**२. लहानपणीं लग्न करण्यास उत्तेजन दिल्यानें.**– एका प्रख्यात हिंदु धर्मशास्त्रांत असें ह्मटलें आहे कीं:

"कन्येचीं स्तनें वर येण्यापूर्वी तिचें लग्न करावें, परंतु लग्नाच्या पूर्वी ती ऋतुमति झाली असेल तर तिचें दान करणारा व तिचें ग्रहण करणारा हे उभयतां नरकांत

पडतात आणि तिचा बाप, आजा, व पणजा हे विष्टेंत किड्याच्या जन्मास जातात."

लहानपणीं लग्न करण्यापासून जें वाईट होतें त्याचें वर्णन दा० मोहेन्द्रलाल सरकार एक अनुभविक वैद्य यांनीं येणें प्रमाणें केलें आहे:—

"माझें नम्रपणाचें असें मत आहे कीं, लहानपणीं लग्न करणें हें आमच्या देशांत एक मोठें अरिष्ट आहे. हें जणू काय राष्ट्रीय जीवनाच्या मुळाशींच उभें आहे, आणि राष्ट्राची स्वाभाविक उन्नति व विस्तार होण्यास त्यानें प्रतिबंध केला आहे.

"मी ३० सांहून जास्ती वर्षें वैद्यकीचा धंदा चालवीत आलों आहें. व तेवढ्या काळांत जें माझ्या अवलोकनांत आलें, त्यावरून लहानपणीं लग्न केल्यापासून हिंदु लोकांमध्यें शेंकडा २९ स्त्रिया अपूर्ण कालीं मरण पावल्या, ह्याच कारणामुळें शेंकडा २९ दुर्बल झाल्या, आणि बाकीच्यांची प्रकृति बिघडून जन्मरोगी झाल्या." रोगी स्त्रियांस अशक्त प्रकृतीचीं लेंकरें होतात.

**३. वैद्यांस जसा मान मिळावा तसा मिळत नाहीं,** व त्यांस जी उपयुक्त माहिती पाहिजे ती मिळूं देत नाहींत; सुयणीस नीच जातीच्या व अशुद्ध मानिल्या आहेत. हिंदुधर्माप्रमाणें वैद्याची जात ब्राह्मण पुरुष व वैश्य स्त्री यांजपासून उत्पन्न झालेली असून अशुद्ध मानिली आहे. त्यांस जातीच्या ह्याच कारणामुळें मनुष्यशवच्छेदन करून पाहण्याची मनाई आहे. यामुळें मनुष्याच्या शरीराचे रचनेचें ज्ञान त्यांस बराबर नसतें. हिंदु सुयणी अडाणी असल्यामुळें पुष्कळ स्त्रिया बाळंतपणांत मरतात.



**४. रोगाचे धार्मी उत्पन्न होण्याचें खोटें कारण दाखविलें आहे व ते दूर करण्याचे गुणकारी उपाय करीत नाहींत.**—देवीचे रोग किंवा फोड्या, व महामारी ही शितळा देवी व मरी आई व दुसरीं दुष्ट दैवतें किंवा भूतें यांच्यापासून होतात, असें हिंदु धर्माचें ह्मणणें आहे. हीं दैवतें लीलेनें क्रीडेनें ह्या रोगांचें बीज पेरितात असें हिंदु लोक मानितात. हे रोग निवारणार्थ हिंदु लोक जे उपाय करितात ते अगदीं कुच कामाचे असतात; ह्मणजे शीतळा देवीला रोज थंड पाण्याची घागर भरून स्नान घालणें, मरी आईला बकरीं, टोणगे बळी देणें, तिला गांवाबाहेर लावून देणें इ० , आणि ज्याकडून हे रोग दूर होतील असे चांगले उपाय मुळींच करीत नाहींत.

**५. रोग्याकरितां इस्पितळें, व डिस्पेनसिऱ्या धर्माच्या संबंधानें देशांत नाहींत.** इंग्रज लोक जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांस एकही इस्पितळ किंवा डिस्पेन्सरी देशांत अढळली नाहीं. हिंदु लोकांचा मुख्य दान धर्म ह्मटला ह्मणजे ब्राह्मणभोजन घालणें हा आहे; आणि रोगी व दुःखी आपल्या पूर्वजन्माच्या कर्माचें फल भोगि-

तात असें समजून त्यांची फार कोणी दया करीत नाहींत. हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां ख्रिस्ती इंग्लंडांत मनुष्यें दीर्घकाळ वांचतात असें सिद्ध करून देतां येतें.

## २ दारिद्र्य.

हिंदुधर्माकडून हा देश ज्या अनेक रीतीनें दरिद्री झाला आहे त्यांपैकीं कित्येक सांगतों.

**१. परदेशाशीं व्यापार करण्याच्या मनाईनें.**— इंग्लंड देश सांप्रतकाळीं जगांतील धनाढ्य राष्ट्रांपैकीं एक आहे. ह्याचें एक मुख्य कारण त्या देशाचा व्यापार होय. त्याचीं गलबतें पृथ्वीवरील सर्व समुद्रांतून पर्यटन करितात. जेथें कोठें संपत्ति मिळेल तेथें त्याचे व्यापारी जातात. पारशी लोकांनीं त्यांचा कित्ता वळविला आहे, व त्यांसही त्यांच्या प्रमाणेंच लाभ झाले आहेत.

हिंदु लोकांनीं परदेशच्या लोकांस अशुद्ध म्लेंछ मानावें असें हिंदुधर्म शिकवितो. त्यांच्या देशांत "द्वीजानें अल्पकाळासाठीं देखील वस्ती करूं नये.

हें शिकविणें मूर्खपणाचें आहे असें सर्व सुशिक्षित मनुष्यें कबूल करितात, परंतु हिंदुधर्माचें हें मत आहे, व तें बदललें नाहीं.

**२. कृषिकर्माला प्रोत्साहन देण्यानें.**— मनुधर्मशास्त्रांत पुढील वचनें अढळतातः— ८३. वैश्य कर्मानें

उपजीविका करणारा ब्राह्मण अथवा क्षत्रिय यानें कृषिकर्म यत्नपूर्वक वर्ज्य करावें, कारण, कृषि ही पराधीन ( बैल इ० चे अधीन ) व भूमिस्थित प्राण्यांची हिंसा जींत होते अशी आहे. ”

८४. “ कोणी कोणी कृषि उत्तम आहे असें ह्मणतात, परंतु तें योग्य नाहीं; कां कीं भूमि, व भूमिस्थित जीव यांचा नाश नांगर, कुदळें हीं करितात, या करितां कृषिवृत्ति साधु लोकांनीं निंदित केली आहे ” ( अ० १० ).

कृषिकर्म हें देशाचें मुख्य धन आहे. द्विज जातीनें जर तें करूं नये तर शूद्रानेंहीं करूं नये. या न्यायानें मनुच्या धर्मशास्त्राप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांनीं उपाशीं मरावें. आणि जरी लोक तें करितात, तरी ते अज्ञान रयतेच्या हातीं मात्र सोंपलें आहे.

**३. कलाकौशल्यास नीच मानिल्यानें.**—व्यापार व कलाकौशल्यें हीं जरी परस्परांस सहायभूत आहेत, तरी इंग्लंडास त्याच्या व्यापारापेक्षां कलाकौशल्यांपासून अधिक धनप्राप्ति होत आहे.

डाक्तर के. एम. बानरजी असें ह्मणतात कीं, “ गृहादि निर्माण करणारा शिल्पकारास दासीपुत्र असा डाग देतात. सुतार व सोनार हे शापित आहेत. कारण ब्राह्मणांची त्यांजवर गैरमर्जी झाली आहे. अशा जनसमाजांत कलाकौशल्याची वृद्धि कशी होईल ?

सांप्रत काळीं देशांत सरकारी कामें करणाऱ्या उमेदवारांच ऊत आला आहे. हे उमेदवार केवळ संपत्ति खाऊन चट करणारे आहेत, संपत्ति उत्पन्न करणारे नव्हेत. सुधारलेले कृषिकर्म, कसबानें केलेल्या वस्तूंचा विकास, आणि परदेशाशीं व्यापार हे हिंदुस्थानास सधन करण्याचे खरे मार्ग आहेत, परंतु हिंदुधर्म ह्या सर्वांचा हिरमोड करितो.

**४. लग्नाविषयीं खोटें मत शिकविल्यानें.**—हिंदु लोकांचा असा विश्वास आहे कीं, ज्यास आपल्या मरणानंतर तर्पण करण्यास पुत्रसंतान नाहीं, तो पुत नामक नरकांत पतन पावतो. पुत्र शब्दाचा अर्थ अशा नरकापासून तारणारा असा मानिला आहे.

ही हानीकारक भ्रांति आहे. हिच्यापासून मनुष्याच्या ठायीं असा विश्वास उत्पन्न होतो कीं, आपणास पुत्र असला व आपलें श्राद्ध करण्यास पुष्कळ द्रव्य असलें ह्मणजे मग दुराचरणांत सर्व आयुष्य दडविलें तरी चिंता नाहीं. अशा मतापासून दरिद्रही उत्पन्न होतें. बुद्धिवान व विचारशील मनुष्यें कुटुंब पोषणाचें सामर्थ्य येण्यापूर्वी लग्न करीत नाहींत; परंतु अशा कामीं अविचाराचें वर्त्तन केल्यास त्या वर्त्तनाचा कल दारिद्र्य उत्पन्न करणारा असतो.

**५. खोटा दानधर्म केल्यानें.**—अंधळे, पांगळे, कुष्टरोगी इ० मनुष्यें आपल्या पूर्वजन्मीच्या पापाचीं फळें भोगितात असें हिंदु लोक समजतात, आणि त्यांचें दुःख



निवारण करण्यांत कांहीं पुण्य आहे असें त्यांस वाटत नाहीं. या कारणामुळें ते जरी फार धार्मिक आहेत, तरी त्यांच्या दानधर्माचा झोक बहुधा दरिद्र वाढण्याकडे असतो. भीक मागणें हा ज्यांचा धंदाच आहे अशीं दाहा लक्षांहून जास्ती मनुष्यें हिंदुस्थानांत आहेत. त्यांतून बहुतेक सशक्त आहेत. जातींचीं जेवणें हीं आळसास व निरुद्योगीपणास उत्तेजन देणारीं आहेत.

**६. दैववादाकडून.**—सर्व गोष्टी कर्माप्रमाणें घडतात असा हिंदु लोकांचा विश्वास आहे. त्यांच्यामध्यें अशी एक ह्मण आहे कीं, नशिबांत जें लिहिलें असेल तें कोणाच्यानें फिरवेल? ह्या विश्वासाची प्रवृत्ति अशी आहे कीं विपत्ति आली असतां ती दूर करण्याचे उपाय न करितां लोक नशिबाला बोल लावून स्वस्थ राहतात. हिंदु नामक वर्त्तमानपत्राचा कर्त्ता असें ह्मणतो कीं, "हीच तृप्तता आमच्या लोकांचा हा शेंकडों वर्षांच्या मानसिक मरणाचा परिणाम होय."

**७. यांचे मुक्तिविषयींच्या मताकडून.**—हिंदुधर्माप्रमाणें प्रत्येक वस्तूला ८४ लक्ष योनींतून गेलें पाहिजे. हे जन्ममरणाचे फेरे कसे चुकवावे हा त्यांचा मोठा प्रश्न आहे. हिंदुधर्म असें सांगतो कीं, सर्व बऱ्या वाईट कर्मांचा त्याग केला असतां मुक्ति प्राप्त होते.

हिंदु लोक आपापल्या सुखापुरता मात्र विचार करितात. जगांत काय चाललें आहे याचा विचार करणें, तें पाहणें,

अथवा त्याविषयीं ऐकणें याचें भाविक हिंदूस अगत्य दिसून येत नाहीं; त्याचे स्वदेशीय जन अज्ञान सागरांत बुडाले असले तर त्यांस विद्यादान देण्याचें त्यांच्या मनांत येत नाहीं. दुष्काळामुळें त्यांची उपासमर होत असली, तरी त्यांस अन्नदान करणें हें याचें काम नाहीं. ते रोगाच्या धार्मीनें मरत असले तरी त्यास औषधउपचार करण्यास त्याचा धर्म त्यास प्रवृत्त करीत नाहीं. तर त्यानें आपल्या नाशिकाग्रीं दृष्टि लावून कांहीं विषय मनांत न आणितां ध्यान करीत रहावें. हा आपलपोटेपणाचा धर्म होय.

**८. हिंदु लोकांस बालकांचें राष्ट्र करण्यानें.**— असें करण्याची हिंदुधर्माची प्रवृत्ति कोणत्या प्रकारची आहे हें पुढें सांगण्यांत येईल. आतां त्याची दारिद्र्याकडे कशी प्रवृत्ति आहे हें सांगतों.

लेंकरांस थाटमाटाची आवड असते. हें त्याचें एक विशेष लक्षण आहे. हिंदु लोकांस जगांतील इतर सर्व राष्ट्रांपेक्षां डागडागिण्याची फार आवड आहे, आणि लग्नकार्यांत डामडौल करण्यांत पुष्कळ पैसा उधळितात. सांप्रतकाळीं सुमारें एक हजार लक्षाचें सोनेंरुपें प्रतिवर्षी हिंदुस्थानांत येतें. परंतु त्याचा योग्य उपयोग न करितां मुख्य भाग अलंकार करण्यांत घालतात. हिंदुस्थानांत २०० कोटिहून जास्ती रुपयांचे दागिने आहेत. त्यांच्या १२ टक्याच्या हिशेबानें व्याजावर जमिनीचा सर्व सारा



देतां येईल. आगगाडीचा रस्ता करण्याकरितां कंपनीला युरोपियन लोकांपासून भांडवल उसने घ्यावें लागलें आहे. त्यांस त्याबद्दल दरवर्षी सुमारें ९ कोटि रुपये व्याज मिळतें. लोकांस लेंकरांप्रमाणें डामडौलाची आवड नसती तर इतकें द्रव्य देशांत राहिलें असतें. लग्नकार्यांत डामडौलासाठीं उधळा खर्च करून लोक कसे कर्जबाजार होतात हें सांगणें नको.

## ३. राष्ट्रीय अज्ञान.

१. हिंदुधर्म प्रजेच्या बहुत मोठ्या भागास, व विशेषेंकरून स्त्रियांस विद्या शिकण्याची मनाई करितो. एक बंगाली ग्रंथकार असें ह्मणतो कीं:—

"ब्राह्मणांशिवाय कोणी वेद शिकूं नयेत, अथवा दुसऱ्यास धर्मशिक्षण देऊं नये. अशी शास्त्रांची आज्ञा आहे. आणि ज्याअर्थी वेद व वेदांगें यांत सर्व देशांची विद्या भरली आहे—ह्मणजे व्याकरण, वाक्यरचना, अंकगणित व गणित हीं त्यांत आहेत, त्याअर्थी ही जी आज्ञा शास्त्रानें दिली, व आजपर्यंत ब्राह्मणांनीं बजाविली, तिच्या योगानें इतर मनुष्यजातीस अज्ञानांत ठेविलें."

हिंदुस्थानाच्या प्रजेंत शेंकडा ९ ब्राह्मण आहेत. तेव्हां हिंदुधर्माप्रमाणें ९९ अन्यजातीय मनुष्यांनीं कमी जास्त मानानें अज्ञानांत राहवें. देवानें एकाच लहान संख्येच्या

जातीच्या लोकांस मात्र बुद्धि दिली आहे असें नाहीं. जर विद्या थोडक्या लोकांमध्येंच राहिली, तर ज्यांस ईश्वरानें बुद्धिमत्ता दिली आहे ती विकास न पावतां तशीच राहील.

वर सांगितलेल्या रीतीचा अहितकारक परिणाम स्त्रियांच्या स्थितींत अनुभवास येतो. ख्रिस्ती मिशनेरी स्थापण्यापूर्वी हिंदुस्थानांत मुलींच्या शाळा नव्हत्या. सन १८८१ सालीं देखील दहा कोटी स्त्रियांमध्यें केवळ २३,१००० स्त्रियांस मात्र लिहितां वाचतां येत होतें. अशिक्षित स्त्रियांस आपल्या लेंकरांचा चांगल्या रीतीनें प्रतिपाळ करितां येत नाहीं; त्यांस नानाप्रकारें दुःख सोसावें लागतें.

२. हिंदु धर्मसंबंधी पुस्तकें जितकीं शिकावीं तितकें अधिक अज्ञान मनांत भरतें. हिंदु लोकांच्या भूगोलविद्येच्या ग्रंथांत असें सांगितलें आहे कीं, पृथ्वींत वर्तुलाकार सप्तद्वीपें आहेत. त्यांच्यामधून क्षार समुद्र, दूध, मध, मेघ इ० चे समुद्र आहेत. त्याच्या मध्यभागीं सुवर्णाचा मेरु पर्वत आहे, तो ८४,००० योजनें उंच आहे. अगत्स्य ऋषीनें समुद्र प्राशन करून तो खाऱ्या पाण्याच्या रूपानें बाहेर सोडिला. हिंदु खगोल विद्येप्रमाणें सूर्य चंद्रापेक्षां पृथ्वीच्या जवळ आहे. चंद्राला दक्षाच्या शापामुळें क्षयवृद्धीच्या कळा लागल्या आहेत. राहू नामक दैत्याचें विष्णूनें छेदिलेलें शीर सूर्यचंद्रास

गिळायास येतें तेणेंकरून त्यांस ग्रहण लागतें. इतिहासांत अकटोविकट व अत्यंत असंभवनीय कथा आहेत. ज्या देवांस मुळींच अस्तित्व नाहीं. त्यांचें ह्मणजे केवळ कल्पित देवांचें हिंदुधर्मांत वर्णन केलें आहे.

## ४. बुद्धीची दुर्बलता.

हिंदु लोकांमध्यें कित्येक बुद्धिमान पुरुष होऊन गेले हें कबूल केलें पाहिजे, परंतु प्रत्येकाच्या बुद्धीमध्यें दुबळेपणाचा अंश दिसून येतो. रामायणाच्या कवनांत पराकाष्ठेच्या अनर्थाच्या गोष्टी वर्णिल्या आहेत; न्यायशास्त्रावर एक ग्रंथ लिहिणारा आपल्या ग्रंथाच्या आरंभीं कृष्णाची स्तुति करितांना त्याला "विश्ववृक्षाचें बीज" व "तरुण गोपींचीं वस्त्रें चोरणारा" असें ह्मणतो.

वर जें सांगितलें त्याच्या प्रमाणार्थ खालीं स्पष्टीकरण केलें आहे :

**१. हिंदुधर्मांत अगदीं मुरलेलीं मनुष्यें कृपण बुद्धीचीं व हटवादी असतात.**—बहुशः तीं लोकसुधारणुकेचीं वैरी असतात, आणि आपलें ज्ञान खेरीजकरून इतर सर्व ज्ञानांचा धिःकार करितात. एक बंगाली लिहिणारा असें ह्मणतो कीं, "कित्येकांस मानसशास्त्रसंबंधी कल्पना ओवण्यापुरतें थोडेसें बुद्धिचापल्य असतें; तसेच ज्या सत्यता उघड आहेत त्यांचा घोटाळा करून दाखवि-

ण्याकरितां लाघवी भाषण रचण्याचें सामर्थ्य असतें; परंतु हें सामर्थ्य आपल्यास असावें अशी कोणास इच्छा होणार नाहीं. ”

**२. अकटोविकट कल्पित गोष्टी खऱ्या मानितात.**— याविषयीं एक दोन उदाहरणें देतों. मारुतीला इतकें सामर्थ्य होतें कीं, तो मोठमोठाले पर्वत उपटून चेंडूप्रमाणें फेंकून देत असे, एकदां त्यानें सूर्याला आपल्या बगलेंत लपविलें होतें. सगर राजास ६०,००० पुत्र भोपळ्यांत जन्मले. हिंदुस्थानचे लोक साधारणतः बुद्धिमान आहेत, परंतु अशा काहण्यावर विश्वास ठेवल्यानें त्यांची अद्याप पोरबुद्धीच आहे असें ह्मटलेंच पाहिजे.

**३. हिंदु लोक रूढी धरून चालतात— बुद्धीला अनुसरत नाहींत.** वाडवडिलांच्या (किंवा लोकांच्या) चालीप्रमाणें चालावें हेंच जिकडे तिकडे लोकांच्या तोंडीं आहे. विद्वान पंडित विद्यासागर असें ह्मणतात कीं, “रूढी हाच ह्या देशाचा राजा आहे. पश्वादि प्राण्यांला चालीप्रमाणें चाललें पाहिजे. जरी त्यांस थोडासा विचार करितां येतो तरी त्यांस अनुभवावरून कोणत्या मार्गानें चालावें याचा विचार करितां येत नाहीं. परंतु मनुष्यांनीं आपली बुद्धि गुंडाळून एकीकडे ठेऊन मेंढरें किंवा बैल याप्रमाणें वागूं नये.

पशु पक्षी हजारों वर्षांमागें जसे चालत होते तसेच



आतां चालतात, तशीच हिंदु लोकांच्या अर्धवट सुधारणूकेची स्थिति ठाम झालेली आहे. दाक्तर भांडारकर ह्मणतात कीं, “हिंदु लोकांचीं आऊतें व कलाकौशल्यें मनुच्या काळीं जशीं होतीं तशींच अद्याप आहेत. परंतु **संवृद्धि** हा पश्चिमेकडील लोकांच्या सुधारणुकेसंबंधी खुणेचा शब्द आहे.”

**४. हिंदुस्थानांत सुधारणा अद्याप बाल्यावस्थेंत आहे.**—बाबू हलधर एम. ए. ह्मणतात कीं, “तान्ह्या बालाचें मुख्य लक्षण हेंच आहे कीं, तें अगदीं लाचार व आपल्या निर्वाहाकरितां दुसऱ्यावर अवलंबून असतें. बालकाला व्यक्तीचें ज्ञान नसतें. त्याला कोणत्याही गोष्टीसाठीं स्वतांवर अवलंबून राहवत नाहीं, आणि जबाबदारी ह्मणजे काय हें त्याला कळत नाहीं. हिंदुस्थानांतील सुधारणुकीचे बारीक रीतीनें अन्वेषण केलें असतां त्याचीं हीच लक्षणें आहेत असें समजून येईल.

“हिंदुलोकांच्या सामाजिक व्यवस्थेमध्यें व्यक्तीचा मान राखण्याचा अभाव स्पष्ट दिसून येतो. सर्व गृहकृत्याच्या विचारांत कुटुंबाचा जो मुख्य असतो त्याचें ह्मणणें प्रमाण मानिलें पाहिजे. इतकेंच नव्हे, तर कुटुंबाच्या मनुष्यांच्या विवेकाचा रक्षकही तोच असतो. त्याचे बरेंवाईटाचा निवाडा तोच करितो. कुलाच्या ह्या कुलमुखत्यार राजाच्या आज्ञेखालीं सर्व कुटुंबांतील मनुष्यांना गुलामाप्रमाणें वागलें पाहिजे.”

### ८. राज्यप्रकरणीं अपकारक परिणाम.

**१. राष्ट्रीय वृद्धीस प्रतिबंध झाला आहे.**—शिकलेल्या हिंदुलोकांमध्यें एक नवीन राष्ट्रीत्वाविषयीं नवीन समज उत्पन्न होत आहे, परंतु तो हिंदुधर्माला अगदीं विरुद्ध आहे. “ न्याशनल कांग्रेस ” ह्मणून जी राष्ट्रीय सभा उपस्थित झाली आहे, ती मनूच्या जातीसंबंधी नियमांस अगदीं अनुसरून आहे. ह्या देशांतील प्रजेस शूद्र जातीची संख्या फार मोठी आहे. परंतु जर ते मनूच्या काळांत द्वीजातींच्या सभेंत धिटाईनें जाते, तर त्यांस देशपार करणें व अंगच्छेद करणें ह्याच शिक्षा मनुधर्म शास्त्राप्रमाणें झाल्या असत्या.

**२. परकीय लोकांनीं ह्या देशावर स्वाऱ्या करून तो सहज जिंकला.**—रोमन लोकांमध्यें अशी ह्मण होती कीं, विभाग कर आणि जिंक. ब्राह्मण लोक हेंच तत्व धरून चालतात. त्यांनीं लोकांचे अनेक जातिभेद करून त्यांस सहज आपल्या ताब्यांत ठेविलें. आपसांत विभागलेला देश हेंच हिंदु राष्ट्राचें यथार्थ वर्णन होय.

### ९. अनिर्बंधक राज्य व परमतासहन.

**१. अनिर्बंधक राज्य.**—भोलानाथचंद्र हे गृहस्थ असे ह्मणतात कीं, हिंदु वगैरे पूर्वेकडील लोकांस अनिर्बंधक राज्य पद्धतीशिवाय दुसरी राज्य पद्धत माहीत नव्हती व दुसरीची माहिती करून घेण्याचा त्यांनीं कधीं यत्नही केला



नाहीं. राज्यनीति ही विद्या जरी मोठ्या महत्वाची आहे, तरी पूर्वेकडील लोकांनीं तिजकडे कधीं लक्ष्य दिलें नाहीं. नियमानुसार राज्यपद्धतीची उपपत्ति व व्यवहार यांचा त्यांनीं कधीं अभ्यास केला नाहीं. लोक सत्तात्मक राज्याची कल्पनासुद्धां त्यांच्या मनांत कधीं आली नाहीं. राज्यसंबंधी गुलामगिरींतून मुक्त होणें ह्मणजे काय हें त्यांस कधीं समजणें नाहीं. राजा आणि प्रजा यांचा परस्पर काय करार असतो हें त्यांस ठाऊक नाहीं. मनु ह्मणतो कीं, “ ज्या कारणास्तव पूर्वोक्ति इंद्रादि श्रेष्ठ देवतांच्या अंशापासून राजा उत्पन्न झाला आहे, त्या कारणास्तव राजा हा आपल्या तेजें-करून सर्व जीवांपेक्षां श्रेष्ठ आहे. ” “ तो मनुष्यरूपेंकरून कोणी एक मोठी देवता स्थित आहे ” ( मनु० ७: ५, ८).

हिंदु राजे स्वराज्य हें आपलें खासगत वतन आहे असें मानीत. त्याचा वसूल मनास येईल त्याप्रमाणें ते खर्चून टाकीत. ते आपल्या मनाच्या लहरीप्रमाणें किंवा रागाच्या झटक्यानें आपल्या प्रजेपैकीं कोणाची चौकशी न करितां शिरच्छेद करण्यास किंवा त्यास हत्तीच्या पायांखालीं तुडवून मरण्यास हुकूम करीत.

याप्रमाणें तीन हजार वर्षेंपर्यंत चाललें होतें. केवळ गेल्या शंभर वर्षांच्या आंत इंग्रेज सरकार नेटिव संस्थानांत हा परिपाठ करीत आलें आहे.

**२. परमतासहन.**—सहन ह्मणजे अटकाव न करितां कांहींएक होऊं देणें. परमतासहन ह्मणजे दुसऱ्यास जो धर्म खरा वाटतो तो त्याला आचरूं देणें. **परमतासहन** हें त्याच्या उलट आहे.

हिंदुधर्म एकाच वेळीं पराकाष्ठेचा सहन आहे व असहनही आहे. कोणीही नास्तिक, आस्तिक, अद्वैतवादी, बहुदेवभक्त झाला, तरी तो त्यास प्रतिबंध करीत नाहीं. त्याला वाटेल त्या वस्तूची तो उपासना करूं देईल, मग ती वस्तु आकाशांत असो, पृथ्वीवर असो, किंवा पाण्यांत असो. तरी त्याकडून त्यास प्रतिबंध व्हावयाचा नाहीं. त्यानें देवावर महत् दोषारोप केला किंवा देव नाहीं असें जरी ह्मटलें तरी तो त्याचा निषेध करायाचा नाहीं. त्यानें लबाडी, चोरी, व्यभिचार, खून इ० अपराध केले तरी त्यास त्याची चिंता नाहीं. जोंपर्यंत तो आपल्या जातीचे आचार पाळितो, तोंपर्यंत त्याला आपल्या कुटुंबांत राहण्याची परवानगी आहे. त्याला धर्माच्या नात्यानें कोणी उपद्रव करणार नाहीं. तो जर आपल्या देवांच्या देवळांत गेला तरी त्याला कोणी आडवे येणार नाहीं. परंतु जर कां तो विद्याभ्यासाकरितां इंग्लंडास गेला, किंवा त्यानें विधवेशीं लग्न लाविलें, परजातीच्याशीं अन्नव्यवहार केला, अथवा त्याच्या हातचें तो पंचपात्रभर पाणी प्याला तर तो हिंदुधर्माप्रमाणें जातिभ्रष्ट झाला, त्याला बहिष्कृत केलेंच पाहिजे.



तथापि हिंदुधर्माच्या असहनतेचा बडगा जो खिस्ती होतो त्याजवर मोठ्या जोरानें पडतो. तेव्हां हिंदु लोक कंबर बांधून भांडायास उठतात, त्याच्या धर्मसंबंधी स्वतंत्रतेविरुद्ध मोठमोठीं भाषणें करितात, लांबलचक निबंध लिहितात, व पुष्कळ अयोग्य कर्मे करितात. ज्याच्या योगानें तो खिस्ती झालेला असतो त्याचा सत्यनाश व्हावा ह्मणून आपल्या देवाच्या नांवानें शाप देतात; सरकारदरबारांत जातात, व वकील बारिस्टर करून कोर्टांची व कायद्याची मदत मिळविण्यास यत्न करितात. कित्येक प्रसंगीं अशा मनुष्याचा जीव घेण्याचेही यत्न झाले आहेत, आणि इतके सर्व कशाकरितां? तर त्यानें धर्मसंबंधी बाबतींत स्वतंत्र विचार करण्याची व आपल्या खातरीप्रमाणें चालण्याची हिंमत धरली ह्मणून यावरून इतकें दिसून येतें कीं, हिंदु लोक बाहेरून दुसऱ्याच्या धर्माविषयीं सहनता दाखवीत असतां आंतून पराकाष्ठेचे असहत आहेत.

हिंदु लोक असें ह्मणतात कीं, खिस्ती धर्माचा अंगीकार केल्यानें त्यांच्या कुटुंबाची फाटाफुट होते. तर हा कोणाचा अपराध? तो केवळ हिंदुधर्माचाच होय, अणखी कोणाचा नव्हे. जर हिंदु लोक आपल्यांतून खिस्ती झालेल्या मनुष्यास त्याच्या कुटुंबांत राहूं देतील तर तो मोठ्या आनंदानें राहील व आपल्या मनाच्या खातरीशीं इमानानें व आपल्या देवाशीं एकनिष्ठेनें वर्त्तेल. त्यानें प्रथम आपल्या देहाच्या

बापाशीं इमानानें वागावें किंवा आपल्या स्वर्गीती पित्याशीं वागावें? जर तो नास्तिक किंवा दुराचारी बनत तर त्याला त्यांनीं त्याच्या कुटुंबांत राहूं दिलें असतें, परं आतां जरी तो पूर्वीपेक्षां अधिक ममताळू व शुद्ध झाला त त्याला निष्ठूर व बाटला असें समजून घरांतून हांकून लाव तात; कित्येक ठिकाणीं आईनें देखील आपला मुलगा धर्मा च्या प्रकरणांत आपल्या मातापितरांच्या मतांप्रमाणें चालत नसल्यामुळें त्याला देवांच्या नांवानें शाप दिल्याचीं उदाहरणें पाहण्यांत आलीं आहेत. हिंदुधर्म सर्व प्रकारच्या दुष्टाईक कानाडोळा करील परंतु निर्मल व निष्कलंक अशा धर्माचा त्याला वीट येतो.

यावरून सुशिक्षित लोकांचे रूपलक्षणांपैकीं एकाची ह्मणजे धर्मसंबंधी ढोंगाची जोगवण होते. आणि माणसें आपले धर्मसंबंधीं विश्वास उघडपणें कबूल करायास भितात.

## ७ जात.

जातिभेद हा हिंदुधर्माचा मुख्य रूपलक्षण आहे. हिंदु धर्म किती असह आहे हें मागल्या प्रकरणांत दाखविलें आहे. सर्व हिंदुधर्म बाह्य लोक अशुद्ध म्लेंच्छ आहेत असें समजतो. जातीचा मुख्य संबंध अन्नव्यवहाराशीं आहे. यावरून कोणीएकानें असें ह्मटलें आहे कीं, हिंदुधर्माचें **स्थान अन्नाशयांत (पोटांत) आहे.**



"इतर धर्मांचीं स्थानें मनांत किंवा आत्म्यांत असतील परंतु अन्नाशय हा हिंदुधर्माचा बळकट गड आहे. एखादा हिंदु सर्व प्रकारचीं प्रमाणें व जुलूम यांच्यापासून आपल्या धर्माचें रक्षण करूं शकेल, परंतु त्याच्या अन्नांत गोमांसाचा लहानसा तुकडा मिसळला ह्मणजे त्याचा धर्म बुडाला! यावरून तो आपला धर्म सोडतो असें नाहीं, तर त्याचा धर्मच त्याचा त्याग करितो. पांच साहा हिंदु मिळून आपल्या जातीच्या एका मनुष्याला धरून त्याच्या घशांत निषिद्ध अन्न जबरीनें घालोत ह्मणजे तो मनुष्य आपल्या इहपरलोकसंबंधीं सर्व हक्कांस मुकलाच असें समजावें."

कोणी कोणी असें ह्मणतात कीं, युरोपांत व इतर देशांत जसे सामाजिक भेद आहेत तसच हे आमचे जातीभेद आहेत. परंतु हें ह्मणणें सर्वांशीं बरोबर नाहीं; त्यांत मोठा भेद आहे. हिंदुस्थानांतील जातिभेदी उत्पत्ति केवळ **जन्मा**पासून आहे. जात एका वर्गापासून दुसऱ्या वर्गाला देतां येत नाहीं. कोणा हीन जातीच्या मनुष्यानें आपल्या राजाची मोठी चाकरी बजाविली तरी त्या राजाच्यानें त्याला बक्षिसादाखल किंवा पदवीदाखल उंच जातींत आणून बसवितां येत नाहीं. गाढवाचा जसा घोडा होत नाहीं, तसा शूद्राचा ब्राह्मण होत नाहीं.

युरोपांतील सामाजिक किंवा व्यवहारिक भेद मनुष्यकृत आहेत, हिंदुस्थानांतील जातिभेद ईश्वरापासून आहेत असें

हिंदु लोकांचें ह्मणणें आहे. जातिभेदापासून जे वाईट परिणाम झाले आहेत त्यांपैकीं कित्येक खालीं सांगितले आहेत.

**१. जातिभेद मनुष्यजातीचें बंधुत्व कबूल करीत नाहीं.** हिंदु लोकांचा साधारण विश्वास असा आहे कीं ब्राह्मण ईश्वराच्या मुखापासून उत्पन्न झाला, क्षत्रिय त्याच्या बाहूंपासून, वैश्य त्याच्या मांड्यापासून व शूद्र पायांपासून उत्पन्न झाला. सर्व मनुष्यें एकाच स्वर्गस्थ पित्याचीं लेंकरें आहेत असें मानून त्यांशीं प्रीतीनें वागण्याबद्दल कित्येक मनुष्यें इतकीं भ्रष्ट मानिलीं आहेत कीं, उंच मानिलेल्या जातीपासून त्यांनीं अमूक अंतरावर राहिलें पाहिजे. त्यांची त्यावर सावली पडली असतां विटाळ झाला असें मानितात.

**२. जातिभेद मनुष्यामनुष्यांमध्यें मोठा अन्याय करितो.** धर्मसंहिता ह्मटली ह्मणजे तींत यथार्थ न्यायाचे कायदे असावे. परंतु मनुधर्मशास्त्राप्रमाणें स्वयंभूची उक्ति खालीं सांगितल्याप्रमाणें आहे:—

## ब्राह्मण.

९३. "ब्राह्मण, उत्तम अंग जें मुख त्यापासून झालेला आहे व सर्वांच्या पूर्वीं त्याची उत्पत्ति आहे. आणि तो वेद धारण करीत आहे, यास्तव ब्राह्मण सर्व जगाचा प्रभु होय."

१००. जें कांहीं पृथ्वीवरील धन, तें सर्व ब्राह्मणाचें स्वतांचें होय, कांकीं हा ब्रह्मदेवाच्या मुखापासून प्रथम उत्पन्न



झाला, व सर्वांहून श्रेष्ठ असल्यामुळें सर्व धनाचा स्वामी होण्यास ब्राह्मणच योग्य आहे" (मनु. अ० १).

३८०. "ब्राह्मण सर्व पापें करणारा जरी असला तथापि त्याला कदापि साक्षात् वधदंड करूं नये, तर धनसहित आणि शारीरदंडरहित असा राज्यांतून हांकलून लावावा." (अ०८).

## शूद्र.

४१३. "परंतु शूद्राकडून ब्राह्मणानें आपली सेवा करावी, मग तो त्या शूद्राला मजुरी देवो, अथवा न देवो; कारण, ब्राह्मणाचें दास्यकर्म करण्याकरितां ब्रह्मदेवानें शूद्राला उत्पन्न केलें आहे."

४१७. "ब्राह्मणानें शूद्रापासून धन ग्रहण करावें, त्याविषयीं कोणता विचार करूं नये. कांकीं शूद्राचें कोणतेंही स्वत्व नाहीं, ह्मणून ती धनरहित आहे. तो जें धन संपादन करील तें त्याचा मालक त्याचा स्वामी होतो. त्याचें धन त्याच्या स्वामीनें घ्यावें असा तो आहे." (अ० ८).

१२५. "उच्छिष्ट, जुनीं वस्त्रें, धान्याचें फोल, जुनी शय्या, आणि जुनी घराची सामुग्री, हीं सर्व आश्रित शूद्राला द्यावीं." (अ० १०).

२७०. "शूद्र द्वीजातीला (ब्राह्मण क्षत्रीय, वैश्य यांला) शिवीगाळ करील किंवा दुर्भाषण बोलेल तर तो जिव्हाछे-

हिंदु लोकांचें ह्मणणें आहे. जातिभेदापासून जे वाईट परिणाम झाले आहेत त्यांपैकीं कित्येक खालीं सांगितले आहेत.

**१. जातिभेद मनुष्यजातीचें बंधुत्व कबूल करीत नाहीं.** हिंदु लोकांचा साधारण विश्वास असा आहे कीं, ब्राह्मण ईश्वराच्या मुखापासून उत्पन्न झाला, क्षत्रिय त्याच्या बाहूंपासून, वैश्य त्याच्या मांड्यापासून व शूद्र पायांपासून उत्पन्न झाला. सर्व मनुष्यें एकाच स्वर्गस्थ पित्याचीं लेंकरें आहेत असें मानून त्यांशीं प्रीतीनें वागण्याबद्दल कित्येक मनुष्यें इतकीं भ्रष्ट मानिलीं आहेत कीं, उंच मानिलेल्या जातीपासून त्यांनीं अमूक अंतरावर राहिलें पाहिजे. त्यांची त्यावर सावली पडली असतां विटाळ झाला असें मानितात.

**२. जातिभेद मनुष्यामनुष्यांमध्यें मोठा अन्याय करितो.** धर्मसंहिता ह्मटली ह्मणजे तींत यथार्थ न्यायाचे कायदे असावे. परंतु मनुधर्मशास्त्राप्रमाणें स्वयंभूची उक्ति खालीं सांगितल्याप्रमाणें आहे:—

## ब्राह्मण.

९३. "ब्राह्मण, उत्तम अंग जें मुख त्यापासून झालेला आहे व सर्वांच्या पूर्वीं त्याची उत्पत्ति आहे. आणि तो वेद धारण करीत आहे, यास्तव ब्राह्मण सर्व जगाचा प्रभु होय.

१००. जें कांहीं पृथ्वीवरील धन, तें सर्व ब्राह्मणाचें स्वतांचें होय, कांकीं हा ब्रह्मदेवाच्या मुखापासून प्रथम उत्पन्न

झाला, व सर्वांहून श्रेष्ठ असल्यामुळें सर्व धनाचा स्वामी होण्यास ब्राह्मणच योग्य आहे" ( मनु. अ० १ ).

३८०. "ब्राह्मण सर्व पापें करणारा जरी असला तथापि त्याला कदापि साक्षात् वधदंड करूं नये, तर धनसहित आणि शारीरदंडरहित असा राज्यांतून हांकलून लावावा." ( अ०८).

## शूद्र.

४१३. "परंतु शूद्राकडून ब्राह्मणानें आपली सेवा करावी, मग तो त्या शूद्राला मजुरी देवो, अथवा न देवो; कारण, ब्राह्मणाचें दास्यकर्म करण्याकरितां ब्रह्म देवानें शूद्राला उत्पन्न केलें आहे."

४१७. "ब्राह्मणानें शूद्रापासून धन ग्रहण करावें, त्याविषयीं कोणता विचार करूं नये. कांकीं शूद्राचें कोणतेंही स्वत्व नाहीं, ह्मणून ती धनरहित आहे. तो जें धन संपादन करील तें त्याचा मालक त्याचा स्वामी होतो. त्याचें धन त्याच्या स्वामीनें घ्यावें असा तो आहे." ( अ० ८ ).

१२५. "उच्छिष्ट, जुनीं वस्त्रें, धान्याचें फोल, जुनी शय्या, आणि जुनी घराची सामुग्री, हीं सर्व आश्रित शूद्राला द्यावीं." ( अ० १० ).

२७०. "शूद्र द्वीजातीला ( ब्राह्मण क्षत्रीय, वैश्य यांला ) शिवीगाळ करील किंवा दुर्भाषण बोलेल तर तो जिव्हाछे-

दास पात्र होईल; कारण तो (शूद्र) निकृष्ट अंग जे पा
त्यांपासून झालेला आहे."

१८१. नीच जाति मनुष्य उत्कृष्ट जाति मनुष्याबरोब
एकासनावर बसेल तर त्याचे कटि प्रदेशावर तप्त लोखं-
डाचा डाग देऊन घालवून लावावा, अथवा जेणेंकरून तो
मरणार नाहीं त्याचे कटिपश्चाद्भाग ( कुले ) कापावें.
( अ० ८ ).

८०. शूद्राला माति ( दृष्टार्थोपदेश—मसलत ) देऊं नये,
त्याला उच्छिष्ट देऊं नये, होम करून शेष राहिलेलें हवि
( होमाचें द्रव्य, चरू—भात इ० ) देऊं नये, धर्म आणि
प्रायश्चित्तरूप व्रतें यांचा उपदेश करूं नये.

८१. या कारणास्तव जो पुरुष धर्म, आणि व्रतें यांचा
उपदेश शूद्राला करितो, तो त्या शूद्रासहवर्त्तमान असंवृत्त
( आर्यादि ) नामक गहन नरकाप्रत जातो ( अ० ४ ).

कोणीही वरील वचनें वाचून जातिभेद हा न्याय व सत्य
यांच्या आधारावर स्थापिला आहे काय याचा विचार करा-
वा. तर धूर्त्त मनुष्यांनीं इतर मनुष्यांस गुलामगिरींत ठेवण्या-
करितां तो उत्पन्न केला आहे.

**३. व्यक्तीचें स्वातंत्र्य दाबून टाकिलें आहे.** हिंदु-
धर्मानें "एक सहस्र व एक" नियम केले आहेत, ते
बहुतकरून सर्वच पोरकट व क्षुल्लक असून त्यांतून कित्येक
तर बहुत दुःखाचे पुढारी आहेत. जातीचें कोणी एकानें

यथार्थ वर्णन केलें आहे तें असें कीं, तिच्यासारिखा पराकाष्ठेचा जुलमी व मनुष्यांच्या मानेवर जूं ठेवून काम घेणारा असा मुकद्दम आजपर्यंत कोणी झाला नाहीं." आनरेबल मि० रानडे जातिभेदास फकीर लोक अंगावर जड लोखंडाच्या साखळ्या घेतात त्यांची उपमा देतात.

"इंदुप्रकाश" नामक वर्त्तमानपत्राचे कर्त्ते असें ह्मणतात कीं, कोणी ब्राह्मण अन्यजातीच्या मनुष्यांबरोबर भोजन करायास इच्छितो काय ? त्या उभयतांची कितीही दाट मैत्री असली तरी, जात ह्मणते "नाहीं, तूं तसें करूं नयेस. केलेस तर तुला वाळींत घालीन. ब्राह्मणास तहान लागली, आणि शूद्रानें आणिलेल्या पाण्याशिवाय त्यापाशीं दुसरें पाणी नसलें तर त्याच्यानें तें पिववणार नाहीं, कारण जर तो पिईल तर त्याला जातिबहिष्काराचा दंड सोसावा लागेल." दुष्काळांत लोक भुकेनें मरत असतांही त्यांनीं युरोपियन लोकांनीं शिजविलेलें अन्न घेतलें नाहीं.

परंतु लोकांस **धर्मसंबंधी** स्वतंत्रता नसल्यापासून जे परिणाम होतात ते वर सांगितल्यापेक्षांही वाईट आहेत. तेणेंकरून शिकलेले लोक भित्रेपणानें ढोंगी होतात. असें मागें सांगितलेंच आहे; आणि साधारण लोकांच्या अंगीं अंधळा मतवाद मात्र भरून राहिला आहे.

**४. सामाजिक सुधारणेशीं वैर.**—हिंदुस्थान देश कोणकोणत्या मुख्य सामाजिक संकटांत पडला आहे ?

स्त्रीशिक्षणाची उपेक्षा, बालविवाह, विधवांची निष्ठूरतेची वागणूक; आणि लग्नसंबंधी उधळेपणाचे खर्च. पुढील उतारा इंदुप्रकाशांतून घेतला आहे.

"आपल्या कन्येचा विवाह प्रौढ व लग्नास योग्य अशा वयांत करावा असें कोणी ब्राह्मण इच्छितो काय? त्यापुढें जातिरूपी जुलमी राक्षसी येऊन ह्मणते कीं, तुला जर जातीचा बहिष्कार गोड वाटत असला तर मात्र आपली कन्या ८ किंवा १० वर्षांच्या वर अविवाहित ठेव. कोणी मनुष्य जन्मवर दुःखसागरांत पडलेल्या आठ दाहा वर्षांच्या बाल विधवांचें लग्न करण्याविषयीं दुसऱ्यास शब्दानें किंवा करणीनें पाठबळ देतो तर जात त्याला ह्मणती, खबरदार, असें करशील तर मी तुला बहिष्कार घालीन. कोणी मनुष्य अर्थहीन व मूर्तिपूजेसंबंधी क्रियाकर्मांकडून हिंदुसमाजास त्रासून गेला व त्यांपैकीं कांहीं सोडूं इच्छितो तर जात ह्मणते, नाहीं, तुला बहिष्कार घातला पाहिजे.

**५. एका दुष्ट लबाडीला ईश्वराज्ञा प्रमाण आहे असें ह्मटले आहे.**— ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखापासून झाले, क्षत्रिय त्याच्या बाहुपासून, वैश्य मांड्यापासून, आणि शूद्र पायांपासून झाले असें हिंदुशास्त्र ह्मणतें. गीतेंत कृष्ण ह्मणतो कीं, चाऱ्ही वर्ण मी उत्पन्न केलें. ज्या संस्थेस सर एच. एस. मेन हे आपल्या "प्राचीन धर्मशास्त्र" नामक ग्रंथांत असें ह्मणतात कीं, "अति अनर्थकारक व क्षयका-

एक ती ही जात आहे. प्रिन्सिपाल केर्ड ह्मणतात कीं, तिच्या पोटीं मनुष्य जातीनें केलेल्या अति वाईट अन्यायांपैकीं एक आहे, तो हाच कीं, धर्माचा अधिकार व प्रमाण दाखवून पाप पवित्र मानिलें आहे."

बाबु केशव चंद्रसेन ह्यांनीं "Appeal to young India" नामक एक पुस्तक लिहिलें आहे त्यांत ते असें ह्मणतात कीं, "हिंदु लोकांतील जातिभेद ही भयंकर सामाजिक पीडा आहे. याविषयीं कोणाच्यानें नाहीं ह्मणवणार नाहीं. त्यानें लोकांतील ऐक्य, स्नेहभाव व सुख यांचा सत्यानाश केला आहे. हा जातिभेद शेंकडो वर्षांपासून देशाच्या उत्कर्षास अवरोध करीत आला आहे. हा भेद अशा प्रकारें राष्ट्रास पीडक होण्याचें कारण हेंच कीं, त्याचा संबंध धर्माकडे आहे; परंतु असें थोडकेच लोक समजतात. बहुत लोकांचा असा समज आहे कीं, हा केवळ सामाजिक भेद आहे. मनुष्यसमाजामध्यें अशा प्रकारचे असमंजस भेद असणें हें तर खरोखर अपकारक आहे यांत संशय नाहींच, परंतु जेव्हां आपण नीतिदृष्टया त्याचा विचार करितो तेव्हां तो आपल्या विवेकाला कलंक लावणारा व मनुष्य जातीचा अनादर करणारा असा दिसून येतो. आणि आमच्या सर्व नीतिविषयक कल्पना व भावना त्याला शाप देण्यास व त्याचा तत्काल उच्छेद व्हावा असें ह्मणण्यास उभ्या राहतात. जातिभेद हिंदुलोकांच्या मूर्त्तिपूजेचे आश्रयस्थान व ब्राह्मणाच्या

उपाध्येपणाचें रक्षण आहे. सर्व मनुष्यें परस्पराचे बंधु आहेत असा जो ईश्वरी नियम त्या नियमाचें ह्या जातिभेदानें मोठ्या धिटाईनें व देवस्वोपाहारबुद्धीनें उल्लंघन केलें आहे. त्यानें व्यवहारांतील भेद अनुलंघ्य ईश्वरी स्थापित विधि असे करून ठेविले आहेत. आणि पवित्र देवाच्या नांवें त्याच्या लेंकरांमध्यें सतत कलह व वैर पेटवून दिलें आहे. त्यानें एका वर्गाच्या लोकांस दुसऱ्या वर्गाच्या लोकांपेक्षां श्रेष्ठ केलें आहे. आणि श्रेष्ठ मानिलेल्या वर्गास ईश्वराच्या अनुमतानें विद्याशिक्षण, धर्म व सामाजिक श्रेष्ठत्वाचे सर्व लाभ यांचा एकाधिकार दिला आहे, आणि त्यांच्या हातीं लक्षावधि लाचार प्राण्यांवर जुलूम करण्याची, त्यांस पादाक्रांत करण्याची व गुलामगिरींत ठेवण्याची सत्ता दिली आहे. त्यानें ब्राह्मण वर्गास ईश्वराचें प्रतिनिधित्व देऊन इतर मनुष्यसमुदायाच्या कपाळीं नीचत्वाचा व अमंगलपणाचा टिक्का लावून ते मनुष्य जातीस अयोग्य व स्वर्गप्राप्तीस अपात्र असें करून ठेविलें आहेत.

## ८. स्त्रियांचा मानभंग व त्यांची क्रूर वागणूक.

बळी तो कानपिळी ह्या म्हणीप्रमाणें जे बलिष्ठ आहेत ते बहुधा दुर्बलांवर जुलूम करितात. रानटी लोकांमध्यें बायका सर्व काबाड काम करितात. आणि मनुष्यें जेव्हां लढाई नसतें तेव्हां तंबाखू ओढण्यांत, दारु पिण्यांत किंवा

झोपा घेण्यांत आपला वेळ खर्चितात. हिंदु लोक त्यांच्या-पेक्षां सुधारणेच्या उंच पायरीवर येऊन पोंचले आहेत परंतु ज्या रीतीनें ते आपल्या स्त्रियांस वागावितात ती पाहिली असतां ते बहुतेक अंशीं अद्याप त्या रानटी लोकांच्या सारिखेच आहेत असें ह्मणावें लागतें. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळांपासून पुरुषांनीं आपमतलबाकरितां स्त्रियांस त्यांचे सर्व हक्क सोडून देण्यास व त्यांचे पति व धनी यांस सर्वस्वी वश होण्यास शिकविलें आहे.

हिंदुलोकांनीं आपल्या स्त्रियांस विद्या शिकविली नाहीं यांत त्यांनीं त्यांचा मोठा अन्याय केला. हिंदुधर्मांत जितक्या युक्ति आहेत त्यांचा ह्या युक्तीनें कळस केला. स्त्रियांस अज्ञानांत ठेविलें ह्मणजे ब्राह्मणाच्या महत्वाविषयीं कशाही अकटोविकट कहाण्या त्यांस सांगितल्या असतां त्या त्यांस जिरणीस पडतात, आणि कोणतींहा अतिभक्तीचीं व भोळे-णाची व्रतें व कर्में त्यांस आज्ञापिलीं तरी त्यांचें त्या अति उत्कंठेनें पालन करितात.

स्त्रियांचा सन्मान करावा असें एका ठिकाणीं सांगितलें आहे खरें! पण तेंही स्वार्थाकरितां आहे. ज्यास संपत्ति किंवा भाग्याची इच्छा असेल त्यांनीं तसें करावें. याविषयीं मनु असें ह्मणतो कीं,

"आपणास बहुत धनसंपत्ति प्राप्त व्हावी अशा कल्याणाची इच्छा करणारे कन्येचे पिता, माता, भ्राते, पति आणि दीर यांनीं त्यांचा सन्मान करावा."

या कारणास्तव ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं सणाच्या दिवशीं व लग्न मौंजी इत्यादि दिवशीं स्त्रियांला अलंकार व वस्त्रें, मिष्टान्नें देऊन त्यांचा सन्मान करावा. (अ० ३. ५५, ५९).

**स्त्रीयांवर दुर्गुणांचा आरोप.** एका इंग्लिश प्रवाशाला हिंदुस्थानांत कोणी असें सांगितलें कीं, हिंदुलोकांचें दोन गोष्टींविषयीं एक मत आहे. त्या ह्या कीं, "गायीची पवित्रता व स्त्रियांची भ्रष्टता." ऋग्वेदांत इंद्राच्या मुखांत पुढील शब्द घातले आहेत:—"इंद्रानें ह्मटलें आहे कीं, स्त्रिच्या मनाला शिक्षण सोसत नाहीं. तिच्या बुद्धीला वजन नाहीं (८. ३३. १७).

मनूचें मत तर ह्यापेक्षांहीं वाईट आहे:— "शय्या, आसन, अलंकार, काम, क्रोध, कठोरपणा, द्वेषभाग, कुत्सिताचार हे सर्व स्त्रियांसाठीं आरंभीं मनूनें (सृष्टिकर्त्यानें) नेमिले" (९. १७).

ह्यांपैकीं पाहिल्या तीन गुणांच्या पोटीं झोपेची आवड, आळशीपणा व दिमाख हे येतात. आणि हे सर्व गुण सृष्टिकर्त्यानें नेमिले असें ह्मणणें निंदात्मक आहे.

**स्त्रियांस सर्वदां दाबांत ठेवणें.**—पुरुषांनीं रात्रंदिवस स्त्रियांस अस्वतंत्र (पराधीन) ह्मणजे आपल्या आज्ञेंत ठेवाव्या, त्या विषयासक्त जरी आहेत तथापि आपल्या स्वाधीन गृहकृत्यांविषयीं तत्पर राखाव्या.

"बाल्यावस्थेचे ठायीं विवाहाचे पूर्वी पिता रक्षण करतो, तरुणावस्थेचे ठायीं भर्त्ता रक्षण करितो, वृद्धावस्थेचे ठायीं पुत्र रक्षण करितात, तस्मात स्त्री स्वातंत्र्यानें राहण्यास योग्य नाहीं" (९. २, ३).

**शिक्षा करण्याचा अधिकार.** कलकत्यांत एकदां हिंदु-लोकाच्या लग्नाच्या चालीविषयीं विचार करण्यास्तव एक सभा झाली होती, त्या प्रसंगीं पुढील वचन कोणी एकानें ह्मणून दाखविलें. "बायकांनीं शंभर अपराध केले तरी तिला फुलानें देखील मारूं नकोस." परंतु "अत्यंत प्रमाण भूत" जो मनु, ज्याचें वचन "अत्युत्तम" औषध आहे (मनुर्वैय त्किंचिद व दत्तद्भेषजं भेषजता या इति) तो ह्मणतो कीं,

"भार्या, पुत्र, दास, शिष्य, सहोदर भ्राता (सखा भाऊ) यांपासून अपराध होईल तर दोरी किंवा बांबूची काठी यांहीं करून यांला ताडन करावें, परंतु तें शरीराच्या मागच्या प्रदेशीं पाठीवर करावें; याहून अन्य प्रदेशीं ताडन करील, तर चोरासारिखा अपराधी होईल" (८. २९९, ३००).

**नवरा बायकोच्या देवासमान आहे.** "सदाचार-शून्य, दुसऱ्या स्त्रीचे ठायीं लंपट किंवा गुणांनीं हीन असा जरी असेल तथापि साध्वी स्त्रीनें देवाप्रमाणें सेवा करावी" (५. १५४).

**स्त्रियांस धर्मकृत्यें नाहींत.**—" स्त्रियांचे ( विवाहविधि खेरीज करून ) जातकादि संस्कार मंत्रांनीं करूं नयेत, अशी शास्त्रमर्यादा व्यवस्थित आहे. धर्मप्रमाण मंत्र यांहीं-करून स्त्रिया विरहित असून अनृताप्रमाणें अशुभ होत अशी शास्त्रमर्यादा आहे " ( ९. १८ ).

पुढील वचन स्कंध पुराणांतील आहे:—

" जी स्त्री धर्मकृत्यें करूं इच्छिती तिनें आपल्या पतीचे पाय धुवून तें पाणी प्यावें; कारण पति स्त्रीला शिव किंवा विष्णु यांच्याहून श्रेष्ठ आहे. पति हा तिचा देव, उपाध्या, आणि धर्म होय. यास्तव इतर सर्व गोष्टींचा त्याग करून तिनें आपल्या पतीची सेवा मुख्यत्वें करावी " ( ४. ३९ ).

**हिंदु विधवा.**—हिंदुस्थानांत स्त्रियांच्या संख्येच्या परि-माणाप्रमाणें पाहिलें असतां विधवांची संख्या पुष्कळ आहे. ही गोष्ट ह्या देशासच विशेषेंकरून लागू आहे. सन १८८१ सालांत सुमारें दोन कोटी ४० लक्ष विधवा ह्या देशांत होत्या. या संख्येप्रमाणें प्रत्येक ९ स्त्रियांत एक विधवा आहे असें सिद्ध होतें; आणि पुरुषामध्यें २० जणांत एक विधुर आहे. ह्याची दोन कारणें आहेत; ह्मणजे बालविवाह व उंच जातीच्या लोकांत पुनर्विवाहाविरुद्ध बळकट मनोवृत्ति आणि हलक्या ह्मटलल्या जातीची उंच जातीच्या रीतीभातीची नकल उतरण्याकडे प्रवृत्ति असल्यामुळें त्या लोकांचेंही वि-धवा विवाहाविषयीं प्रतिकूल मत आहे.

विधवांची वागणूक सर्व कुटुंबांत सारखी नाहीं. विधवा आपल्या माहेरीं असल्या तर त्यांस फारसें दुःख भोगावें लागत नाहीं. परंतु साधारण नियम असा आहे कीं, त्यांस आपलें उरलेलें आयुष्य सासऱ्याच्या घरांत घालवावें लागतें. तेथें त्यांस वैधव्याच्या दुःखाखेरीज गुलामाप्रमाणें राबून काबाडकष्ट करायास लावितात.

बंगाल्याकडे पंडित ईश्वरचंद्र नामक एक प्रख्यात संस्कृत विद्वान होऊन गेले, त्यांनीं "हिंदु विधवांच्या लग्नाविषयीं विनंती" (Appeal on the Marriage of Hindu Widows) नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत पुढील वचन अढळतें:—

"बालविधवांस जीं असह्य दुःखें भोगावीं लागतात त्यांची पुरती कल्पना ज्यांच्या कन्या, बहिणी, सुना व इतर स्त्रीआप्त बालपणांत वैधव्यदशेंत पडलीं आहेत त्यांसच मात्र करितां येईल."

तरुण विधवेनें जाडेंभरडें वस्त्र नेसलें पाहिजे, आणि कांहीं अलंकार घालूं नयेत. तिनें महिन्यांतून दोनदां एकादशीचें कडकडीत उपोषण चोवीस तास केलें पाहिजे. लग्नकार्यादि शुभकार्यांच्या दिवशीं तिचें तोंड पाहणें अत्यंत अशुभ मानिलें आहे. तिच्या स्पर्शानें देखील विटाळ होतो. तिच्या दुःखाचें सांत्वन करण्याबद्दल "तूं पूर्वजन्मीं मोठें पाप केलेंस ह्मणून आतां तूं रांडकी झालीस," असें

**स्त्रियांस धर्मकृत्यें नाहींत.**—" स्त्रियांचे ( विवाहविधि खेरीज करून ) जातकादि संस्कार मंत्रांनीं करूं नयेत, अशी शास्त्रमर्यादा व्यवस्थित आहे. धर्मप्रमाण मंत्र यांहीं करून स्त्रिया विरहित असून अनृताप्रमाणें अशुभ होत अशी शास्त्रमर्यादा आहे " ( ९. १८ ).

पुढील वचन स्कंध पुराणांतील आहे:—

" जी स्त्री धर्मकृत्यें करूं इच्छिती तिनें आपल्या पतीचे पाय धुवून तें पाणी प्यावें; कारण पति स्त्रीला शिव किंवा विष्णु यांच्याहून श्रेष्ठ आहे. पति हा तिचा देव, उपाध्या, आणि धर्म होय. यास्तव इतर सर्व गोष्टींचा त्याग करून तिनें आपल्या पतीची सेवा मुख्यत्वें करावी " ( ४. ३९ ).

**हिंदु विधवा.**—हिंदुस्थानांत स्त्रियांच्या संख्येच्या परिमाणाप्रमाणें पाहिलें असतां विधवांची संख्या पुष्कळ आहे. ही गोष्ट ह्या देशासच विशेषेंकरून लागूं आहे. सन १८८१ सालांत सुमारें दोन कोटी ४० लक्ष विधवा ह्या देशांत होत्या. या संख्येप्रमाणें प्रत्येक ९ स्त्रियांत एक विधवा आहे असें सिद्ध होतें; आणि पुरुषामध्यें २० जणांत एक विधुर आहे. ह्याची दोन कारणें आहेत; ह्मणजे बालविवाह व उंच जातीच्या लोकांत पुनर्विवाहाविरुद्ध बळकट मनोवृत्ति आणि हलक्या ह्मटलल्या जातीची उंच जातीच्या रीतीभातीची नकल उतरण्याकडे प्रवृत्ति असल्यामुळें त्या लोकांचेंही विधवा विवाहाविषयीं प्रतिकूल मत आहे.



विधवांची वागणूक सर्व कुटुंबांत सारखी नाहीं. विधवा आपल्या माहेरीं असल्या तर त्यांस फारसें दुःख भोगावें लागत नाहीं. परंतु साधारण नियम असा आहे कीं, त्यांस आपलें उरलेलें आयुष्य सासऱ्याच्या घरांत घालवावें लागतें. तेथें त्यांस वैधव्याच्या दुःखाखेरीज गुलामाप्रमाणें राबून काबाडकष्ट करायास लावितात.

बंगाल्याकडे पंडित ईश्वरचंद्र नामक एक प्रख्यात संस्कृत विद्वान होऊन गेले, त्यांनीं " हिंदु विधवांच्या लग्नाविषयीं विनंती " ( Appeal on the Marriage of Hindu Widows ) नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्यांत पुढील वचन अढळतें:—

" बालविधवांस जीं असह्य दुःखें भोगावीं लागतात त्यांची पुरती कल्पना ज्यांच्या कन्या, बहिणी, सुना व इतर स्त्रीआप्त बालपणांत वैधव्यदशेंत पडलीं आहेत त्यांसच मात्र करितां येईल."

तरुण विधवेनें जाडेंभरडें वस्त्र नेसलें पाहिजे, आणि कांहीं अलंकार घालूं नयेत. तिनें महिन्यांतून दोनदां एकादशीचें कडकडीत उपोषण चोवीस तास केलें पाहिजे. लग्नकार्यादि शुभकार्याच्या दिवशीं तिचें तोंड पाहणें अत्यंत अशुभ मानिलें आहे. तिच्या स्पर्शानें देखील विटाळ होतो. तिच्या दुःखाचें सांत्वन करण्याबद्दल " तूं पूर्वजन्मीं मोठें पाप केलेंस ह्मणून आतां तूं रांडकी झालीस," असें

ह्मणतात. कित्येक विधवा कसबिणी होतात, व कित्येक गर्भपात किंवा बालहत्या करितात.

स्त्रियांस क्रूर रीतीनें वागविण्याचा कळस त्यांस जीवंत जाळण्याच्या चालीनें केला. माता विधवा झाल्या असतां पुत्रांनीं त्यांस जीवंत भाजावें ही कल्पना देखील मनांत आणणें भयंकर आहे. तथापि हा अधिकार आपणास असावा ह्मणून या १९ व्या शतकांत हिंदु लोकांनीं सरकाराशीं मोठ्या उत्कंठेनें भांडण केलें.

विधवांनीं अशा प्रकारचे क्रूर मरणानें मरायास मान्य व्हावें ह्मणून त्यांचें जिणें जितकें कडू करवेल तितकें केलें. इतकेंही बस नव्हतें, ह्मणून त्यांस असें सांगत कीं, त्या आपल्या मृत पतीसमागमें जळून मेल्या तर त्या मोठ्या पतिव्रता अशा मानिल्या जातील इतकेंच नव्हे, तर परलोकीं अगणित युगें त्यांच्यासंगतीं सुख भोगतील.

"जी स्त्री आपल्या पतीच्या प्रेतासहवर्त्तमान अग्नीप्रवेश करिती ती अरुंधतीसमान होऊन स्वर्गाच्या ठायीं वास करिती."

"ती आपल्या पतिसहवर्त्तमान मनुष्याच्या शरीरावर ३५,०००००० केश आहेत तितकी संख्या वर्षें स्वर्गांत राहील.

हें सतीचें व्रत न पाळण्याचा दुष्परिणाम येणेंप्रमाणें सांगितला आहे.

"पति मरणानंतर जोंपर्यंत स्त्री पतिसह आपणास जाळून घेत नाहीं तोंपर्यंत ती जन्मोजन्मीं स्त्रीच होईल."

अशा प्रकारच्या खोट्या आशेमुळें व दुःखाचा जन्म चुकविण्याकरितां पुष्कळ विधवा अग्निकाष्ठें भक्षण करायास मान्य होतात. सन १८१७ सालीं असा अजमास होता कीं, बंगाल प्रांतांत दररोज दोन विधवा सती जात.

सन १८२९ सालीं हिंदुस्थानचे गवरनर जनरल लॉर्ड उलियम बेन्टिक यांनीं योग्य तपास केल्यावर सती जाण्याची चाल बेकायदा व फौजदारी खटल्यांत शिक्षेस पात्र आहे असा कायदा ठरविला. त्यावरून हिंदु लोकांनीं मोठी ओरड केली. त्यांनीं सरकाराला अर्जी केली, तींत असा मजकूर होता कीं, सती जाणें हें केवळ धर्मकृत्य आहे इतकेंच नव्हे, तर त्यांत श्रेष्ठ मान आहे, आणि ती बंद करण्याचा कायदा केल्यानें हिंदु लोकांच्या धर्मसंबंधीं चालींत आह्मी हात घालणार नाहीं असें जें सरकारानें वचन दिलें आहे त्याचा भंग होतो.

## ९. मनुष्यास पशुसमान केलें आहे.

हिंदुधर्माप्रमाणें सर्व जीवंत प्राणी सारखेच अनादि असून ते अनंत योनींत जन्म पावत आहेत. "मी सांप्रत बुद्धिसंपन्न मनुष्य आहें; परंतु लवकरच कदाचित् मी किचकिचणारा माकड होईन. मी ह्या काळीं कोमल

हृदयाची स्त्री आहें, परंतु लवकरच मी कदाचित् बुभुक्षित लांडगी होईन. मी आतां विद्यार्थी मुलगा आहें परंतु पुढल्या वर्षी कदाचित् मी निर्बुद्ध टोणग्याच्या जन्मास जाईन. मी आतां खेळकर मुलगी आहें, परंतु न जाणो पुढल्या जन्मीं मी टणाटण उड्या मारणारी शेळी किंवा बोकड होईन. तो पिरपिरा कावळा कदाचित् माझा मेलेला बाप असेल, ती भुकेली मांजर माझी मरण पावलेली आई असेल; तो संतापलेला अस्वल कदाचित् माझा संभाळणारा भाऊ असेल. आणि तो सरपटणारा सर्प माझी मयत बहीण असेल. पशूस मनुष्याच्या बरोबरीस आणून बसविल्यानें मनुष्य पशुसमान होऊन बसला आहे.

मनूनें शूद्रहत्येचें प्रायश्चित्त खालीं सांगितलेल्या प्राण्यांच्या वधाच्या प्रायश्चित्ताप्रमाणेंच सांगितलें आहे :—

१३१. "मांजर, मुंगुस, चाष, बेडूक, कुत्रा, घोरपड, घुबड, आणि कावळा यांतून कोणाएकाचा वध केला असतां त्यानें शूद्रव्रत करावें" (अ० ११).

## १०. अनेक देवमत.

**एकदेवमत** ह्मणजे एकच ईश्वर आहे असें मानणें. **बहुदेवमत** ह्मणजे अनेक देव मानणें. हिंदुधर्म ह्मटला तर वास्तविक बहुदेवमताचा आहे. ऋग्वेदाच्या एका सूक्ताची समाप्ति येणेंप्रमाणें केली आहे :—

"मोठ्या देवांस नमस्कार असो, लहान देवांस नमस्कार असो, तरुण देवांस नमस्कार असो, म्हाताऱ्या देवांस नमस्कार असो" (अष्टक. १. सू० २७). देव अकरात्रिक (३३) आहेत असें वेदांत वारंवार ह्मटलें आहे. अग्नीची एका ठिकाणीं येणेंप्रमाणें प्रार्थना केली आहे :—"हे अग्नि, तुझ्या परिपाठाप्रमाणें ३३ देवांस त्यांच्या पत्न्यांसह एथें आणून त्यांस हर्षित कर." दुसऱ्या एका सूक्तांत त्यांची संख्या पुष्कळ आहे असें ह्मटलें आहे. "तीनशें, तीन हजार, आणि एकुणचाळीस देवांनीं अग्नीची उपासना केली."

कधीं कधीं एकाच देवाला सर्वांहून श्रेष्ठ मानिलें आहे, व तोच देव इतर देवांच्या समान लेखला आहे, व इतरांपेक्षां कनिष्ठही मानिला आहे. ज्या देवास एका ठिकाणीं दुसऱ्या देवाचा बाप ह्मटलें आहे, तोच दुसऱ्या ठिकाणीं त्या देवाचा पुत्र असा दर्शविला आहे. जो भाऊ तो पति झाला आहे. इंद्रानें तर आपल्या बापाला उत्पन्न केलें. जी देवी एका सूक्तांत एका देवाची माता आहे तीच दुसऱ्यांत त्याची स्त्री झाली आहे.

सांप्रतच्या काळांत देवांविषयीं लोकांची कल्पना अशी आहे कीं, त्यांची संख्या ३३ कोटि आहे.

कोणी असेंही ह्मणतात कीं, सर्व देव एक आहेत, त्यांचीं नांवें व भक्ति मात्र निरनिराळी आहे.

परंतु हिंदुशास्त्रांत ह्या देवांचें जें वर्णन केलें आहे, तें पाहतां हें वरील ह्मणणें अगदीं निराधार आहे असें दिसून येतें. उदाहरणार्थ, मुख्य तीन देव ह्मणजे ब्रम्हा, विष्णु व शिव ह्यांविषयीं पहा. यांचीं राहण्याचीं स्थानें, यांच्या स्त्रिया व लेंकरें, हीं अगदीं निरनिराळीं आहेत. ब्रह्मा सत्यलोकीं राहतो, असें ह्मणतात. त्याच्या बायकोचें नांव सावित्री. विष्णु वैकुंठांत राहतो. त्याला लक्ष्मी नांवाची स्त्री आहे. शिवाचें स्थान कैलास. त्याच्या बायकोचें नांव पार्वती. ह्या देवांचीं गुणकर्मेंही भिन्नभिन्न आहेत. आणि ह्यांनीं अनेक वेळां परस्परांशीं भांडण युद्ध केलें आहे. असें ह्यांचें वर्णन पुराणांतरीं अढळतें.

तेहतीस कोटि देव एकच आहेत असें जर मानावें तर हिंदुस्थानांतील २९ कोटि लोकही त्यांचीं घरेंदारें, बायकालेंकरें, कामधंदा यांसुद्धां एकच आहेत असें कां ह्मणूं नये?

साधारण लोकांपेक्षां जे विशेष बुद्धिवान आहेत ते बहुदेवमताचें मूर्खत्व प्रतिपादन करण्याकरितां मात्र असें निमित्त सांगतात. राम मोहनराय असें ह्मणतात कीं, “अनेक देव व देवी खरोखर आहेत, व ते आपापल्या स्थानीं स्वतंत्र व मुखत्यार आहेत असा हिंदु लोकांचा दृढ विश्वास आहे. ते खऱ्या देवाची आराधना न करितां ह्या देवांस प्रसन्न करयाचे उपाय करितात. त्यांच्यासाठीं त्यांनीं देवालयें बांधलीं आहेत, व त्यांच्या नांवांनीं धर्मकृत्यें करितात.”

हिंदु लोक ज्या देवांची भक्ति करितात त्या देवाचें नांव आपल्या भक्तीस देतात, जसे शिवभक्ति, विष्णुभक्ति. एका पंथाचे लोक दुसऱ्या पंथास पाखांड समजतात, आणि सर्व पंथ सारखे आहेत असें ह्मटल्यास त्यांस राग येतो.

सर मॉनेयर विलियम्स असें ह्मणतात कीं, "हिंदु लोक जिची पूजा करणार नाहींत अशी एकही वस्तु आकाशांत अथवा पृथ्वीवर नाहीं. सूर्य, चंद्र, नक्षत्रें, खडक, खोड, पाषाण, झाड, झुडपें, तृण, समुद्र, कुंडें, नद्या, त्यांची कामधंद्याचीं आऊतें, त्यांस फार उपयोगीं पडणारीं जनावरें; ज्या अपकारक सर्पादि उरोगामी जीवांस ते भितात ते; लोकोत्तर गुणसंपन्न मनुष्यें ह्मणजे वीर, सद्गुणी पुरुष ( साधुसंत ); दुर्गुणी जन देखील; बरे वाईट देव, भूत, पिशाच, प्रेत, पितर; अर्धे देव व अर्धे मनुष्य अशा योनींतील अगणित दैवतें; सप्त उर्ध्वलोक व सप्त अधोलोक–ह्या प्रत्येकांस व सर्वांस हिंदु लोकांपासून ईश्वरी मान, अथवा कमीजास्ती भक्तीचा अंश मिळतो."

"हे हिंदुस्थाना, "हे तुझे देव होत!" परंतु केवळ एकाला मात्र हिंदु लोक भजत नाहींत, तो कोण ह्मणाल, तर जो एक खरा देव, जो सकल सृष्टीचा निर्माणकर्त्ता, पालनकर्त्ता, व शास्ता तो होय.

**शिकलेले हिंदु लोक आणि मूर्त्तिपूजा.**—पुष्कळ शिकलेले हिंदु लोक मूर्त्तिपूजेच्या विधीचा कार्यभाग उच-

लितात. हें करण्याविषयीं ते असें निमित्त सांगतात कीं, मूर्त्तिसंबंधी क्रियाकर्में निरुपद्रविक परिपाठ असून ते घरांतील बायकांच्या ओढीनें चालत आले आहेत; त्यांनीं रुसूं नये ह्मणून आह्मीही त्या चालवितों.

बुद्धिवान सुशिक्षित मनुष्यानें मूर्त्तिपूजेची पाठ राखिली असतां तो खालीं सांगितलेल्या गोष्टींचा दोषी होतो:

**१. भित्रेपणाचें ढोंग.**—कोणताही धर्मविधि विश्वास नसतां ढोंगानें आचरिल्यास मनुष्यस्वभावांतील उत्तमांचा नाश होतो. धैर्य व प्रामाणिकपणा यांच्या अभावामुळें धर्माला मोठ्या ढोंगाचें रूप दिल्याचा दोष त्यांच्या पदरीं येतो.

**२. आपले नातलग व देशबांधव यांच्याशीं निर्दयपणानें वागल्याबदलचा दोष पदरीं येतो:**

हिंदुस्थानांत मूर्तिपूजेला मुख्य आश्रय ह्मटला ह्मणजे स्त्रियांचा आहे. त्या बिचाऱ्यांस ह्यापेक्षां दुसरें कांहीं चांगलें माहीत नाहीं. ह्याबद्दलची जबाबदारी व दोष मुख्यत्वेंकरून जे शिकलेले लोक आपल्या उदाहरणानें त्यांस ह्या भ्रमांत ठेवण्यास सहायभूत होतात त्यांजकडे आहे. हिंदुस्थानांतील स्त्रिया स्वभावतः बुद्धिवान व ममताळू आहेत. त्यांचे सुशिक्षित नवरे सांप्रत जसे वागतात, तसें न वागतां त्यांस मूर्तिपूजेबद्दल आपल्या स्वर्गीय पित्यास भजायास शिकविण्यास प्रीतीनें ह्मणतील, तर अज्ञान व अत्याचार यांचें राज्य लव-

करच त्यास जाईल. असा पालट करणें जसें बुद्धीला सहज समजतें तसेंच तें बुद्धीला अनुसरूनही आहे. तें इतकें सुलभ आहे कीं, लेंकरांस देखील त्याविषयीं समजून सांगतां येईल.

## ३. तो ईश्वराविरुद्ध बंडाळी केल्याचा दोषी आहे.

## ११. पशुभक्ति.

मनुष्याला पशूच्या पायां पडतां पाहणें यापेक्षां दया यायाजोग्या दुसऱ्या थोड्याच गोष्टी आहेत. तथापि पृथ्वींतील सर्व जंगली व अर्धवट सुधारलेल्या लोकांमध्यें पशुभक्ति सर्वदां चालत आली आहे.

मिसर देश जो इंग्लंद व हिंदुस्थान यांच्यामध्यें अर्ध्या वाटेवर आहे, त्यांतून नील नदी वाहते. प्राचीन मिसरी लोक पशुभक्तिविषयीं प्रसिद्ध होते. विशेषेंकरून गायी, बैल, कुत्रा, मांजर, मुंगुस, ऐबिस नामक पक्षी, घार, सुसर हीं जनावरें पवित्र व पूज्य मानिलीं होतीं. त्यांचा मोठा मान करीत. त्यांच्याकरितां मोठ्या मोलाच्या सत्रंज्या वगैरे बिछायती अंथरीत, व मंचक चवरंग वगैरे अलंकारिक सामान मांडीत. त्यांस मिष्टान्नें खायास देत. त्यांस रोग दूर होण्यासाठीं, पुत्रप्राप्तीसाठीं, अथवा दुसऱ्या कांहीं अर्थप्राप्तीसाठीं नवस करीत. ह्या जनावरांपैकीं एखादें मरण पावलें असतां

पुत्रशोकाप्रमाणें शोक करीत त्या मेलेल्या प्राण्यास वस्त्रांत गुंडाळून प्रेत रक्षण करण्यासाठीं मसाला भरणाराकडे तें घेऊन जात, त्याच्या बरोबर स्त्रिपुरुषांचा मेळा दुःखप्रदर्शनार्थ ऊर बडवीत जात असे. नंतर त्याच्या प्रेतांत देवदारूचें तेल व सुगंधित द्रव्यें लावून रक्षणाकरितां पवित्र समाधींत ठेवीत. मांजर मेलें असतां त्याच्या करितां दुःख करणारे भोंवया भादरीत, आणि कुत्रा मेल्यास सर्वांगाचें वपन करीत.

हिंदुस्थानांतील कित्येक रानटी जाती वाघाची भक्ति करितात. सर्पाची भक्ति तर साधारण आहे. विषारी नागाची विशेष पूजा करितात. हिंदुस्थानांतील मूळचे रहिवासी वानराची भक्ति करीत तीच ब्राह्मणांनीं आदरली, आणि हनुमंताला वायुपुत्र केला.

कित्येक हिंदु लोक दर अठवड्यास गायीची पूजा करितात. दुसरे तिच्या प्रित्यर्थ वर्षांतून एकदां कांहीं धर्मकृत्य करितात. तिला गौमाता ह्मणतात, व तिची अशी प्रार्थना करितात कीं, “हे माते, आह्मांवर कृपा कर. आमच्या शेताला पुष्कळ पीक येऊं दे, आह्मी तुझे दास आहोंत.”

[महाभारतांत गायीचें महात्म्य येणेंप्रमाणें सांगितलें आहे:— “गायीहून पुण्यकारक व पवित्र त्रैलोक्यांत कांहीं नाहीं. कारण सर्व भुतांची प्रतिष्ठा, परम आश्रय व पुण्यकारक

गायीच आहेत. पूर्वी गायींस शिंगें नव्हतीं. तीं आपणास असावीं ह्मणून गायींनीं ब्रह्मदेवाची उपासना केली त्याकालीं ब्रह्मदेवानें त्यांस शृंगें दिलीं. जे साधु ब्राह्मणास गोदान करितात ते गोलोकास जातात. तेथें ते अप्सरांशीं क्रीडा करीत रमतात. गायींचें उष्ण मूत्र तीन दिवस, उष्ण दुग्ध तीन दिवस, उष्ण दुग्ध व घृत असें तीन दिवस अशा क्रमानें पंधरा दिवस आहार करणारा पुरुष ब्रह्महत्यासमान पातकापासून मुक्त होतो. हें गोव्रत करणारा पुरुष पुत्र, धन इ० सर्व मनोरथांस पावतो. तशीच पतीची इच्छा करणारी स्त्री तिला सुंदर पति प्राप्त होतो, कारण सेवा करणाऱ्या पुरुषांस व स्त्रियांस गायी संतुष्ट होऊन त्यांचे मनोरथ पूर्ण करितात. (भारतसार—अनुशासन पर्व अ० ८१).]

पशुभक्तीच्या अति नीच पदापर्यंत हिंदु लोक जाऊन पोंचले आहेत. गायीचें मलमूत्रदेखील ते पवित्र मानितात. तिचें मूत्र सर्व तीर्थांमध्यें उत्तम आहे. ज्या वस्तूला त्याचा स्पर्श होतो ती शुद्ध होती असा हा पदार्थ आहे. गायीचें शेणही असेंच गुणाकारी आहे. हा पवित्र पदार्थ जाळून त्याचें जें भस्म करितात त्याच्यामध्यें अशी पवित्रकारक शक्ति आहे कीं, तें कसल्याही दुर्जनावर शिंपडलें ह्मणजे तो साधु होतो. पंचगव्याची गोळी घेतल्यानें विलायतेस जाऊन आल्याच्या विटाळापासून ब्राह्मण मुक्त होतो.

## १२. मूर्त्तिपूजा.

मूर्त्तिपूजा ह्मणजे मूर्त्तींच्या द्वारें देवाचें भजन करणें. रानटी लोक बहुधा एखाद्या दगडाची किंवा दुसऱ्या कोणत्या तरी मूळ स्थितींतील वस्तूची पूजा करितात. अर्धवट सुधारलेलीं राष्ट्रें बहुधा मूर्त्तींची पूजा करितात. दगडाचें रूप बदलून त्याची मूर्त्ति घडण्यास फार काळ किंवा कौशल्य लागत नाहीं. त्याच्या थोड्याशा चिपा तासून काढिल्या किंवा त्याजवर शेंदूर थापला ह्मणजे ओबडधोबड धोंडीची मूर्त्ति ( देवता ) बनते. हिंदुस्थान देश मूर्त्तींनीं भरला आहे असें ह्मणावें लागतें. त्या बहुतकरून सर्व हिंदूंच्या घरांत आहेतच.

मूर्त्तिपूजेबद्दल हिंदु लोक अनेक निमित्तें सांगतात. कित्येक असें ह्मणतात कीं, ईश्वराची आठवण होण्याकरितां मात्र आह्मी मूर्त्ति करितों.

जर कोणी मुलानें आपल्या बापाच्या आठवणीकरितां एक डुकर पाळला तर हें त्याचें करणें योग्य होईल काय? तेणेंकरून बापाला संतोष होईल काय? देवाची मूर्त्ति करणें हें तर यापेक्षां अत्यंत वाईट आहे.

परंतु देवाच्या आठवणीकरितां मात्र मूर्त्ति करितात असें ह्मणणें खरें नाहीं. जेव्हां कोणी हिंदु एखादी मूर्त्ति विकत घेतो अथवा ती करवितो तेव्हां तो तिची ब्राह्मणाकडून मंत्रादिकांनीं

प्राणप्रतिष्ठा करवितो. तेणेंकरून तिचे गुण बदलून तिच्यांत प्राण ( देवत्व ) येतो इतकेंच नाहीं, तर तिच्या ठायीं अद्भुत शक्ति येती असा त्याचा विश्वास असतो.

युरोपियन लोक थोर पुरुषांचे व स्त्रियांचे पुतळे करितात, परंतु ते त्याची प्राणप्रतिष्ठा करीत नाहींत, अथवा त्यांच्या पायां पडत नाहींत.

दुसरें एक कारण असें सांगतात कीं, अज्ञानी मनुष्यांकरितां मूर्त्तिपूजा करण्यास हरकत नाहीं.

ह्यास असें उत्तर आहे कीं, तुर्कस्थानांतील मुसलमान लोकांत व युरोपांतील प्राटेस्टंट ख्रिस्ती लोक यांतील थोरांपासून लहानांपर्यंत कोणासही देवाच्या भक्तीसाठीं मूर्त्तीचें प्रयोजन लागत नाहीं हें कसें? अज्ञानी लोकांस देवाची आठवण होण्याकरितां मूर्त्तीची गरज लागत नाहीं. त्यांस देवाचा आकार समजत नाहीं. कारण तो निराकार आहे. त्यांस आपलीं आईबापें दूर असलीं तर त्यांची आठवण करितां येते. ज्या आपल्या उपकारकर्त्यास त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं त्यावर देखील त्यांस प्रीति करितां येते; विक्टोरिया महाराणी जरी त्यांच्या देशांत कधीं आली नाहीं तरी त्यांस तिचा हुकूम मानितां येतो. देव आत्मरूपी आहे, त्याला त्यांच्यानें आत्म्यानें व सत्यतेनें भजतां येतें. मूर्त्तिकडून खऱ्या भक्तीला अवरोध मात्र होतो, सहाय होत नाहीं. त्याकडून ईश्वराविषयीं अतिनीच कल्पना मनांत येतात.

**मूर्त्तिपूजेचा नीच परिणाम:**—गीतेंत कृष्ण ह्मणतो कीं, "मूर्त्त वस्तूचें नित्यध्यान केल्यानें मन पंचभूतात्मक होतें." जे लोक निर्बुद्ध मूर्त्तीची भक्ति करितात ते शेवटीं तिच्या सारखेच होतात. त्यांस त्यांचे धर्मगुरु पाहिजे तसे फसवितात व ठकवितात, परंतु त्यांची ठकबाजी त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

ईश्वर स्वयंभू, निर्विकार, अनंत शक्तिमान, परम ज्ञानी, परम दयाळू असा आहे, त्याची पवित्रता निष्कलंक आहे. असें असतां त्याच्या स्थानीं लोक कोणाची भक्ति करितात. निर्बुद्ध काष्ठपाषाण, अंधळेबहिरे, व मुके असे पशु, पक्षी, आणि सरपटणारे जीव, बीभत्स लिंग, आणि सर्व दुर्गुणांनीं दूषित अशा कल्पित दैवतांची भक्ति करितात.

## १३. अद्वैत मत.

अद्वैतमत ह्मणजे विश्वमात्र देव आहे असें मानणें. छांदोग्य उपनिषदांत असें ह्मटलें आहे कीं, "सर्व खल्विदं ब्रह्म": हें सकल विश्व वस्तुमात्र निश्चयेंकरून ब्रह्मच आहे. दुसरें एक वाक्य असें आहे कीं, "एकमेवाद्वितियम्": एकावांचून दुसरा नाहीं. ह्या वाक्याचा कित्येक हिंदुधर्म सुधारक असा अर्थ करितात कीं, एकावांचून दुसरा देव नाहीं, परंतु हा खरा अर्थ नाहीं. खरा अर्थ असा कीं, एकावांचून दुसरी वस्तु नाहीं.



हिंदु लोक एकाच वेळीं अद्वैतवादी व बहुदेवमतवादी आहेत. एकच देव आहे असें सर्व हिंदु कबूल करितात, तरी दुसरेही देव तोच देव आहे असें समजून त्याची पूजा करितात.

वेदांत माताचें महावाक्य "तत् त्वं असि" (तत्वमसि) हें आहे. याचा अर्थ तें तूं आहेस. ह्मणजे "अहं ब्रह्मास्मि": मी ब्रह्म आहें असा होतो. नीच, पापी व पामर मर्त्यानें असें बोलावें हें देवनिंदात्मक महा दुर्भाषण व महा पातक होय. अंधार जसा प्रकाशाहून भिन्न आहे तसे आह्मी ईश्वरापासून भिन्न आहों.

जर मनुष्य ब्रह्म आहे तर कुत्रा, मांजर कोंबडी, डुकर, पिसूं हीं देखील ब्रह्म आहेत. हें सर्व विश्व ब्रह्म आहे तर ब्रह्म पाप करितें, तें चोरी करितें, लबाडी करितें, आणि नरहत्याही करितें असें ह्मटलें पाहिजे, कारण मनुष्य हीं सर्व कर्में करितात. ह्या मताकडून ईश्वर सर्व पापाचा कर्त्ता होतो; व तो आमच्या पेक्षांही अत्यंत दुष्ट आहे असा निर्णय होतो.

ईश्वर सर्वत्र आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु त्यावरून वस्तु ईश्वर आहे असें सिद्ध होत नाहीं. ब्रह्म आणि जगत् हीं अभिन्न व एक आहेत तर सृष्टिकर्त्ता व सृष्टपदार्थ यांजमध्यें कांहीं भेद नाहीं. ह्याच न्यायानें कुंभार व मडकें हीं एक आहेत असें ह्मटलें पाहिजे.

आमचें मन आह्मांस सांगतें कीं, आपण व्यक्तिविशिष्ट प्राणी आहों, ह्मणजे इतर प्राणी व आमचा उत्पन्नकर्त्ता परमेश्वर यांजपासून आपण भिन्न आहों. तसेंच आपण जीं कर्मे करितों त्यांबद्दल आपण जबाबदार आहों अशी आपल्या मनाची साक्ष व अनुभव आहे.

ब्रह्म अखंड आहे असें ह्मणतात, तर त्याचीं खंडें कशीं होतील ?

एक हिंदु ग्रंथकार यथार्थ ह्मणतो कीं, "खरोखर तुझी बुद्धि कोणी लुटून नेली आहे, कारण तूं वेड्याप्रमाणें "मी ब्रह्म आहें" असें निरंतर ह्मणत आहेस. तुझें देवत्व कोठें आहे ? तुझा सर्वाधिकार कोठें आहे ? तुझी सर्वज्ञता कोठें आहे ? हे जीवात्म्या ! मोहरीचा दाणा जसा मेरु पर्वतापासून भिन्न आहे तद्वत तूं ब्रह्मापासून भिन्न आहेस. तूं अंतवंत जीव आहेस, तो अनंत आहे. तूं केवळ एक समयीं एकाच स्थळीं असूं शकतोस, तो सर्वदां सर्वत्र आहे. तूं क्षणांत सुखी, क्षणांत दुःखी आहेस. तो निरंतर सुखी आहे, तर मग "मी तो आहें" (सोहं) असें तुझ्यानें कसें ह्मणवतें ? अरे तुला लज्जा कशी वाटत नाहीं."

[ह्या यथार्थ वादाचें शेवटल्या वाक्याचें मूळ आह्मी एथें उतरून घेतों:—" परिच्छिन्नोजीव स्त्वमसि खलु सव्यापकतम स्त्वमेकत्र स्थाता भवसि सहि सर्व्यत्र सततं सुखी दुःखी

त्वरे क्षणिक ससुखी सर्व समये कथं सोहं वाक्यं वदसि तव लज्जां न कुरुषे ॥ ( रामानुज. ) ]

अद्वैत आमच्या धर्मसंबंधी मनोवृत्तीचा उच्छेद करितें. परमेश्वराच्या ठायीं भक्ति ठेवणें, त्याचा आदर करणें, त्याच्या आज्ञा पाळणें, आणि त्याची प्रार्थना करणें, हें धर्माचें तत्व आहे. जर मीच ईश्वर आहें तर मीं आपली भक्ति कां करावी ?

ह्या देशांतील विशेष बुद्धिवान अद्वैतवादी लोकांचे देव कल्पित आहेत असें मानितात. फ्लिन्ट नामक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, " वेदांती लोक बहुदेवमताशीं जें सख्य ठेवितात त्याचा अर्थ समजून उमजून असत्याशीं संबंध राखणें, असत्य गोष्टीचा विचारपूर्वक प्रसार करणें, व हट्टानें ढोंगांचा वर्त्तनक्रम ठेवणें असा आहे. अद्वैतमताकडून बहुदेवमताची उन्नति व शुद्धि न होतां उलटी देवांची संख्या, त्यासंबंधी आचाराचा असमंजसपणा व मळीणपणा हीं वृद्धिंगत करण्यास मात्र तें कारणीभूत झालें."

## १४. ईश्वराविषयीं नीच कल्पना.

महाभारतांत असें ह्मटलें आहे कीं, " वेद परस्पर विरुद्ध आहेत, शास्त्रें परस्पर विरुद्ध आहेत, सर्व पवित्र मुनींचीं मतें परस्पर विरुद्ध आहेत."

हिंदुधर्मांत कित्येक ठिकाणीं देवाविषयीं वें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. परंतु त्यांतच विरुद्ध प्रकारचें वर्णन मिश्रित आहे. भगवद्गीतेंत कृष्णाला "परम पवित्र" ह्मटलें आहे. परंतु भागवतांत त्यानें बहुत पापें केल्याचें वर्णन आहे. हिंदु धर्माची परीक्षा एकंदरीनें केली पाहिजे. त्याच्यामध्यें जीं पृथक पृथक चांगलीं वचनें आहेत तीं जमेस धरितां येत नाहींत.

ब्रह्म ह्मणून जें कांहीं आहे तें निर्गुण व निष्क्रिय आहे असें त्याचें साधारण वर्णन आहे. ज्या निद्रेंत स्वप्न देखील पडत नाहीं अशा सुषुप्तावस्थेंत तें आहे. निर्गुण ब्रह्माच्या ठायीं दया किंवा प्रीति हे गुण नाहींत. तें पाहत नाहीं, ऐकत नाहीं, जाणत नाहीं, अथवा आपल्या प्राण्यांविषयीं त्यास कांहीं काळजी नाहीं. त्याला बरें वाईट करण्याची इच्छा किंवा शक्ति नाहीं. त्याच्यानें सज्जनांस बक्षीस व दुर्जनांस शिक्षा देववत नाहीं. जी अर्जी वाचली जात नाहीं ती करून कांहीं उपयोग नाहीं; तसेंच जो देव स्वतां अचेतन निद्रावस्थेंत आहे त्याचें भजन करणें व्यर्थ आहे. याच कारणास्तव सर्व हिंदुस्थानांत ब्रह्म याची भक्ति करण्याचें एकही देऊळ नाहीं.

परंतु ब्रह्म सर्वदां निर्गुणावस्थेंत राहत नाहीं. असंख्य युगें लोटल्यावर तें जागृत होतें. त्याच्या ठायीं अहंकार येतो, ह्मणजे आपण आहे अशी त्याला शुद्धि येती, आणि

आपल्या एकांतवृत्तीचा किंवा एकलकोंडेपणाचा कंटाळा येऊन द्वैगुण्य होण्याची त्याला इच्छा होते. तें स्वतः निराकार आहे तरी लीलेनें आपल्याला साकार कल्पितें. ह्या अचेतन भावाच्या ठायीं इच्छा कशी उत्पन्न होते याचा अद्याप कोणी खुलासा केला नाहीं.

विष्णुपुराणांत प्रल्हादानें विष्णूची स्तुति करितांना असें ह्मटलें आहे कीं, " तूं ज्ञान, सत्य, असत्य, विष व अमृत आहेस" ( वि० पु० अंश १. अध्या० १९ ).

हिंदुधर्मांत पवित्रतेविषयीं यथार्थ कल्पना नाहींत. सर्व देवांचा मुख्य जो इंद्र तो मद्यपानाविषयीं प्रख्यात होता. तथापि त्याला ऋग्वेदांत " परम पवित्र " ह्मटलें आहे. ब्राह्मण नामक जे वेदाचे ग्रंथ आहेत त्यांतून एकांत त्याचे " अहिल्येचा जार " अशा नांवानें आव्हान केलें आहे. हें पद त्याला आवडेल अशा हेतूनें योजिलें आहे, आणि ह्या व्यभिचारकर्माकडून त्याचा महिमा प्रगट होतो असें मानिलें आहे.

ब्रह्मा, विष्णु आणि शिव हे पवित्र आहेत असें हिंदु शास्त्रांत कोठेंही मानिलें नाहीं. तर ते अनेक महादोषलिप्त आहेत असें त्यांचें वर्णन केलें आहे. ब्रह्मदेवास पांच मस्तकें कशीं प्राप्त झालीं हें सांगण्यास देखील लज्जा वाटते. ब्रह्मा, विष्णु व शिव यांस त्यांच्या दुर्वर्त्तनामुळें अत्री ऋषीच्या स्त्रीनें बाळें करून सोडिलें. विष्णूनें भृगूच्या

स्त्रीचें तप भंग करण्याकरितां तिचें मस्तक छेदिलें, त्या कारणास्तव भृगूनें त्याला शाप देऊन मनुष्यांमध्यें सात जन्म घ्यायास लाविलें. विष्णूचें कृष्णावतारीं कसें वर्त्तन होतें हें सर्वांस माहीत आहे. शिव मद्यप्रिय व भांगप्रिय होता अशी त्याची पुराणांतरीं प्रसिद्धि आहे. मोहिनीशीं एक वेळ तरी संग करून आपली दुर्वासना तृप्त करावी ह्मणून तो आपल्या तपश्चर्येचें सर्व पुण्य देण्यास सिद्ध झाला.

हिंदु लोक **सामर्थ्य** ह्मणून जो मोठा गुण आहे त्याची भक्ति करितात. जसे लोक दुष्ट व क्रूर राजांस भितात व त्यांस मान देतात, त्याप्रमाणें देव व भूतें यांचे इतर गुण कसेही असले तरी त्यांनीं आपल्या भक्तांस उपद्रव करूं नये व त्यांस प्रसन्न होऊन कांहीं वर द्यावा या हेतूंनीं लोक त्यांची पूजा करितात. हिंदूंचे देव हिंदु राजांसारिखे आहेत. जसे राजे लोक सामर्थ्य असलें ह्मणजे परस्परांशीं युद्ध करितात, जो तो आपापल्या पक्षकावर उपकार करितो, आणि आपल्या विषयवासना तृप्त करितो, अथवा मनास वाटेल तें अन्यायकर्म करितो, तसें ह्या देवांचें वर्त्तन आहे. हिंदूंच्या देवांमध्यें राष्ट्रीय वर्तनाचें प्रतिबिंब दिसतें.

## १९. लूट, खून व नरयज्ञ हीं करण्याविषयीं धर्माची मंजुरी.

कोणताही अपराध करण्यास हिंदु लोकांस आपल्या देवांचें उदाहरण घेतां येईल. बंगाल्यांतील सुमारें तीनचतुर्थांश हिंदु लोक कालीची किंवा दुर्गादेवीची भक्ति करितात. तिला रक्त फार आवडत आहे असें मानितात. तिचें एक नांव रुधिरप्रिया असें आहे. ज्यांनीं आपले नवरे किंवा लेंकरें आजारीं असतां तीं बरीं होण्याकरितां ह्या देवीला आपलें कांहीं रक्त वाहण्याचा नवस केला नसेल अशा फारच थोड्या बंगाली स्त्रिया असतील. तसेच गाडेबगाड ह्मणजे पाठीच्या मासांत गळ टोंचणें, व शरीरांत लोखंडाची सळई टोंचून घेणें हीं कर्मे देवीस आवडतात, असें लोक समजतात.

पूर्वी ठक नांवाचे लोक होते, ते आपणास कालिका देवीनें लोकांस गळफास घालून मारून त्यांचा वित्तविषय लुटण्याची परवानगी दिली आहे असें ह्मणत. ती त्यांस हीं कर्मे करण्याची सर्व व्यवस्था करून देते आणि त्याचें रक्षण करिते असा ह्या तिच्या भक्तांचा समज होता.

शुनःशेप नामक एका तरुण ब्राह्मणास वरुणाला अर्पण करण्याकरितां यज्ञस्तंभास बांधलें होतें अशी ऋग्वेदांत कथा आहे. पुरुषमेध नामक वैदिककर्म होतें त्यांत मनुष्याचा

बळी द्यावा लागत असे.* ब्राह्मण नामक वैदिक ग्रंथांत नरयज्ञ करण्याची मंजुरी आहे. कालिका पुराणांत असें ह्मटलें आहे कीं "यथाविधि नरयज्ञ केल्यानें देवी एक सहस्र वर्षें तृप्त होते."

नरयज्ञाला **अतिबलि** ह्मणजे श्रेष्ठ यज्ञ ह्मटलें आहे. ह्या काळांत देखील मनुष्यबलि दिल्याचें दरवर्षास कोठें कोठें ऐकण्यांत येतें. इंग्रज सरकार जेव्हां गंगेसारिख्या नदीला मोठाले पूल बांधिते तेव्हां तें काम नरबलि दिल्यानें मात्र सिद्धीस जाते असा अज्ञान लोकांचा समज आहे. पूर्वींच्या काळांत आया आपलीं लेंकरें गंगानदीस वाहत असत. सति जाण्याची चाल ह्मणजे विधवांस जीवंत जाळणें इंग्रज सरकारानें बंद करीपर्यंत ह्या देशांत होती हें तर सर्वांस ठाऊक आहे.

## १८. नीति, अनीति, पापपुण्य, धर्मअधर्म, यांच्यांतील जो अनादिसिद्ध भेद तो नाकरणें.

हा नाकार "समर्थास दोष नाहीं" ह्या ह्मणण्याच्या पोटीं येतो. जें आह्मी केल्यास दोष लागतो तें कृष्णानें

---

* शुनःशेपाच्या कथेवर वेदार्थयत्नकर्त्याची जी टीप आहे तिच्यांतून एक वाक्य येणेंप्रमाणें आहे:— "प्राचीन काळीं वैदिक युगांत पुरुषमेध करण्याची ह्मणजे मनुष्यास बळी देण्याची भयंकर चाल होती, कीं जिचें नांव घेतलें असतां आधुनिक आर्यजनांतून अगदीं जंगली लोकांच्याही अंगावर शहारे उठतील."

केल्यास दोष नाहीं. **जीवनमुक्त** पापपुण्य, पवित्रता व अपवित्रता हीं समदृष्टीनें पाहतो. भगवद्गीतेंत अर्जुनानें कृष्णास असा बोध केला आहे कीं, सुखदुःख हीं समान मानिल्यावर त्यानें युद्धांत आपले गोत्रजाचा वध केला तरी त्यास पाप लागणार नाहीं. कृष्ण ह्मणतो कीं कर्में मला दूषित करीत नाहींत.

ही कल्पना एखाद्या जुलमी हिंदु राजाच्या वर्त्तनावरून बसविली आहे. त्यानें आपल्या प्रजेंतील पाहिजे त्याची बायको जुलमानें घेतली, अथवा ज्याला पाहिजे त्याला चौकशी केल्याशिवाय देहांत शिक्षा केली तरी त्याला कोणी दोष लावीत नाहींत. हिंदु लोकांच्या राजांचें हें साधारण वर्त्तन होतें; आणि जेव्हां त्यांनीं आपले देव बनविले तेव्हां त्यांनीं त्या त्या राजाच्या गुणस्वभावाचा नमुना घेतला. त्यांचे देव देवपद दिलेलीं मनुष्यें होत.

देवांनीं दुष्कर्म केल्यास त्यांस दोष लागत नाहीं हें ह्मणणें सत्यास विरुद्ध आहे. मुलानें अपराध केला असतां त्याला दोष लावितात. साधारण मनुष्यानें तोच अपराध केला तर त्याचा दोष मोठा होतो. राजानें तोच अपराध केला तर त्याचा दोष व त्याचा परिणाम त्यापेक्षांही अधिक मोठा होतो. गीतेंत कृष्ण ह्मणतो कीं, " श्रेष्ठ मनुष्य जें जें करितो तें तें इतर जन करूं लागतात. " भागवतांत सांगितल्याप्रमाणें कृष्णाच्या स्वकीय वर्त्तनाचा कित्ता त्याच्या भ-

क्यांस अत्यंत अहितकारक होता ; ( भाग० १०. ३३ ३०-३२ पाहा ).

देवांनीं लीलेनें ह्मणजे क्रीडार्थ पाप केलें असें ह्मणणें तर फारच वाईट. अशी कल्पना ईश्वरनिंदात्मक आहे. कर्माविषयीं हिंदु मत अत्यंत दुष्परिणामकारक आहे. त्याकडून मनुष्यांस असें वाटतें कीं, आपण जसें वर्त्ततों त्याहून निराळ्या रीतीनें आपणास वर्त्तवतच नाहीं. पुराणांत महत अपराधी मनुष्यांचें समाधान असें केलें आहे कीं, जें कांहीं त्यांच्याकडून घडलें तें त्यांच्या कर्मांत असल्याप्रमाणें झालें. हिंदु लोक आपल्या अपराधाविषयीं सर्वदां असें निमित्त सांगतात कीं, "आह्मीं काय करावें ? जें आमच्या नशीबांत होतें तें झालें." खुनी मनुष्यास फांशीची शिक्षा झाली असली तरी तो आपल्या अपराधाविषयीं दुःख करीत नाहीं.

असें समजा कीं कोणी ज्ञानी व दयाळु मनुष्याच्या दुष्ट पुत्रानें आपल्या दुराचरणाचा दोष आपल्या बापावर लोटून असें ह्मटलें कीं, बापानें जें मला करायास लाविलें तेंच म्यां केलें, तर हें त्याचें ह्मणणें कोणी कबूल करील काय ? तो खोटें बोलतो असें लोक ह्मणतील, व तणेंकरून त्याचा दोष कमी होण्यापेक्षां अधिक वाढेल. याप्रमाणेंच आपल्या दुष्कर्माचा दोष देव जो विमल पवित्र असून पापाचा अत्यंत द्वेष करितो त्या परमेश्वरावर लावणें हें महा पाप होय.

जीं पापें आह्मी करितों तीं आमचींच आहेत व देवाचीं किंवा दैवाचीं नव्हेत असें आमचें मन आह्मांस सांगतें.

## १७. पापक्षमेचे निरर्थक उपाय.

पाप ह्मणजे सकल विश्वाचा जो प्रभु त्याच्या आज्ञा मोडणें. पुष्कळ लोक पाप हलकी गोष्ट समजतात, परंतु तेणेंकरून आह्मी अत्यंत कठीण शिक्षेस पात्र होतों. जो कोणी आपल्या आयुष्याचा गंभीरपणानें विचार करील त्याला आपण कायावाचामनेंकरून असंख्य पापें केलीं आहेत असें कबूल करावें लागेल. मी देवापुढें न्यायी कसा ठरेन ह्यासारिखा महत्वाचा व अगत्याचा दुसरा प्रश्न नाहीं! ह्या भयंकर पापभारापासून आपण कसे मुक्त होऊं ?

ह्या प्रश्नास हिंदुधर्म जें उत्तर देतो तें संगतवार नाहीं. त्याच्या एका मताप्रमाणें पाहतां पापाची क्षमा होत नाहीं. कर्माच्या मताप्रमाणें प्रत्येक बऱ्यावाईट कर्माचें फळ भोगलेंच पाहिजे. ब्रह्मदेवाच्यानेंही कर्म पालटवत नाहीं असें शंकराचार्य ह्मणतात. दुसरें मत असें आहे कीं, महत पातकें अगदीं हलक्या उपायानें दूर होतात.

कोणी दानधर्मावर भरंवसा ठेवितात. जे खरोखर गरीब आहेत त्यांस सहाय करावें हा आमचा धर्म आहे. आणि ईश्वरही आह्मांस असें करायास आज्ञापितो. परंतु हिंदु लोकांचा बहुतेक धर्मादाय सशक्त, आळशी व दुर्गुणी अशा भिकाऱ्यांस देण्यांत जातो, हा कांहीं खरा धर्म नव्हे. तेणेंकरून दुर्व्यसनास मात्र उत्तेजन होतें. तसेंच दानधर्म केल्यानें

कोणत्याही पापाचें निरसन होत नाहीं. चोरानें भिकाऱ्यास कांहीं पैसे दिले असले ह्मणून कोतवाल त्याचा गुन्हा माफ करितो काय ?

तीर्थयात्रा केल्यानें पाप जातें असा लोकांचा अणखी एक समज आहे. ह्या उपायानें पापक्षय होण्याबद्दल पापवृद्धि मात्र होते. जीं पातकें उघडकीस येण्याच्या भयानें लोक घरीं असतां करीत नाहींत अशीं पातकें महाक्षेत्राच्या ठायीं होतात. पाण्याकडून शरीर शुद्ध होतें, परंतु आत्म्याची शुद्धि करण्याची शक्ति त्याच्या ठायीं नाहीं. यात्रेस गेल्यानें पापाचें प्रायश्चित होत नाहीं किंवा अंतःकरण पवित्र होत नाहीं.

देहदंडन, ह्मणजे उलटें टांगून घेणें, पंचाग्नीत बसणें इ० साधनें कित्येक मनुष्यें पापक्षमेकरितां व पुण्यप्राप्तीकरितां करितात. अशीं मनुष्यें पवित्र होतात काय ? पुष्कळ तपस्वी ह्मटलेले गोसावी, बैरागी, सन्याशी मोठे रागिष्ट, दुराचरणी असतात हें सर्वांस महशूर आहे.

पापक्षमा मिळविण्याचे जे दुसरे उपाय पुराणांत सांगितले आहेत तेही असेच व्यर्थ आहेत. पद्मपुराणांत सांगितलें आहे कीं, जो पुरुष ब्रह्मपादोदकाचा एक बिंदु आपल्या शरीरीं वाहतो त्याच्या सर्व पापांचें तत्क्षणीं क्षालन होतें ( तीं धुतलीं जातात ).

**महाभारतः**—"जो पुरुष गंगानदीचें चालतां, बसतां, निजतां, इतर कर्में करितां, जागृत असतां, खातां, श्वास घेतां, आणि संभाषण करितां चिंतन करितो तो सर्व पापांपासून मुक्त होतो."



**भागवतः**—"जर कोणी खालीं पडतांना, घसरतांना, दुखण्यांत कष्टी होतांना, शिकतांना 'ओं नमो वासुदेवाय' असें अनिच्छापूर्वक जरी ह्मणाला ( सहज त्याच्या मुखांतून हे शब्द निघाले ), तरी देखील तो अत्यंत कलुषित ( मलिन ) पापांपासून शुद्ध होतो."

**विष्णुधर्मतंत्रः**—"जशी एखादी वस्तु न कळत झालेल्या अग्निस्पर्शानें जळून जाती, तद्वत विष्णूचें नाम न समजून घेतलें असतांही सर्व पाप भस्म होतें."

याच कारणास्तव हिंदु लोक आपल्या मुलांस देवाचीं नांवें ठेवितात, ह्मणजे कोणत्याही निमित्तानें त्यांस हाक मारिली असतां पुण्य मिळेल असें त्यांस वाटतें. अजामिळाची गोष्ट सर्व हिंदु लोकांस ठाऊक आहे. तो गोब्राह्मणांचा वध करीत असे, व त्याचा सर्व जन्म दुराचरणांत गेला, तरी मरणसमयीं त्यानें आपला मुलगा नारायण याला पाणी देण्याकरितां हांक मारिली, तेवढ्यानें तो स्वर्गास गेला.

ज्याबद्दल प्रायश्चित् घ्यावें लागतें अशीं जीं महापातकें आहेत, त्यांपैकीं इंग्लंडास जाणें हें एक आहे. तसेंच आपल्या विधवा झालेल्या कन्येचें पुनर्लग्न करणें किंवा विधवेशीं लग्न लावणें हीं तशांपैकींच महत्पापें होत. शुद्ध होण्याचे मोठे उपाय पंचगव्य प्राशन करणें

व ब्राह्मणास दक्षिणा देणें हीं होत. ह्यांपैकीं दक्षिणा तर अव-श्य दिलीच पाहिजे, ती दिल्यावांचून सुटका नाहीं, आणि जितकी अधिक द्यावी तितकीं अधिक पापें दूर होतात.

अशा उपायांनीं पाप जाणार नाहीं हें कोणताही विचा-रवंत मनुष्य कबूल करील. कित्येक हिंदु लोकांनीं देखील हें कबूल केलें आहे. एका हिंदु ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं, "ज्याचें हृदय शुद्ध नाहीं, त्यानें डोंगराएवढ्या मातीनें आ-पलें आंग घांसलें आणि गंगेंत आयुष्यभर स्नान केलें तरी तो शुद्ध होणार नाहीं.

## १८. धर्माचरणास सहाय होत नाहीं.

आमच्या गतपापाची क्षमा झाली पाहिजे इतकेंच नाहीं, तर आमचें अंतःकरण शुद्ध होऊन पुढें आह्मीं धर्माचरणानें वर्त्तलें पाहिजे. जो धर्म खरा व ईश्वरदत्त आहे तो सद्गुण व सदाचरण यांस पाठबळ देईल. जो धर्म हें शिकवीत नाहीं, तो कवडीमाल आहे. सर्व मनुष्यांची पापाकडे प्रवृत्ति आहे. त्यांस सदाचरणाकडे वळविण्यास अनेक साहित्यें व प्रोत्साहानें पाहिजेत.

हिंदु लोकांच्या ग्रंथांत पुष्कळ नीतिविषयक बोध आहे ही खरी गोष्ट आहे. त्यांतून कांहीं बोध तर अत्युत्कृष्ट आहे. परंतु नीतिबोधाचा भक्तीशीं अगदीं संबंध नाहीं. धर्मानें नीतीस जणू काय काडी मोडून दिली आहे. नीतिबोधाची

पुस्तकें पाहिजे तर घरीं शिकावीं, परंतु देवळांत त्यांचा प्रवेश होत नाहीं. धर्म ह्मणजे मनुष्याच्या सदाचरणापासून कांहीं भिन्न वस्तु आहे असें लोक समजतात. एखादा मनुष्य नीच, स्वार्थी, लबाड, दुराचरणी, ठक, विधवा व अनाथ यांस नाडणारा, असा असला तरी तो कांहीं धर्मसंबंधी क्रियाकर्में करीत असला अथवा नित्य कांहीं काळ जप, तप, ध्यान इ० करण्यांत घालवीत असला ह्मणजे लोक त्याला भक्तिमान समजतात, व तो खचीत स्वर्गास जाईल असें मानितात.

सणाच्या व पर्वणीच्या दिवसांत हिंदु लोकांची भक्ति ह्मटली ह्मणजे देवळांत नगारे वाजविणें, महानाद करणें, ध्वज किंवा पताका उभारणें, बंदुकी व फटाकडे सोडणें, नळे व चंद्रज्योति इ० जाळणें, पुष्कळ लोकांनीं मिळून व मोठा गलबला करून मूर्त्तींचे रथ किंवा वाहनें गांवांतून ओढीत व मिरवीत नेणें; गाणीं गाणें, नृत्य करणें, वाद्यें वाजविणें, घंटा वाजविणें, नानाप्रकारचे तमाशे, गोंगाट व घमंडी करणें यांत असते. अशा प्रकारची भक्ति व भजन चालत असतां मनुष्यानें आपलीं कर्त्तव्यें कशीं करावीं याविषयीं त्यांस कांहीं उपदेश होत नाहीं. हीं कर्त्तव्यें करण्यास देवांनीं आपल्या भक्तांस आज्ञा दिल्या आहेत असें त्यांस कोणी सांगत नाहीं. आणि हीं कर्त्तव्यें योग्य रीतीनें करितां यावीं ह्मणून भक्त आपल्या देवांची प्रार्थना करीत नाहींत.

हिंदु लोकांच्या भक्तींत अंतःकरण शुद्ध करण्याजोगें तर कांहींच नाहीं, उलटें मन भ्रष्ट होण्याच्या गोष्टी वारंवार तींत दिसून येतात. पुष्कळ देवळांच्या संबंधानें कळवंतिणी आहेत, त्यांस दक्षिण हिंदुस्थानांत देवदासी ह्मणतात. यांचा धंदा केवळ नाच करण्याचा आहे इतकेंच नाहीं, तर त्या कसबही करितात. तरी हिंदु लोकांच्या भक्तींत त्या मुख्यरणी असतात.

बीभत्स चित्रें व खोदीव पुतळे यांच्याविरूद्ध चीन सरकारच्या पिनल कोडांत एक कायदा आहे. परंतु हिंदु लोकांचें असें ह्मणणें आहे कीं हा कायदा आमच्या देवळास लागू नसावा. होळीच्या सणांत जितकीं अभद्र व निंद्य कर्में होतील, तितकें तीं करणारास अधिक पुण्य प्राप्त होईल असा लोकांचा समज व पुराणांचें मत आहे. पुष्कळ भटभिक्षुक, साधुसंत ह्मटलेले गोसावी, बैरागी, जोशी, जती, गांवोगांव भीक मागत व लोकांस फसवून त्यांचे पासून पैसे उपटत फिरतात; परंतु ते कधीं लोकांस एकत्र मिळवून त्यांस सदाचरणी होण्याविषयीं बोध करितात काय? हिंदु लोकांमध्यें सदाचरणाचा बोध करणारे गुरु कोठेंच आढळत नाहींत.

पुराणांतरीं वर्णिलेल्या देवांच्या वर्त्तनाचा कित्ता पहावा, तर तो नीतीची वृद्धि करण्याबद्दल उलटा तिचा क्षय करणारा आहे. हिंदु लोकांचें वर्त्तन अनेक प्रसंगीं त्यांच्या दैवतांच्या वर्त्तनापेक्षां चांगलें असतें असें कबूल करावें लागतें. ऋषीं-

चा स्वभाव सर्वदां तामसी असे असें त्यांच्या वर्त्तनावरून दिसतें. त्यांस शाप देतां येत असे, परंतु मृदु भाषण कसें करावें, व नम्रतेनें दुसऱ्यास कसा बोध करावा हें ते जाणत नव्हते. ह्या देशाचे लोकांची नीति इतकी निकृष्ट होण्याचें कारण हें आहे कीं, ते दुराचारी देवांची भक्ति करितात. लोक जेव्हां असे देव बनवितील तेव्हांच कलियुगास आरंभ होईल असें हिंदु शास्त्रांत सांगितलें आहे.

ज्यांस मुक्ति मिळविण्याची इच्छा असते ते ज्ञानमार्गाचे ग्रंथांचा अभ्यास करितात. ह्या ग्रंथांत सदाचरणानें वागण्याविषयीं कांहीं आज्ञा किंवा उत्तेजन नसतें. त्यांत उलटें असें सांगितलें असतें कीं, पाप व पुण्य हीं दोन्हीं (मोह-माया) भ्रम आहेत, व ते अज्ञान किंवा अविद्या यांपासून उत्पन्न होतात. जेथें अशा प्रकारच्या "वेडाला" "ज्ञान" ह्मणून अंगिकारितात तेथें नीतीचा नाश झालाच पाहिजे.

कोणी ह्मणतील कीं, जसे हिंदु लोकांमध्यें वाईट लोक आहेत तसें ख्रिस्ती लोकांमध्येंही आहेत. तेव्हां दोघांचेही धर्म सारिखेच आहेत. तर त्यांत एक मोठा भेद आहे. जो हिंदु दुराचरण करितो किंवा दुसरा कोणताही अपराध करितो तो आपल्या देवांचें अनुकरण करितो, आणि जो ख्रिस्ती अशाप्रकारें वागतो तो ह्याच्या उलट चालतो.

## १९. वृथा भयांनीं जन्मवर व्याकुल असणें.

बहुधा असें होतें कीं, मनुष्यें आपणच आपल्याला गांजून घेतात. इतर सर्व कारणांपासून त्यांस जें दुःख भोगावें

लागतें त्यापेक्षां तीं आपल्या दुर्वर्त्तनानें विशेष दुःख भोगतात. बहुतेक हिंदु लोक कल्पित संकटांचें निरंतर भय बाळगून त्या संकटांपासून आपलें रक्षण होण्याकरितां पुष्कळ पैसा खर्च करितात.

ईश्वर आमचा प्रिय पिता आहे, व तो आपल्या लेंकरांचें कल्याण करण्यास इच्छितो असें हिंदुधर्म शिकवीत नाहीं. तर उलटी त्यांची अशी समजूत आहे कीं, दैवतें लहरी व क्रूर व जुलमाचा अधिकार चालविणारे आहेत, त्यांची कल्पित अवगणना झाली असतां तीं रागावतील ह्मणून त्यांची आराधना केली पाहिजे. बहुतेक हिंदु लोक पाळण्यापासून तर चितेपर्यंत एक प्रकारच्या रोगाचे बळी असतात. त्या रोगास भूतभय ह्मटलें पाहिजे. सर्व प्रकारचीं भूतें कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें आपली हानि करायास यत्न करीत आहेत असा त्यांचा समज असतो. भूतबाधा स्त्रियांस विशेषेंकरून होण्याजोगी आहे अशी लोकांची कल्पना आहे. मोठी पहाट, भरदुपार, तीनसांजा आणि मध्यरात्र ह्या भूतबाधा होण्याच्या वेळां आहेत. तसेच अठवड्यांतील मंगळवार व शुक्रवार हे दिवस भूताचा झपाटा लागण्यास अनुकूळ आहेत. ह्या देशांतील कित्येक भागांत बायका ह्या दिवशीं बाहेर पडायास भितात. महिन्याच्या तिथीचेही कित्येक दिवस

भूतावेशाचे समजतात, त्यांत अमावास्या व पौर्णिमा, वद्य पक्षांतील अष्टमी हीं गणलीं जातात.

मुलांस शीतला ह्मणून जो फोड्यांचा रोग होतो तो देवीपासून होतो असें समजून त्या रोगाचेंही नांव देवी ठेविलें आहे. त्या करमणुकीकरितां ह्या रोगाचें बीं पखरतात. दक्षिण हिंदुस्थानांत महामारी अम्मा नामक ज्या देवता आहेत त्यांपैकीं मरी अम्मा पोच अम्मा ( मरी आई—मरणाची माता ) ही विनोदार्थ पाठविते अशी लोकांची समजूत आहे. ही अम्मा देवीचें एक रूप आहे असें ब्राह्मण सांगतात. या कारणास्तव लोक तिच्या विलासास आड येऊं नये ह्मणून मुलांस देवी काढण्यास कबूल होत नाहींत. उत्तर हिंदुस्थानांत ओलाबीबी नांवाची एक नवी देवी ह्या रोगाचें अधि दैवत आहे असें समजतात.

भूतबाधेच्या भयाखेरीज ग्रहपीडेचें भय लोकांच्या मनांत असतें. ही पीडा निवारणार्थ लोकांस नेहमीं खर्च लागतो, व तिच्यामुळें मनांत भयंकर चिंता वाहावी लागती. जोशाला विचारल्याशिवाय कोणतेही महत्वाच्या कार्यास आरंभ करीत नाहींत. मुलाचें लग्न करायाचें असलें ह्मणजे जोशीबावा हाच काय तो मसलत देणारा व वाट दाखविणारा असतो. त्यानें लग्नाचा शुभमुहूर्त्त नेमिला पाहिजे. तसेंच प्रवासास जाण्याचें असलें तर जोशानें शुभ दिवस पाहून दिला पाहिजे.

शकुन पाहणें हें एक प्रकारचें नशीब सांगण्याप्रमाणेंच मूर्खपणाचें व खोटें कर्म आहे. पालीचें चुकचुकणें, व पडणें ह्यावरून कांहीं अर्थ करितात. गाढवालाही शकुनाच्या प्रकरणांत योग्य स्थळ आहे. कल्पित अपशकून झाला असतां कधीं कधीं लग्न मोडतात, आणि एखादें कार्य हातीं घेण्याची चांगली संधि दवडितात.

दृष्ट लागणें हें एक वृथा भयाचें कारण आहे. कित्येक मनुष्यांनीं सहज दुसऱ्याकडे पाहिलें असतां त्याची हानि होती अशी कल्पना आहे. दृष्टीच्या योगानें बहुतकरून सर्वप्रकारचे अनर्थ होतात असें लोकांस वाटतें. गुरें, फळें, पिकास आलेले भात, कलींगडें व तरबुजें यांचें देखील ह्या दृष्टीपासून रक्षण केलें पाहिजे. सुंदर गोजीरवाण्या मुलांस तर लवकर दृष्ट लागती. त्यांस ही बाधा होऊं नये ह्मणून त्यांच्या गालांवर काजळाचा डाग लावितात, किंवा त्यांविषयीं धिक्कारानें बोलतात तसेंच कोरींव पुतळे तयार होत असतां त्यांवर दृष्ट पडूं नये ह्मणून पडदे बांधितात.

ह्या कल्पित अनर्थापासून रक्षण होण्याकरितां ताईत, दोरे, गंडे, मंत्र यांचा उपयोग करितात. हें सर्व व्यर्थ आहे. मनुष्याच्या नुस्त्या शब्दांत सामर्थ्य नाहीं. जो मोठा जालीम मंत्र ह्मणून समजतात त्याच्यानें एका माशीला देखील कांहीं दुखापत करवत नाहीं. लोकांनीं पाहिजे तर भारलेले ताईत वगैरे पायांखालीं तुडवावे, त्यांचे तुकडे तुकडे करावे,

किंवा त्यांस चुलींत टाकावें. त्यांच्यानें जर आपलें स्वताचें रक्षण करवत नाहीं, तर जे त्यांचें धारण करितात त्यांचें कसें करवेल?

कित्येक देशचे लोक ताईत आपल्या शरीरास बांधतात, किंवा वस्त्राच्या वेष्टनांत अथवा धातूच्या पत्र्याच्या लहानशा पेटींत घालून ठवितात. ब्रह्मदेशचे लोक तर त्यास आपल्या शरीरावर गोंदून काढतात. ह्यांच्या गुणाविषयीं लोकांच्या अशा कल्पना आहेत कीं, त्यांकडून सर्पदंश होत नाहीं, अथवा कोणी मारिलें असतां मार लागत नाहीं, तसेंच कित्येक ताईत अंगावर बांधणारांस बंदुकीची गोळी लागत नाहीं, पाण्यांत बुडण्याचें भय नसतें. राघूच्या अंगावर ताईत गोंदला असतांही तो पाण्यांत बुडतो किंवा बंदुकीच्या गोळीनें मरतो हें डोळ्यांनीं पाहत असतांही ब्रह्मी लोकांच्या लक्षांत ताईताचा निरुपयोगीपणा येत नाहीं, व त्यांचा त्यावरून विश्वास उडत नाहीं.

## २०. मरणसमयींची निराशा किंवा खोटी आशा.

१. **कलियुग.**— "हें कलियुग आहे" असें हिंदुस्थानांतील सर्व बाजारांत बहुतकरून नित्य ऐकण्यांत येतें. सर्व गोष्टी दिवसानदिवस अधिक वाईट होत जाणार. कलियुगांतील वाईट गोष्टींपैकीं कित्येकांचें वर्णन विष्णुपुरा-

णांत वृद्ध पाराशर ऋषीनें येणेंप्रमाणें केलें आहे:—

"कलियुगांत वर्ण, आश्रम व आचार ह्यांची प्रवृत्ति होणार नाहीं. सर्व दरजाचें लोक आपणास अभिमानानें ब्राह्मणासमान मानितील. गायी ज्या परिमाणानें दूध देतील त्या परिमाणानें मात्र त्यांचा मान राखिला जाईल. प्रजा सर्वदां अनावृष्टीचें भय धरून दुष्काळाच्या चिंतेनें पीडित होतील. ते सर्व तपस्व्याप्रमाणें कंद व पर्णे व फळें भक्षण करून राहतील, आणि अनावृष्टीच्या व आपत्तीच्या भयानें आपला प्राणघात करून घेतील. राजे आपल्या प्रजेचें रक्षण करण्याबद्दल तिला लुटतील. स्त्रियांस आठ, नऊ व दहा वर्षांच्या नवऱ्यांपासून पांचव्या, साहाव्या व सातव्या वर्षी मुलें होतील. आणि बाराव्या वर्षी मनुष्यें ह्मातारीं होतील, आणि २० वर्षांच्यावर कोणी जगणार नाहीं."

हेंच जर कलियुग आहे तर नशीबापुढें कोणाचें चालणार नाहीं.

**२. जन्मास येणें ही पीडा आहे.** जन्माविषयीं हिंदु-मत दक्षिणेकडील एका कवीनें येणेंप्रमाणें प्रदर्शित केलें आहे:—

"मला किती जन्म झाले हें ठाऊक नाहीं, आणि किती होतील हें सांगवत नाहीं. परंतु इतकें मात्र मला

ठाऊक आहे व तें पक्कें ठाऊक आहे कीं, दुःख व शोक हीं सर्व वाट कडू करितात. "

अखंड जन्ममरणाची काळजी हिंदु लोकांच्या पाठीस भूताप्रमाणें रात्रंदिवस लागली असते. सत्य शोधावें अथवा पापभारापासून मुक्त व्हावें या गोष्टींकडे त्यांचें लक्ष नसतें, तर ही जन्ममरणाची लोखंडी बेडी कशी तुटेल, व केवळ अचेतन आत्म्याच्या ठायीं आपण कसें मिळून जाऊं, ह्मणजे मोक्ष कसा प्राप्त होईल एवढ्या गोष्टीची त्यांस काळजी असती.

जन्माचा परमार्थक काय असें एखाद्या हिंदूस विचारिलें असतां, मुक्ति हाच आहे असें तो लागलेंच उत्तर देईल. मुक्ति ह्मणजे काय असें विचारिलें असतां, ८४ लक्ष योनींचे फेरे चुकविणें असें तो उत्तर देईल.

### ३. मरणसमयींची निराशा किंवा खोटी आशा.

पुढें आपलें काय होईल याविषयीं मनुष्याला केवळ एकच गोष्ट खचितार्थानें ठाऊक आहे. ती हीच कीं, आपल्याला मेलें पाहिजे. तो अनिवार्य समय सर्वांस प्राप्त झालाच पाहिजे. विचावंत हिंदु मनुष्यास मरणकाळीं कशाची आशा असते? कर्माच्या मताप्रमाणें पापाची क्षमा तर होतच नाहीं. त्याला आपल्या एकाच जन्मांतील पापांची झडती दिली पाहिजे असें नाहीं, तर पूर्वीच्या अगणित जन्मीं केलेल्या पापांचाही हिशेब दिला पाहिजे. ज्यांचें निस्तरण झालें

णांत वृद्ध पाराशर ऋषीनें येणेंप्रमाणें केलें आहेः—

"कलियुगांत वर्ण, आश्रम व आचार ह्यांची प्रवृत्ति होणार नाहीं. सर्व दरजाचें लोक आपणास अभिमानानें ब्राह्मणासमान मानितील. गायी ज्या परिमाणानें दूध देतील त्या परिमाणानें मात्र त्यांचा मान राखिला जाईल. प्रजा सर्वदां अनावृष्टीचें भय धरून दुष्काळाच्या चिंतेनें पीडित होतील. ते सर्व तपस्व्याप्रमाणें कंद व पर्णें व फळें भक्षण करून राहतील, आणि अनावृष्टीच्या व आपत्तीच्या भयानें आपला प्राणघात करून घेतील. राजे आपल्या प्रजेचें रक्षण करण्याबद्दल तिला लुटतील. स्त्रियांस आठ, नऊ व दहा वर्षांच्या नवऱ्यांपासून पांचव्या, साहाव्या व सातव्या वर्षी मुलें होतील. आणि बाराव्या वर्षी मनुष्यें म्हातारीं होतील, आणि २० वर्षांच्यावर कोणी जगणार नाहीं."

हेंच जर कलियुग आहे तर नशीबापुढें कोणाचें चालणार नाहीं.

२. **जन्मास येणें ही पीडा आहे.** जन्माविषयीं हिंदु-मत दक्षिणेकडील एका कवीनें येणेंप्रमाणें प्रदर्शित केलें आहे :—

"मला किती जन्म झाले हें ठाऊक नाहीं, आणि किती होतील हें सांगवत नाहीं. परंतु इतकें मात्र मला

ठाऊक आहे व तें पक्कें ठाऊक आहे कीं, दुःख व शोक हीं सर्व वाट कडू करितात. "

अखंड जन्ममरणाची काळजी हिंदु लोकांच्या पाठीस भूताप्रमाणें रात्रंदिवस लागली असते. सत्य शोधावें अथवा पापभारापासून मुक्त व्हावें या गोष्टींकडे त्यांचें लक्ष नसतें, तर ही जन्ममरणाची लोखंडी बेडी कशी तुटेल, व केवळ अचेतन आत्म्याच्या ठायीं आपण कसें मिळून जाऊं, ह्मणजे मोक्ष कसा प्राप्त होईल एवढ्या गोष्टीची त्यांस काळजी असती.

जन्माचा परमार्थक काय असें एखाद्या हिंदूस विचारिलें असतां, मुक्ति हाच आहे असें तो लागलेंच उत्तर देईल. मुक्ति ह्मणजे काय असें विचारिलें असतां, ८४ लक्ष योनींचे फेरे चुकविणें असें तो उत्तर देईल.

**३. मरणसमयींची निराशा किंवा खोटी आशा.**

पुढें आपलें काय होईल याविषयीं मनुष्याला केवळ एकच गोष्ट खचितार्थानें ठाऊक आहे. ती हीच कीं, आपल्याला मेलें पाहिजे. तो अनिवार्य समय सर्वांस प्राप्त झालाच पाहिजे. विचावंत हिंदु मनुष्यास मरणकाळीं कशाची आशा असते? कर्माच्या मताप्रमाणें पापाची क्षमा तर होतच नाहीं. त्याला आपल्या एकाच जन्मांतील पापांची झडती दिली पाहिजे असें नाहीं, तर पूर्वीच्या अगणित जन्मीं केलेल्या पापांचाही हिशेब दिला पाहिजे. ज्यांचें निस्तरण झालें

नाहीं अशीं त्या जन्मांत केलेलीं पापें असतील, व त्याबद्दलची शिक्षा भोगण्याकरितां पुराणांत सांगितलेल्या एखाद्या अघोर नरकांत बुडावें लागेल अशी त्याला भीति असते.

हिंदु मनुष्य आशा धरून मरेल. प्रोफेसर उईलसन नामक एक मोठा संस्कृत विद्वान ह्मणतो कीं, "कोणी एखादा कितीही घोर पापी असला तरी चिंता नाहीं, तो जर आपलें कपाळ, छाती, बाहु हीं आपल्या पंथाच्या चिन्हांनीं अंकित करितो, किंवा त्याहून अधिक चांगलें ह्मणजे तप्त मुद्रांनीं आपलें अंग भाजून तीं चिन्हें सदोदित अंगावर धारण करितो, अथवा नित्य हरिनामाचा घोष करितो, अथवा विष्णूची स्तुति गातो, किंवा प्रतिदिनी क्षणभर विष्णुसहस्रनाम पठण करितो, अथवा मरणकाळीं मुखावाटें हरि, राम, कृष्ण हे शब्द उच्चारितो, किंवा मनांत त्यांचें चिंतन करितो; असा मनुष्य महापातकी असला तरी तो खचीत स्वर्गास जाण्याची आशा धरून मरतो."

परंतु असा मनुष्य आपल्या उजव्या हातांत लबाडी घेऊन मरतो. तो आपल्यास फसवून मात्र घेतो. वर स्वर्गास जाण्याबद्दल त्याला नरकांत पडावें लागेल.

विचारशील हिंदूनें मरणकाळीं महाभयाचें चिंतन करावें हें बरें.

अशी कल्पना करा कीं, त्यानें सत्कर्मे केलीं आहेत, तरी त्याला कशाची आशा असते?

"जो प्राणी जन्ममरणाच्या अधीन आहे तो एके वेळीं परलोकांतील कोणी एका भुवनीं एखाद्या सुंदर बागांत क्रीडा करीत राहील, व दुसऱ्या वेळीं नरकांत त्याचें शरीर काथलें जाऊन त्याचीं सहस्र खंडें होतील. एके समयीं तो एखादा श्रेष्ठ देव होईल, व दुसऱ्या समयीं नीच व भ्रष्ट अंत्यज होऊन इहलोकीं जन्मास येईल. कोणे एके वेळीं त्याला अमृताचें भोजन मिळेल, व दुसरे वेळीं त्याच्या घशांत शिशाचा रस ओतितील. एका पाळीस तो देवांसंगतीं सुखशयनीं बसेल, व दुसऱ्या पाळीस तप्त लोहाच्या मंचकावर आळेपिळे देत पडेल. एकदां तो हर्षोन्मत्त व दुसरेदा शोकाकुल होईल. एका समयीं तो देवांच्या आसनीं बसेल व दुसऱ्या समयीं बुभुक्षित कुत्र्यांच्या मध्यें सुळीं खिळलेला असा राहील."

जीवात्म्याचा परमात्म्यांत लय होतो असें क्षणभर जरी मानिलें तरी त्यापासून काय लाभ? ब्रह्म हें सुषुप्तावस्थेंत आहे ह्मणजे ज्या अवस्थेंत स्वप्न देखील पडत नाहीं अशा घोर निद्रेंत तें आहे. जसा दगडाच्या ठायीं कांहीं विचार किंवा कल्पना नसते तद्वत तें आहे. हिंदु लोकांची सायुज्य-मुक्ति ही बौद्ध लोकांचें निर्वाण होय, आणि निर्वाण ह्मणजे विनाश किंवा विलय. प्रोफेसर विलसन ह्मणतात कीं,

"नाहींसें होणें हाच हिंदुधर्माचा व हिंदु तत्वज्ञानाचा दुष्परिणाम होय."

कित्येक हिंदु लोक शिव व विष्णु यांच्या समागमें राहण्याची ह्मणजे सलोकता, समीपता इ० प्रकारची मुक्ति पावण्याची आशा बाळगितात. परंतु शिव व विष्णु असे मुळींच कोणी नाहींत. ज्या पुराणांत मेरु पर्वत आहे ह्मणून सांगितलें आहे त्याच पुराणांत त्यांचें वर्णन आहे, व त्यावरून त्यांच्यावर विश्वास ठेवणें ह्मणजे मेरु पर्वताच्या अस्तित्वाला मानणें असें आहे. ज्याला बायकालेंकरें आहेत व ज्यांचें वर्त्तन पापलिप्त आहे अशा देवांवर कोणता विचारवंत हिंदु विश्वास ठेवील ?

जेव्हां कोणी हिंदु मनुष्याची प्रिय आई मरण पावते तेव्हां तिला पुढें असंख्य जन्मास जाण्याचें असतें ह्मणून तिची पुनः भेट होण्याची त्याला आशा नसते, यांतही दुःखांत निराशा आहे.

## २१. सकल विश्वाच्या हक्कदार धन्याविरुद्ध बंडाळी.

इंग्लंदची राणी ह्या भूतलाच्या सुमारें पांचव्या भागावर राज्य करिती. तिच्या सत्तेखालीं ३० कोटीपेक्षां जास्त प्रजा आहे. तिच्या सर्व राज्यांत तिच्याशिवाय कोणाला राजा किंवा राणी करणें हा महा अपराध मानिला आहे. त्याला

राजद्रोह ह्मणतात व अशी बंडाळी कोणी केली असतां ती लागलीच मोडली जाईल, व ती करणारास शिक्षा होईल. आपल्या मनास येईल तो राजा स्थापण्यास लोकांस मोकळीक नाहीं. सर्व सुव्यवस्थित राज्यांत हीच रीत आहे. दुसरा कोणताही मार्ग लोकांच्या हिताचा नाहीं.

इंग्लिश राज्याची उपमा सर्वांचा प्रभु जो ईश्वर त्याच्या राज्यास अगदीं अस्पष्ट रीतीनें साजतें. तो सकल विश्वाचा उत्पन्नकर्त्ता आहे ह्मणून तें हक्कानें त्याचें आहे. आमच्या वरतीं जें आकाश आहे तें त्यानें विस्तारिलें आहे. आमच्या खालीं जी पृथ्वी आहे ती त्यानें केली. तो सर्व दृश्य व अदृश्य वस्तूंचा कर्त्ता आहे. त्यानेंच आरंभीं आह्मांस उत्पन्न केलें; आह्मीं जागृत असलों किंवा निद्रिस्त असलों तरी आमचा प्रत्येक श्वासोश्वास त्याजवर अवलंबून आहे. तो पावसाची वृष्टि करितो, व सूर्याचा प्रकाश पाडितो. जें कांहीं आमच्यापाशीं आहे तें त्याचें दान आहे.

देवाचे नेम अशा प्रकारचे आहेत कीं, त्यामुळें आह्मी त्याच्या आज्ञा पाळण्यास आणखी एक कारण आहे. ते पवित्र, यथान्याय व चांगले आहेत. तो जें कांहीं आह्मांस कल्याणकारक होईल तेंच करायास सांगतो. जें वर्ज करण्यांत मोठें शहाणपण आहे तेंच तो करण्याची आह्मांस मनाई करितो. आमचें कर्त्तव्य व आमचें सुख यांचा मिलाफ आहे.

ज्याप्रमाणें इंग्लंदची राणी आपल्या राज्यांत कोणास राजा स्थापूं देत नाहीं, त्याप्रमाणेंच देव आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाची भक्ति करण्याची मनाई करितो. ही त्याची पहिली आज्ञा आहे. ज्या प्राण्यांस त्यानें केलें त्यांस त्याच्यानें आपल्याविरुद्ध बंडाळी करण्यास परवानगी देववत नाहीं.

देव आमचा बाप व राजाही आहे.

दुसऱ्या कोणाची भक्ति करणें हें देवाच्या अधिकारावर उठणें असें आहे. आह्मी त्याला आपल्यावर राज्य करूं देणार नाहीं असें उघड रीतीनें ह्मणण्यासारिखें तें आहे. पृथ्वीवर जे राजे आहेत त्यांमध्यें अत्यंत सौम्य व दयाळु अशा राज्याच्या विरुद्ध दुष्ट बंडाळी करण्यांत जो अपराध आहे, अत्यंत ममताळु बापास दुःख देण्यांत, व उदार उपकारकर्त्याशीं कृतघ्नतेनें वागण्यांत जो अपराध आहे, त्या सर्व अपराधाच्या सहस्रपट अपराध हिंदुधर्मांत आहे.

हिंदु लोक एकच खरा देव, जो अत्यंत शक्तिमान, अत्यंत ज्ञानी, ज्याच्या पवित्रतेला किंचितही कलंक नाहीं, त्याच्या ऐवजीं ते कोणाची भक्ति करितात? तर निर्बुद्ध पशु, व निर्बुद्ध काष्ठपाषाण इ० जड पदार्थांची भक्ति करितात, होय, सर्वांचा उत्पन्नकर्त्ता व हक्कदार धनी त्याला सोडून अशांचीच भक्ति करितात.

जेव्हां हिंदु लोक मरणकाळीं जो खरा व एकच देव त्याच्या न्यायासनासमोर उभे राहतील, तेव्हां ते त्याच्या

अधिकाराविरुद्ध केलेल्या ह्या बंडाळीचें काय उत्तर देतील? त्यांस स्तब्ध राहावें लागेल.

## २२. देव दुर्बल आहेत हें हिंदुस्थानाच्या स्थितिवरून दिसून येतें.

बिशप काल्डवेल असें ह्मणतात कीं, ह्या देशचे लोक मात्र ब्रह्मा, विष्णु, शिव, कृष्ण व दुसरीं अनेक दैवतें यांस देव मानून भजतात. इतर देशांत यांचीं नांवेंसुद्धां माहीत नाहींत.

तर ज्याअर्थी शिव, विष्णु आणि इतर देव यांस हिंदु लोक मात्र भजतात, त्याअर्थी त्या लोकांस ह्या देवानें खचीत प्रसन्न व्हावें. पुराणांतरीं ज्या त्यांच्या कथा आहेत त्यांत असें दर्शविलें आहे कीं, जसें मनुष्याचें त्यावर प्रेम किंवा अप्रेम असतें त्याप्रमाणें त्यांचें त्यांच्याशीं वर्त्तन असतें. हें जर खरें आहे तर जे गोरे लोक त्यांस भजत नाहींत त्यांस ते नीच करून जे एतद्देशीय लोक त्यांची पूजा करितात त्यांस थोर पद देऊन आपलें सत्व प्रगट करितें. ते त्यांस अपारज्ञान, प्रसाद, व ऐश्वर्य देते, कदाचित त्यांस पृथ्वीवरील इतर प्रजांवर प्रभुत्वही देते. जरी हिंदु लोकांस पृथ्वीच्या अन्य भागांवर राज्याधिकार न मिळाला तरी त्यांनीं आस्थापूर्वक आपल्या देवांची भक्ति केली तर त्यांस आपलें स्वातंत्र्य तरी मिळावें. जे लोक शिवाला किंवा विष्णूला मानीत नाहींत त्यांच्या ताब्यांत राहण्याचें त्यांस कारण पडलें नसतें.

"परंतु वास्तविक पाहिलें असतां हिंदु लोकांची स्थिति किती निराळी आहे! हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागांतील मुख्य अधिकार, जे ख्रिस्ती लोक सृष्टीकर्त्यावांचून दुसरा देव नाहीं, व पूर्वी कधींही नव्हता असें ह्मणतात, त्यांच्या हातीं गेला आहे. यावरून जगावर सत्ता चालविणारा जो खरा देव तो शिव किंवा ब्रह्मा किंवा विष्णु नाहीं, आणि तो हिंदुधर्माच्या पक्षाचा नाहीं व जे त्याचा मान करितात त्यांचा तो मान करितो असें अनुमान सर्व विचारी पुरुष करणार नाहींत काय? ज्या रीतीनें जगावर ईश्वर राज्य करीत आहे ती रीत पाहिली असतां असें स्पष्ट दिसतें कीं, ह्या देशांतील देवांस कोणाचें तारण करण्याची इच्छा किंवा शक्ति नाहीं, तर जे कल्पित देव आहेत त्यांची भक्ति ह्या लोकांनीं सोडावी अशी ईश्वराची इच्छा उघड दिसती" (The Three Way Marks).

## २३. हिंदुधर्माविषयीं अभिप्राय.

जे लोक आडांतील बेडकांप्रमाणें आहेत त्यांस धर्माविषयीं खरें मत देतां येत नाहीं. आजपर्यंत हिंदुस्थानांत जे विद्वान लोक झाले त्यांपैकीं सर विलियम जोन्स नांवाचा एक मोठा विद्वान होता, व त्यानें संस्कृत ग्रंथांचें फार अवलोकन व अभ्यास केला होता. त्यानें मनुस्मृतीचें इंग्लिश भाषांतर केलें. त्याच्या आरंभीं प्रस्तावनेंत तिजविषयीं

त्याचा लेख येणेंप्रमाणें आहे:—"मनुधर्मशास्त्र हें जुलमाची व उपाध्याच्या कार्याची व्यवस्था आहे. ह्या दोन्हीस धर्मशास्त्राच्या आळ्या बांध्यांत ठेविलीं आहेत खरी, परंतु त्यांत अशी युक्ति लढविली आहे कीं, ते एकमेकांस आधारभूत करून एकमेकांच्या दाबांतही ठेवलें आहे; त्यांत अध्यात्मिक विद्या व पदार्थविज्ञान ह्यासंबंधी विलक्षण तर्क भरले आहेत. त्यांत निरर्थक अत्याचार, त्यांतील ईश्वरीज्ञान अत्यंत अस्पष्ट व लाक्षणिक आहे, त्यामुळें तें त्याचा भयावह विपरित अर्थ होण्याजोगा आहे; कर्मनियम तर अत्यंत सूक्ष्म व पोरकट आहेत, त्यांतील क्रियाकर्मै बहुधा विचारशून्य व उपहासास्पद आहेत, त्यांत सांगितलेल्या शिक्षा व पक्षपाताच्या व मन:कल्पित, कित्येकांसाठीं पराकाष्ठेचे क्रूर आहेत. व कित्येकांसाठीं अगदीं हलके आहेत. त्यांतील नीतिशास्त्र जरी एकंदरीनें कडकडीत आहे, तरी एक दोन प्रकरणांत (उदाहरणांत धर्माच्या कामांत खोटी शपथ वाहणें व अल्पस्वल्प गोष्टीसाठीं शपथ घेणें) अनीतीनें वागण्याची मोकळिक दिली असून तिचें कारण दाखविलें नाहीं."

वर जें त्याला जुलमाचें व उपाध्याकाव्याचें शास्त्र ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. मकॉले ह्या नांवाचा गृहस्थ पुष्कळ वर्षे हिंदुस्थानांत राहिला होता, तो फार बुद्धिवान होता. हिंदुधर्माविषयींचें त्याचें मत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

" हिंदुस्थानांतील प्रजेचा मुख्य भाग मूर्तिपूजक आहे. जीं धर्ममतें व धर्मकर्में मनुष्याच्या केवळ ऐहिक सुखाच्या संबंधानें पाहिलीं असतांही पराकाष्ठेचीं अपकारक आहेत, त्यांत ती प्रजा अज्ञानपणानें चिकटून आहे. मनुष्यजातीच्या नीतिसंबंधी व बुद्धिसंबंधी आरोग्यास प्रतिकूल असा धर्म जगांत पूर्वी कधीं नव्हता. ब्राह्मणांच्या पुराणांत इतक्या असमंजस गोष्टी आहेत कीं, जो कोणी त्या खऱ्या अशा मानून ग्रहण करितो त्याचें मन अवश्य करून नीच होतें. आणि त्यांच्या अयुक्तिक किंवा असमंजस पुराणांत असमंजस पदार्थविज्ञान, असमंजस भूगोल व खगोल विद्या हीं मिसळलेलीं आहेत. हा मूर्त्तिपूजेचा प्रकार कलाकौशल्य व विद्या ह्यांस विशेष अनुकूल आहे, असेंही नाहीं. सर्व हिंदु देवसभेंत पाहिलें असतां ग्रीस देशांतील सुंदर व थोर अशी एकही मूर्ति दृष्टीस पडणार नाहीं. सर्व कांहीं अक्राळ विक्राळ, वेडाविद्रा व नीच असें आहे.

जसा हा अन्यथा धर्म इतर सर्व अन्यथा धर्मांपेक्षां अत्यंत बुद्धीहीन व विशोभित आहे तसा तो अत्यंत अनीतीचा आहे. दुर्गुणाच्या प्रतिमेची लोक पूजा करितात. व दुराचरणाचीही पूजा करितात. जसे उपाध्ये देवळांत देवांची पूजा करणाऱ्यांपैकीं आहेत त्याप्रमाणें वेश्याही देवांच्या पुजारणी आहेत. जिवाविरुद्ध अपराध, व जिनगीविरुद्ध अपराध करण्याविषयीं ह्या ओंगळ अध्यात्मक विधेची परवानगी आहे

इतकेंच नाहीं, तर आज्ञाही आहे. इंग्रज सरकारनें सक्त मनाई केली नसती तर गंगानदीस मनुष्याचे बळी लोकांनीं दिले असते, व विधवांस त्यांच्या मुलांनीं त्यांच्या नवऱ्यांच्या प्रेताबरोबर जीवंत जाळलें असतें. ठक लोक आपल्या मोठ्या पराक्रमी देवीच्या आज्ञेनें व संरक्षणाखालीं भोळ्या प्रवास्याशीं मिळून त्याशीं मैत्री जोडतात, गळ्यांत फांस घालतात, व त्यांच्या डोळ्यांत सुरी भोंसकितात. त्याला मातींत पुरून त्याचें धन व सामान लुटून वांटून घेतात ( Speech on the Gate of Somnath ). हिंदु धर्माची प्रवृत्ति रुग्णता, दारिद्र, राष्टीय अज्ञान, बुद्धिमांद्य, जुलूम ह्यांकडे आहे. आणि मनुष्यामनुष्यांमध्यें भेद उत्पन्न करितो, स्त्रियांस नीचपदास पोंहोंचवितो; मनुष्यास पशुत्व आणितो; तो बहुदेवमत व सर्व विश्वदेवमत, काष्ठ पाषाणादि निर्बुद्ध व नीर्जीव पदार्थ आणि दोषांनीं भरलेले देव ह्यांची भक्ति करायास लावतो. मलीनता, चौर्य व नरहिंसा करण्यास आज्ञा देतो, पापपरिहारार्थ व्यर्थ उपाय सांगतो. पवित्राचरणाची समवृद्धि करीत नाहीं. ह्या धर्माकडून मनुष्य जन्मभर भयव्याप्त असतो, व मरणकाळीं निराश्रित, ह्याविषयीं शेवटीं हेंच सांगणें आहे कीं, हा धर्म जगताचा जो खरा प्रभु त्या विरुद्ध बंडाळी करणारा आहे व जे कोणी त्याला अनुसरतात ते मोठ्या कठीण शिक्षेस पात्र होतात.

## २४. हिंदुधर्म सुधारण्याजोगा नाहीं.

हिंदुधर्माचें शुद्धिकरण करण्याकरितां मोठमोठ्या सुधारणा केल्या पाहिजेत असें सर्व बुद्धिवान हिंदु कबूल करितात. बहुतेकांस असें वाटतें कीं, तो राखण्याकरितां इतकें करणें बस आहे. आणि कित्येकांचें तर असें मत आहे कीं, असें केल्यानें त्याला जगांतील धर्मांमध्यें मोठी जागा मिळेल.

एकोणीसाव्या शतकापर्यंत आपणाला जो प्रकाश मिळाला आहे त्याप्रमाणें हिंदु धर्म सुधारण्यासाठीं जे फेरफार केलें पाहिजेत त्याचा आपण विचार करूं.

१. सुधारलेला हिंदु धर्म बहुदेवमताचा, किंवा विश्वदेवमताचाही नसला पाहिजे. सर्व बुद्धिवान मनुष्यें सांप्रतकाळीं एकच खरा देव आहे असें मानितात. ब्रह्मा, विष्णु शिव, सरस्वती, दुर्गा असे कोणी देव किंवा हिंदु देवगणांतील ३३ कोटी दैवतें मुळींच नाहींत. विष्णुभक्ति व शिवभक्ति हीं लयास जाईल. निरनिराळ्या पंथांचीं चिन्हें कोणी धारण करणार नाहींत. "अहंब्रह्मास्मी" असें ईश्वरनिंदक वाक्य कोणी मुखावाटे काढणार नाहीं.

२. सर्व मूर्त्तींच्या उच्छेद, आणि त्यांच्याकडून ईश्वराविषयीं खोट्या व नीच कल्पना मनांत उत्पन्न होतात ह्मणून त्यांची कोणी भक्ति करणार नाहीं. कित्येक देवळांत ज्या बिभत्स मूर्ति आहेत त्यांचा लोक भंग करितील. आणि वैष्णवपंथांचीं देवळें राहणार नाहींत.

३. चार वेद, मन्वादि धर्मशास्त्रें, रामायण, महाभारत, पुराणें इ० ग्रंथांत बहुदेवमत, विश्वदेवमत, ईश्वरास नीचत्व आणणारें वर्णन, अन्यायाचे कायदे, खोटा इतिहास, खोटी विद्या, खोटी नीति हीं आहेत असें समजून त्यांस कोणी पवित्र ग्रंथ मानणार नाहींत.

४. देवळांत जी हिंदु रीतीप्रमाणें पूजा चालती ती बंद होईल. कोणी सण पाळणार नाहींत. कल्पित पवित्र यात्रेस कोणी जाणार नाहींत. कुटुंबांतील देवपूजा बंद होईल.

५. हिंदूच्या देवळांत मूर्त्तिसाठीं, जिला गाभारा ह्मणतात, अशी लहानशी जागा असते, तिच्या ऐवजीं ख्रिस्ती देवळाप्रमाणें मोठ्या विस्ताराच्या इमारती बांधाव्या लागतील. तींत लोक लौकिक भक्ति करायास व आपल्या जन्मांतील कर्त्तव्यासंबंधीं उपदेश ऐकण्यास जमत जातील.

६. कोणी जात मानणार नाहींत, परंतु सर्व मनुष्यें परस्परांचे बंधु आहेत असें कबूल करितील, आणि जातिभेद नाहींसा होईल.

सुधारलेल्या लोकांच्या विचारास मान्य होण्याकरितां वर सांगितलेल्या फेरफाराचें प्रयोजन आहे.

साखरेची गोडी काढून घेतल्यावर ती साखर राहत नाहीं, मनुष्याची बुद्धि काढून घ्या, त्यामध्यें मनुष्यपण राहणार नाहीं. त्याप्रमाणेंच हिंदुधर्माचे देव, त्याचे धर्मग्रंथ,

त्याचीं देवळें, त्याची पूजा, त्याचा जातिभेद, हीं हरण केल्यावर बाकी हिंदुधर्म काय उरला? त्याला बंगाल्याकडील साधारण ब्रह्म समाजाप्रमाणें नवाच धर्म ह्मटला पाहिजे. तो केवळ एकेश्वरी धर्म होईल.

रेव० नेहेमाया गोरे (निळकंठ शास्त्री) हे आपल्या एका व्याख्यानांत असें ह्मणतात कीं, "ब्राह्मधर्म केवळ ख्रिस्ती धर्माचें प्रतिबिंब आहे, परंतु तें व्यंग व अपूर्ण प्रतिबिंब आहे. ख्रिस्ती धर्म या देशांत येण्याचे पूर्वी तें कोणास माहीत नव्हतें; आणि जेथें ख्रिस्ती धर्म ठाऊक नाहीं, तेथें ब्राह्मधर्म किंवा एकेश्वरी धर्मही ठाऊक नाहीं."

"ख्रिस्ती धर्माचा उजेड बहुत वर्षांपासून अनेक साधनांच्या द्वारें हिंदुस्थानांत पडत आहे. आणि हा उजेड अनेक मार्गांनीं त्यांस पोंचल्यामुळें शिकलेलें हिंदु लोकांस धर्मसंबंधी सत्याचें अधिक शुद्ध व अधिक खरें ज्ञान प्राप्त झालें आहे." या पुस्तकाच्या वाचकांनीं ह्या विद्वान पुरुषानें खालीं टीपेंत दर्शविलेलें व्याख्यानाचें पुस्तक अगत्य वाचून पाहावें. *

---

* The Supposed and Real Doctrines of Hindus as held by Educated Hindus, with the true source of the former, compiled from the Lectures of the Rev. Nehemiah Goreh" (Price ½ Anna, sold by the Mr. A. T. Scott, Tract Depôt, Madras.)

# ख्रिस्ती धर्मी हिंदुस्थान

अथवा

# ख्रिस्ती धर्म हिंदुस्थानाकरीतां काय करील?

## उपोद्धात.

ह्या गोष्टीचा विस्तारानें विचार करण्यापूर्वीं, पुन्हां येथें असें सांगितलें पाहिजे कीं, कोणताही धर्म काय शिकवितो व त्याचे अनुयायी कसें चालतात ह्या दोन गोष्टींचा भेद ध्यानांत ठेवणें फार अगत्याचें आहे. त्याचे अनुयायी त्याच्या शिकविण्याप्रमाणें जितक्याविषयीं चालतात तितक्याविषयीं मात्र तो जबाबदार आहे. इंग्लिश लोक ख्रिस्ती आहेत असें मानतात. आणि त्यांपैकीं जे लोक ह्या देशांत येतात ते सर्व तसेच आहेत असें समजतात; पण प्रभु येशू असें सांगतो कीं, जे आपणाला ख्रिस्ती ह्मणवितात त्यांतून बहुतेकांस तो न्यायाच्या दिवशीं असें ह्मणेल कीं, "अहो दुष्कर्मी, मजपासून दूर जा, मी तुह्मांस ओळखत नाहीं." सर्व मनुष्यें पापाच्या भयंकर रोगानें त्रासलें आहेत. ते देवाच्या दृष्टींत कुष्टरोग्यांसारिखे आहेत. त्यांचें सर्वांग कुजलेल्या फोडानें भरलेलें आहे. हिंदु लोकांत, पापोहं पापकर्माहं पापात्मा पापसंभवः (मी पाप आहें, मी पाप करतों, माझा आत्मा पापी आहे, मी पापांत संभवलों.) असें ह्मणून जे पापांगिकार करितात त्यांस हें सत्य दर्शविलें आहे. ख्रिस्ती धर्म ह्मणतो

कीं, लोकांस ह्या रोगापासून बरें करण्यास आह्मास शक्ति आहे, परंतु ह्याला वेळ लागतो. आणि अगदीं बरें होण्याकरितां त्याचे जे नेम आहेत त्यांकडे लक्ष लाविलें पाहिजे. जर आजारी मनुष्य वैद्यानें दिलेलें औषध घेत नाहीं, आणि पथ्यपाण्याची हयगय करितो व त्यास बरें होण्यास वेळ लागला किंवा तो अगदींच बरा झाला नाहीं तर त्यांत वैद्याचा दोष नाहीं. कुष्टरोगापेक्षां पापरोग बरा होणें कठीण आहे. जे उत्तम ख्रिस्ती आहेत ते देखील आपल्या धर्माची आज्ञा वारंवार मोडतात ; त्यामुळें येशू ख्रीस्ताचा शिष्य कसा असावा याचा ते पूर्ण कित्ता नव्हत. तर ख्रिस्ती धर्माची परीक्षा, त्याच्या आज्ञा व त्यांपासून उत्पन्न होणारीं साहजिक फळें यांवरून करावी—त्याचे जे नामधारी अनुयायी आहेत त्यांच्या विरुद्ध वर्त्तणुकीवरून करूं नये.

## ख्रिस्ती धर्मापासून होणारे लाभ.

हिंदुस्थानच्या लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्विकारिला असतां त्यांस पुढील लाभ होतील: —

### १. अधिक चांगलें आरोग्य आणि दीर्घायुष्य.

हिंदुधर्म शरीर तुच्छ मानायास शिकवितो, त्याला तो किड्यांचें घर ह्मणतो. ऊर्ध्वहस्त ( हात वाळून जाऊन निरुपयोगी होईतोंपर्यंत वर करून ठेवल्यानें ) आणि पंचाग्नि साधन केल्यानें (पांच अग्नीच्यामध्यें बसल्यानें ) पुण्य मिळतें

असें ह्या धर्माचें शिकविणें आहे. ख्रिस्ती धर्म आह्मास जरी शरीर पोसायास सांगत नाहीं तरी त्याची जतन करायास सांगतो. ख्रिस्ती धर्माची प्रवृत्ति मनुष्यास अधिक चांगलें आरोग्य व दीर्घायुष्य देण्याकडे आहे हें इंग्लंदांतील बरमिंगहॅम व हिंदुस्थानांतील मद्रास ह्या दोन शहरांतील मृत्यूच्या संख्येच्या तुलनेवरून देतां येतें. ह्यांतून प्रत्येकांत सुमारें ४॥ लक्षांची वस्ती आहे. मद्रासेंत दरवर्षी मृत्यूची सरासरी दरहजारीं ३८.८; बर्मिंगहॅमांत १९.८ ; दरवर्षी मद्रासेस सरासरी १७४६० मनुष्यें मरतात. बर्मिंगहॅमांत केवळ ८९१० मरतात. तर ह्यावरून मद्रासेंतील लोकांचें आयुष्याचें मध्यप्रमाण २६ वर्षें, बर्मिंगहॅमांत ५० वर्षें. हीं उदाहरणें परमावधीचीं आहेत; तरी इंग्लंडचे लोक हिंदु लोकांपेक्षां अधिक वर्षें जगतात हें खचित आहे. ह्याचीं कारणें आतां सांगतों.

**१. ख्रिस्ती धर्मांत लग्नाविषयीं जातीचा निर्बंध नाहीं.** जवळजवळच्या नात्यांत लग्न संबंध जोडल्यापासून जे वाईट परिणाम होतात ते मागें सांगितलें आहेत. दूरदूरच्या मंडळींतून लग्नसंबंध जोडल्यानें अधिक चांगल्या शरीरसंपत्तिचीं लेंकरें निपजतात. दुसऱ्याही बाबतींत ह्यापासून मोठे लाभ होतात. जातीच्या पोटभेदांतील मर्यादेंत हिंदु लोकांस योग्य जोडा मिळण्यास वारंवार कठीण पडतें.

**२. बालविवाह करण्याची आज्ञा व प्रयोजन नाहीं.** ख्रिस्ती धर्मांत गर्भधानाचा संस्कार सांगितला नाहीं. ह्याविषयीं

बंगाली लोकांनीं अलिकडल्या एका चळवळींत ( संमति वयाचा कायदा पसार होतेवेळेस ) मोठी गडबड केली, ह्या हिंदु चालीचा परिणाम काय होतो ह्याविषयीं दा० स- रकार ह्यांचा अभिप्राय दाखविला होता. बालविवाहाकडून ज्यांची प्रकृति अशक्त झाली आहे अशा आईबापांच्या लेकरांपेक्षां प्रौढपणीं लग्न केलेल्या स्त्री पुरुषांची संतति अधिक बळकट होते.

**३. वैद्यास मान मिळतो, आणि सास आपल्या धंद्याचें पूर्ण ज्ञान होण्याकरितां चांगली सवड सांप- डते; सुईनी हलक्या व अशुद्ध आहेत असें मानीत नाहींत.**—वैद्याची जात कशी उत्पन्न झाली व त्यांस वैद्य क्रियेंत कुशलता प्राप्त करून घेतांना लोकांपासून किती अडचणी सोसून घ्याव्या लागतात हें मागें दर्शविलें आहे.

**४. धामी व रोग ह्यांस अटकाव करण्याकरितां गुणकारी साधनांची योजना होते.**—रोगाविषयीं हिंदु लोकांच्या ज्या अज्ञानाच्या कल्पना आहेत त्या ख्रिस्ती ध- र्मांत नाहींत. देवी काढल्यानें देवीची सात पसरत नाहीं. एका वर्षीं हिंदुस्थानांत २८००० मनुष्यें मेलीं. इंग्लंडांत तर ह्या रोगानें फारच थोडीं माणसें मरतात. स्वच्छ पाणी व शुचिर्भूतपणा हीं ताप व जरीमरी ह्यांपासून मोठीं रक्षण करणारीं साधनें आहेत.

**९. इस्पितळें व डिस्पेनसऱ्या (दवाखाने) ह्यांचा पुरवठा केला आहे.**—ख्रिस्ती धर्माचा स्थापक प्रभु येशू ख्रीस्त हा पृथ्वीवर असतां लोकांस उपदेश करीत व त्यांचें रोग बरे करीत सर्वत्र फिरला. त्याचें अनुयायी त्याचा कित्ता गिरवून गरिबांचें व दुःखितांचें साह्य करणें हें आपलें कर्त्तव्य आहे असें समजतात. असे लोक जेव्हां आजारी पडतात तेव्हां त्यांस आपला चरितार्थ चालविण्यास व वैद्यास देण्यास शक्ति नसते. याकरितां इस्पितळें फार उपयोगाचीं आहेत. तेणेंकरून पुष्कळांचें जीव वांचतात. वर सांगितलेल्या व दुसऱ्याही उपायांनीं रोग निवारण होतो व आयुष्याची वृद्धि होते.

## २. संपत्तीची वृद्धि होईल.

ती या रीतीनें होईल:—

**१. परदेशांत प्रवास करण्यास ख्रिस्ती धर्माचे अटकाव नाहींत.**—हिंदु लोकांस काळ्या पाण्याच्या पलीकडे जाण्याची किंवा म्लेंछ लोकांमध्यें स्वल्पकाल देखील राहण्याची मनाई आहे. ख्रिस्ती धर्म असें शिकवितो कीं, सर्व जग एकाच खऱ्या परमेश्वराच्या स्वाधीन आहे; आणि मनुष्यें परस्परांचे बंधु असून त्यांनीं एकमेकांशीं मोकळ्या मनानें दळणवळण ठेवावें. हिंदुस्थानांत तिळ व चहा होतो, आणि ज्या देशांत ते उत्पन्न होत नाहींत त्या देशांस तें पाठविलें

जातात. आणि त्याच्या मोबदला केरोसिन वगैरे पदार्थ येतात. ह्याप्रमाणें दोन्ही देशांस लाभ होतो. इंग्लिश व पारशी हे परदेशच्या व्यापाराकडून कसें धनवान होतात हें वर सांगितलें आहे.

**२. शेतकीला उत्तेजन मिळालेलें आहे.** ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांनीं जमीन नांगरूं नये ह्याविषयीं मनूचा कायदा आह्मी सांगितला. हिंदुस्थानांत अज्ञान रयतेच्या हातीं मात्र शेतकी असल्यामुळें नुकसान होत आहे. ख्रिस्ती धर्मांत असल्या प्रकारचा कांहीं प्रतिबंध नाहीं, आणि कृषिकर्म हें फार उत्तम मानिलें आहे.

**३. आपल्या हातानें मेहनत करणें हें मोठें प्रतिष्ठेजक मानिलें आहे.**—हिंदुधर्मानें कलाकौशल्यांस कसें नीचत्व आणलें आहे हें मागें दर्शविलें आहे. मेहनत करण्यांत मोठेपणा आहे असें ख्रिस्ती धर्म शिकवितो. आणि जे आपल्या निर्वाहासाठीं आळसानें किंवा गर्वानें श्रम करीत नाहींत त्यांस मात्र तो दोष लावतो. इंग्लंद देशांत फार कुशल लोहार, कोष्टी, आणि चितारी ह्यांस सरकारानें उमरावाची पदवी दिली आहे. ह्याप्रमाणें श्रेष्ठत्व पावण्याचें उत्तेजन मिळत आहे. शिडावांचून त्वरेनें वाऱ्यासमोर चालणारीं जहाजें बांधिलीं आहेत; घोड्यावांचून पळत जाणाऱ्या गाड्या; निमिषांत वर्तमान नेणारें; अशा दुसऱ्या पुष्कळ युक्ति निघाल्या. हिंदुस्थानांत पाहिलें

असतां मनूच्या काळापासून देशस्थिति बहुतकरून जशाची तशीच राहिली आहे.

**४. खोट्या धर्मादायास उत्तेजन दिलें नाहीं.**–हिंदुस्थानास "धर्माची भूमि" ह्मटली आहे. तरी ती "भिकाऱ्यांचीही भूमि आहे. दुसऱ्या कोणत्याही देशांत भीक मागणें हें प्रतिष्ठेचें कर्म मानिलें नाहीं. पंडित शिवनाथ शास्त्री ह्मणतात कीं, "हिंदु लोक पात्रापात्र न पाहतां जे दानधर्म करितात, तेणेंकरून राष्ट्रीय पुरुषत्वाचा पाया ढांसळून पडतो, आळसाला बक्षीस मिळतें,आणि पुरुष व स्त्रियांस भिक मागण्याचा नीच धंदा करायास शिक्षण मिळतें, आणि उद्योग करण्यास मिळत नाहीं. ख्रिस्ती धर्म मनुष्यांस रोगी व वृद्ध ह्यांसीं मायाळूपणानें वागण्यास शिकवितो; परंतु जे शरीरानें सशक्त आहेत त्यांस असें सांगतो कीं, जर कोणी काम करायास खुषी नाहीं तर त्यानें खाऊंही नये.

**५. लोकांवर जीं अरिष्टें येतात तीं त्यांनीं जिकावीं आणि कांहीं उद्योग न करितां त्यांस वश होऊं नये.**–हिंदु लोकांस असें वाटतें कीं, त्यांच्या कपाळीं जें लिहिलें आहे तें चुकत नाहीं, व कांहीं संकट येऊन पडलें असतां तें निवारण करणें व्यर्थ आहे. ख्रिस्ती धर्मांत असें कांहीं मत नाहीं. तर तो आपल्या अनुयायींस जीं दुःखें निवारण्याजोगीं तीं दूर करण्यास उपाय सांगतो.

**६. क्रियायुक्त परोपकार करण्यास आज्ञापिलें आहे.**—हिंदुधर्माप्रमाणें मुक्ति प्राप्त करून घेणें हाच परमार्थ आहे. सर्व कर्माचा त्याग करून, ध्यान करण्यांत आयुष्य घालविणें हाच उत्तम मार्ग मानिला आहे. ह्याची प्रवृत्ति दरिद्र्याकडे आहे आणि तेणेंकरून मनुष्यजातीच्या दुःखाचें उपशमन होत नाहीं. ख्रिस्ती धर्म आह्मास उद्योग करून दुःखितांचें सहाय करायास शिकवितो.

**७. व्यर्थ खर्च करण्यास उत्तेजन देत नाहीं.**—हिंदुस्थानांतील बहुतेक लोक कर्जांत बुडालेले आहेत. हें बहुतकरून लग्नकार्यांत व श्राद्धादि कर्मांत उधळा खर्च केल्यानें होतें. डागदागिने करण्यांत लोकांनीं जो पैसा खर्च केला त्याच्या व्याजावर जमिनीचा कर देतां येईल, असें मागें दर्शविलें आहे. आह्मी देवाचे कारभारी आहोंत व आह्मापाशीं जी मालमत्ता ठेविली आहे ती आह्मी उधळूं नये असें ख्रिस्ती धर्म शिकवितो. स्त्रियांनीं मोलवान वस्त्रालंकारांनीं आपणास सुशोभित करण्याबद्दल नम्र व शांत आत्म्यानें (स्वभावानें) सत्कर्माकडून शोभवावें असा त्यांस बोध केला आहे. शेतकी, शिल्पाचे कारखाने, व परदेश्यांशीं व्यापार हे तीन राष्ट्रीय संपत्तीचे मोठे उगम आहेत. त्या सर्वांस हिंदुधर्माकडून उत्तेजन न होतां ख्रिस्ती धर्माकडून पाठबळ होतें. हिंदु लोकांत साधारणतः जो निरर्थक कामाकरितां खर्च करितात तो करण्याची ख्रिस्ती धर्मांत आज्ञा नसल्यानें देशाची संपत्ति वाढते.

**८. ख्रिस्ती धर्मांत सर्वांस जबरीनें लग्न करण्यास लावण्याकरितां पुतनामक मत नाहीं.**– पुताविषयीं हिंदु लोकांचा जो विश्वास ह्मणजे पुतनामक नरकापासून पुत्र तारतो ( ह्मणून ) सर्वांस पुत्र असला पाहिजे असें जें मत त्याचें दुष्ट परिणाम मागें सांगितले आहेत. ख्रिस्ती धर्मांत असें मत नाहीं. इतकेंच नाहीं तर लग्न करण्याविषयीं सारासार विचार करावा असें तो शिकवितो. ऐहिक गोष्टी ज्या मनुष्याच्या दृष्टीस पडतात त्यांविषयीं ज्या धर्मापासून लाभ होत नाहीं तर मनुष्यांनीं पाहिला नाहीं असा जो परलोक त्यांत त्या धर्मापासून पारमार्थिक प्राप्तीची आशा कशी करावी ?

## ३. सत्य ज्ञानाचा प्रसार होईल.

**१. सर्व वर्गाच्या लोकांस शिक्षणाविषयीं उत्तेजन मिळेल.** हिंदु धर्मविद्येचीं जीं मुख्य अंगें आहेत तीं ब्राह्मणांनींच मात्र शिकावीं अशी मर्यादा लावून दिली आहे. हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्म येण्याच्या पूर्वीं व्यापाराच्या कामाकरितां मात्र फार थोडे लोक लिहिणें वाचणें शिकत असत. मिशनेरी लोकांनीं जीं कामें आरंभिलीं त्यांतील एक काम शाळांची स्थापना हें होतें. त्यांच्या शाळा निरनिराळ्या इयत्तेच्या ह्मणजे धुळाक्षर शिकविण्याच्या गांवठी वर्गापासून तर मोठमोठ्या युनिवर्सिटीच्या कॉलेजापर्यंत आहेत. त्यांत कोणासही

येण्याची मनाई नाहीं. मुलीकरितां पुष्कळ शाळा आहेत. हिंदुलोकांनीं पशूपेक्षांही नीच मानिलेल्या जातीचाही संभाळ होत आहे. पुष्कळ ख्रिस्ती देशांमध्यें मुलांस सक्तीनें शिक्षण देण्याविषयीं कायदे केले आहेत. विद्या शिकणें हा प्रत्येक मनुष्याचे जन्माचा अधिकार आहे असें मानिलें आहे. "मनुष्याच्या आत्म्यानें ज्ञानहीन असणें हें बरें नाहीं" असें ख्रिस्ती धर्म सांगतो.

**२. सत्य ज्ञानाचा प्रसार होईल, खोट्या ज्ञानाचा होणार नाहीं.** हिंदु लोक घरांत बसून आपल्या डोक्यांतून भुगोलविद्या काढतात. ख्रिस्ती लोक जहाजांत बसून पृथ्वीच्या सर्व भागांत जाऊन त्यांचें माप घेतल्यावर त्यांचें वर्णन करितात. आकाशांतील जडांचा दुर्बिणीनें शोध करितात; प्रत्येक विद्याशास्त्राचा जपून अभ्यास करितात. ज्याकाळीं ज्या गोष्टी घडल्या त्या काळाच्या जवळ असलेल्या लोकांपासून इतिहासाचें ज्ञान करून घेतात, आणि कोणता वृत्तांत ताडून अधिक खरा आहे हें समजण्याकरितां निरनिराळा वृत्तांत पहातात. जितके अधिक ग्रंथ वाचले जातात तितकें अधिक ज्ञान प्राप्त होतें, परंतु हिंदुधर्माचें ह्याच्या उलट आहे. हिंदुधर्म आणि बुद्धि ह्यांच्यामध्यें शत्रुत्व आहे. जे निर्बुद्ध मूर्त्तींची पूजा करितात, त्यांस बुद्धि प्राप्त होणें अशक्य आहे. आणि जर ते कोणत्याही रीतीनें बुद्धि प्राप्त करून घेतात तर तीं आपल्या देवाचा त्याग करून घेतात. दिवा जसा अंधाराचा शत्रु आहे, तसा शिक्षण हें हिंदुधर्माचा शत्रु आहे.

## ४. बुद्धिबल प्राप्त होईल.

कसरतीनें जसें शरीर बळकट होतें त्याप्रमाणें मनोशक्ति अभ्यासानें बळकट होतात व अनभ्यासानें त्या अशक्त होतात. हिंदुस्थानाच्या लोकांस पुष्कळ स्वाभाविक बुद्धि आहे, परंतु त्यांच्या धर्माकडून ती अशक्त झालेली असून तिचा विकास होण्यास प्रतिबंध आहे.

हिंदु लोकांच्या बुद्धीचें दौर्बल्य ज्या अकटोविकट गोष्टी लेंकरांप्रमाणें खऱ्या मानतात त्यांवरून दिसून येतें. लोकांस विचार करायास शिकवीत नाहींत; तर वडिलांच्या चालीप्रमाणें चालायास शिकवितात. व ती चाल तर श्रुतिस्मृतिपेक्षांही श्रेष्ठ मानिली आहे. हिंदु कुटुंबांतील मनुष्यांनीं धर्माच्या व व्यवहाराच्या प्रकरणांत आपल्या मुख्याच्या आज्ञेप्रमाणें चाललें पाहिजे. ख्रिस्ती धर्म ह्मणतो कीं, "सर्वांची पारख करा, व चांगलें तें धरा." लोकांस जें सर्व कांहीं त्यांच्यापुढें येतें त्याविषयीं विचार, शोध व तुलना करावी असें त्याचें सांगणें आहे. डोळे झांकून चालीला अनुसरूं नये. जें कांहीं वाईट असेल त्याचा त्याग केला पाहिजे व जें चांगलें आहे त्याचें रक्षण करावें. प्रत्येक मनुष्य आपल्या कर्मांचा देवाला जबाबदार आहे असें ख्रिस्ती धर्म शिकवितो. ह्या जगांत आपण एकटेंच येतो व एकटेंच निघून जातों. "आह्मा प्रत्येकास आपला हिशोब देवाला द्यावा लागेल."

## ८. राष्ट्रांची उन्नति होईल.

१. ख्रिस्ती धर्मांत वेगळ्या वेगळ्या कायद्याकरितां फूटी झालेल्या नाहींत. पंडित मोक्ष मुल्लर ह्मणतात, "हिंदु मनुष्यास राष्ट्रीयपणा काय आहे हें ठाऊक नव्हतें. तो आपल्या मुलांवर प्रीति करितो, त्याला आपल्या जातीचा अभिमान असतो. परंतु आपला सर्व देश एक आहे असा विचार त्याच्या मनांत येत नाहीं. हिंदुधर्मानें पूर्वी जे देश जिंकणारे आर्य लोक होते त्यांस इतकें अशक्त करून सोडलें आहे कीं, त्यांवर पुष्कळ लोकांनीं स्वाऱ्या आणून त्यांस जेरीस आणिलें.

२. **यूरोपांत जे पूर्वी रानटी जातीचे लोक होते ते आतां जगाच्या मोठ्या भागाचे राजे झाले आहेत.** २००० वर्षांमागें जेव्हां हिंदु लोक कांहींसे सुधारलेले होते तेव्हां इंग्लंदांत थोडीशी रानटी लोकांची वस्ती होती, ते आपल्या शरीराचे भाग रंगवीत, आणि आपली उपजीविका शिकार करून, मासे धरून व रानटी फळांवर करीत असत. इंग्लंडची राणी पृथ्वीच्या एक चतुर्थांश भागावर राज्य करिती. पश्चिम गोलार्धांत असाच फेरफार झाला आहे. अमेरिकेंतील युनाइटेड स्टेट्स यांत पूर्वी थोडेसे भटकणारे रानटी लोक राहत होते. आतां तो देश संपत्ति व बुद्धि याविषयीं कीर्तिमान झाला आहे.

## ६. जनव्यवहारिक व धर्मसंबंधी स्वातंत्र्य भोगायास मिळेल.

**१. जन व्यवहारसंबंधी स्वातंत्रतेची वृद्धि होईल.** हिंदु लोकांस जुलमी राज्याधिकाराशिवाय कोणतीही राज्यरीत माहीत नव्हती, असें दाखविलें आहे. मनुनें राजाला देवाचा अंश ह्मटला आहे. ख्रिस्ती धर्म राज्याधिकारांचा मान राखण्यास शिकवितो. व प्रजेच्या हक्काचा बचाव करणाऱ्यांस दोष लावीत नाहीं. रशिया सारख्या देशांत मूर्त्तिपूजक जुलमी राज्याचा शेष अद्याप आहे हें कबूल करावें लागतें. जेथें शुद्ध ख्रिस्ती धर्माचें प्राबल्य आहे तेथें पुष्कळ स्वतंत्रता व कायदेशीर व्यवस्था आहे. इंग्लदाच्या राणीलाही कोणाला स्वतः अल्प शिक्षा देखील करवत नाहीं, किंवा सरकारी तिजोरींतून लहानशी रक्कम सुद्धां काढून घेववत नाहीं. प्रत्येक मनुष्याला आपलें चौकशी करून घेण्याचे हक्क आहेत. आणि राणीला पार्लमेंटानें जी द्रव्याची नेमणूक संमत देऊन केली आहे, तेवढीच मिळतें.

**२. धर्मसंबंधी मोकळिकेचा उपभोग घेण्यास मिळतो.** हिंदुधर्म हा एकाच वेळेस अतिशय सहन करणारा व पराकाष्ठेचा भयंकर रीतीनें असहन करणारा आहे असें मागें सांगितलें आहे. एकाद्या मनुष्याचा कशावरही विश्वास असला

किंवा नसला, तो कसाही दुराचरणी असला तरी चालतें. पण आपल्या मनाच्या सांगीप्रमाणें तो ख्रिस्ती धर्म अंगीकारून व प्रसिद्ध रीतीनें बाप्तिस्मा घेऊन वागूं लागला, तर त्याला त्याचे लोक शाप देऊन घरांतून हांकून लावतील. ख्रिस्ती धर्म सर्वांस आपआपल्या धर्माप्रमाणें वागण्याची पूर्ण मोकळिक देतो. वर जें एक ख्रिस्ती शास्त्रांतून वचन घेतलें आहे, त्यावरून प्रत्येक माणूस आपापल्या कर्मांविषयीं देवाला जबाबदार आहे असें सिद्ध होतें. बाबेलोन देशांत एक राजा होता त्यानें एक सोन्याची मूर्त्ति केली होती. आणि तिच्या कोणी पायां पडला नाहीं तर त्याला जळत्या भट्टींत टाकायाचा आपणास अधिकार आहे असें त्याला वाटलें. रोमन लोक हें मोठें व अंशतः सुधारलेलें राष्ट्र होतें. ख्रिस्ती लोकांनीं जर राष्ट्रीय देवांचें भजन केलें नाहीं तर त्यांस देहांत शिक्षा करणें योग्य आहे, असें त्यांस वाटत होतें. जसें जुलमी राज्यांत तसेंच नांवाच्या ख्रिस्ती देशांत देखील धर्मसंबंधी मोकळीक मिळत नसे; परंतु जेथें ग्रेट ब्रिटन व युनाईटेड स्टेटस ह्या सारख्या देशांत ख्रिस्ती धर्म काय आहे हें चांगलें समजत तेथें अशा प्रकारची मोकळीक आहे.

### ७. मनुष्यांचें बंधुत्व कबूल केलें जाईल.

हिंदुधर्म असें शिकवितो कीं, ईश्वराच्या निरनिराळ्या भागांपासून निरनिराळ्या जाती उत्पन्न झाल्या आहेत. तो धर्म

मनुष्यमनुष्यांमध्यें दुस्तर अडचणीचे बाण घालतो. ख्रिस्ती धर्म जे भेद मनुष्यांस एकमेकांपासून वेगळे व दूर करतात ते मोडून काढते. तो असें सांगतो कीं, देवानें सर्व राष्ट्रें पृथ्वीवर राहण्याकरितां एका रक्ताची केलीं आहेत. सर्व मनुष्यें एकाच मूळ पूर्वजापासून उत्पन्न झालीं आहेत. त्यांच्या रंगांत जो भेद आहे तो निरनिराळ्या देशांच्या हवेंत राहण्यानें व उन्हातानांत फिरण्यानें झाला आहे. कोणी एक कवी असें ह्मणतो कीं, "आह्मीं एकाच महा पित्याचीं लेंकरें आहोंत."

सर्व देशांत जीवनाचें एकच बीज व नाना भाषा व नाना वर्ग हे त्याच्या सूत्रानें पेरलें आहे. देव आमचा स्वर्गीय पिता व आह्मी सर्व त्याच्या एका कुटुंबांतील बंधु असें आह्मी मानावें. कोणी गर्वानें फुगणार नाहींत व दुसरे पशुपेक्षांही नीच मानलें जाणर नाहींत. कित्येक नांवाच्या ख्रिस्ती लोकांच्या मनांत अशा गोष्टींविषयीं जसे विचार असावेत तसे नाहींत हें खरें आहे. ह्मणजे ते आपणास गर्वानें श्रेष्ठ समजतात व दुसऱ्यांस नीच मानतात, असें करण्याचें कारण ज्या धर्माचा ते बाणा बाळागितात, त्याच्या आज्ञेप्रमाणें ते चालत नाहींत.

## ८. मनुष्यामनुष्यांमध्यें न्यायाची वृद्धि होईल.

ब्राह्मणांस जगाच्या प्रभुत्वाचा अधिकार आहे, असें मनुधर्मशास्त्र ह्मणतें, असें आह्मी मागें दर्शविलें आहे.

ब्राह्मणास शिक्षा केली तर ती फारच हलकी करावी. आणि कोणी त्यांचा अपमान केला तर त्यास मोठी क्रूर शिक्षा करावी. हे राक्षसी कायदे "स्वयंभूनें" केले आहेत असें ह्मटलें आहे. पिनलकोडाची मनूच्या धर्मशास्त्राशीं तुलना करून पाहिलें असतां तें नुसतें ख्रिस्ती प्रेरणेनें रचलेलें आहे असें मानावें लागतें. त्यांत नीच जातीचा व गरीब व धनवान यांचा भेद केला नाहीं. सर्वांस एकच कायदा लागू केला आहे. व एकच शिक्षा सांगितली आहे.

## ९. प्रत्येक मनुष्यास आपली स्वतंत्रता भोगण्यास मिळेल, आणि सामाजिक सुधारणेचे अडथळे दूर होतील.

मनुष्यजातीवर जे आजपर्यंत सामाजिक जुलूम झाले आहेत त्यांपैकीं "जात" हा मोठा कठोर जुलूम होय.

हिंदू मनुष्याच्यानें तिच्या निर्बंधापासून आपली सुटका करून घेववत नाहीं. तिच्या भारापासून मुक्त होववत नाहीं. परंतु ख्रिस्ती धर्म या पुढें सांगितलेल्या गोष्टींविषयीं मनुष्यांस पूर्ण मोकळीक देतो.

१. **कोणत्याही देशांत प्रवास करणें.**—काळें पाणी ओलांडून जाणें किंवा कोणत्याही देशांत जाऊन राहणें ह्या विषयीं सर्वांस पूर्ण मुभा आहे. कोणत्याही लोकांस म्लेंच्छ

असें मानूं नये. सर्व पृथ्वी ईश्वराची आहे, आणि कोठेंही त्याची भक्ति करितां येते.

**२. कोणत्याही सदाचारी लोकांची संगत धरिली असतां बाट लागत नाहीं.** ऑक्सफर्ड एथील सर मॉनियर विलियमस हे जेव्हां एथें आले होते, तेव्हां त्यांची ज्या पंडितांनीं भेट घेतली त्यांनीं त्यांच्या हातांशीं हात लावल्यावर घरीं जाऊन स्नान करून आपणांस शुद्ध करून घेतलें. दुष्टांची संगत ठेवूं नये असें ख्रिस्ती धर्म शिकवितो हें खरें आहे. परंतु इतरांशीं संगत ठेवण्यास त्याकडून पूर्ण मोकळीक आहे.

**३. कोणतेंही अन्न खाण्याविषयीं कांहीं निषेध नाहीं. इतकेंच कीं तें शरीरास पथ्यकारक असावें.** पोट हें हिंदुधर्माचें स्थान आहे, असें मागें सांगितलें आहे. ख्रिस्ती धर्म असें सांगतो कीं, मनुष्य जें कांहीं खातो त्याकडून भ्रष्ट होत नाहीं तर वाईट विचार, वाईट कर्म, वाईट शब्द यांकडून होतो. ख्रिस्ती मनुष्य जेवतांना आपणांस कोणी पाहील ह्मणून भीत नाहीं, अथवा कोणाची छाया पडून अन्न विटाळेल, किंवा नजर लागून तें बिघडेल असें त्याला भय वाटत नाहीं. तो कोणाच्याही हातचें स्वच्छ पाणी पितो.

**८. जवळच्या नातलगांशिवाय कोणाशींही लग्न करण्यास प्रतिबंध नाहीं.** जातीच्या असमंजस नियमामुळें हिंदु लोकांस लग्नाच्या बाबतींत किती दुःखें भोगावीं लागतात

हें सर्वांस माहितच आहे. ख्रिस्ती धर्म ह्या सर्व त्रासांपासून मोकळा आहे. कोणताही योग्य जोडा मिळाला असतां लग्न करण्यास हरकत नाहीं. लहानपणीं लग्न करण्याची गरज नाहीं. पुनर्विवाहाची हरकत नाहीं.

## १०. मनुष्यजातीचें दुःख कमी होईल व सुख वाढेल.

**१. हिंदुधर्म हा स्वार्थाचा धर्म आहे.** उष्ण देशांत श्रम करणें हें कष्टदायक आहे. कामांपासून सुटका असणें हेंच महासुख आहे, असें बहुत हिंदु लोक समजतात. बायको, लेंकरें, घरदार हीं सोडून वनांत जाऊन एकांतवासांत जाऊन राहणें व सर्व बऱ्या वाईट कर्मांचा त्याग करणें हीच उत्कृष्ट प्रकारची धर्मशीलता आहे असें मानलें आहे. तो गरीबांचें साह्य करीत नाहीं; अज्ञानांस ज्ञान शिकवीत नाहीं; वाईट चाली व वाईट लोक ह्यांस सुधारण्याचे कांहीं यत्न करीत नाहीं. हा आपलपोटेपणाचा धर्म आहे. जो तो आपापली काळजी मात्र वाहतो. कर्ममार्गानें चालणारे मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांस दानधर्म करितात. गरीब व पिडलेलें यांस करीत नाहींत. ते आपल्या पूर्वजन्मींच्या पापाचीं फळें भोगतात अशी त्यांची कल्पना असते.

**२. ख्रिस्ती धर्म हा परोपकाराचा धर्म आहे.**— त्यांत देवाचें एका शब्दांत वर्णन केलें आहे, “**देव प्रीति**

आहे." दुसऱ्या ठिकाणीं त्याला असें ह्मटलें, "तूं चांगला आहेस व चांगलें करितोस." प्रभु येशू ख्रीस्ताविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "तो जगांत असतां सर्वत्र बरें करीत फिरला." संसारांतील कर्त्तव्य कर्माचा त्याग करण्यास ख्रिस्ती शास्त्र सांगत नाहीं. तर खरी भक्तिभावना धरून सर्व कांहीं देवाच्या दृष्टीसमोर व त्याच्या आज्ञा पाळून ती करणें ह्यांतच परम भक्तिशीलता आहे. मनुष्यमात्रांविषयीं आमचीं जीं कर्त्तव्यें आहेत त्याची मोठी आज्ञा हीच आहे कीं, "जशी तूं आपणावर प्रीति करितोस तशीं तूं आपल्या शेजाऱ्यावर कर." रास्त किंवा वाजवी काय आहे हें आईबापांनीं नीट जपून लेंकरांस शिकवावें; सर्वांनीं आपल्या शेजाऱ्याचें कल्याण करण्यास यत्न करावें; आपल्या देशाच्या कल्याणाची वृद्धि करावी; आणि आपल्या हातून होईल तितकें दुसऱ्या देशांचेंही कल्याण करावें. ख्रिस्ती देशांत बहुतकरून सर्व प्रकारच्या कृत्यासाठीं मंडळ्या आहेत. गोरगरिब, अनाथ, निराश्रित विधवा, अंधळे, लंगडे लुळे, गृहहीन, रोगग्रस्त, वृद्ध ह्या सर्वांसाठीं सोई केल्या आहेत. जाचलेले, गांजलेले यांची सोडवणूक करण्यासाठीं व गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठीं यत्न करितात. विलायतेंत "पीस सोसैटी" राष्ट्रांमध्यें लढाईचा प्रसंग टाळून सल्ला करण्यास यत्न करणारी मंडळी आहे. विद्याशिक्षण मंडळ्या गरिबांकरितां शाळा चालतात.

मिशनेरी मंडळ्या सर्व जगांत सत्य धर्माचा प्रसार करण्याविषयीं यत्न करितात. ह्या सर्व उपायांकडून मानवी दुःखाचा क्षय होऊन सुखाची वृद्धि होते.

## ११. स्त्रियांस योग्य पदावर बसवावें.

मनु ह्मणतो कीं, बायकांचे वाईट गुण त्यांस ईश्वरानें दिलें. स्त्री ही केवळ "असत्याची मूर्त्तिच आहे" तिला सर्वदां स्वाधीन ठेवलें पाहिजे. बायकोला मूल किंवा गुलाम यांप्रमाणें फटके मारावे. तिला कांहीं धर्मकर्म करण्याचा अधिकार नाहीं. विधवांस लग्न करण्याची मनाई केली असून सती जाण्यास उत्तेजन दिलें आहे. ख्रिस्ती धर्मांत अशी वचनें व नियम नाहींत. नीतीच्या संबंधानें पुरुषांपेक्षां स्त्रिया अधिक वाईट आहेत असें मानिलें नाहीं; ह्यापेक्षां उलट आहे. नवरा हा कुटुंबाचा मुख्य आहे असें मानिलें आहे खरें. आणि ज्यांत बऱ्या वाईटाचा विचार नाहीं, अशा प्रकरणांत नवऱ्याला श्रेष्ठ मानिलें आहे. परंतु स्त्रीला परम प्रीतीनें वागवावें असें सांगितलें आहे. ख्रिस्ती धर्म पुढें सांगितल्याप्रमाणें स्त्रियांची योग्यता वाढवितो:—

१. **त्यांस शिक्षण देऊन.**—ख्रिस्ती देशांत मुली मुलांप्रमाणेंच शाळेंत जातात, आणि त्यांच्या संसाराच्या कामास उपयोगी असें त्यांस शिक्षण मिळतें. तेणेंकरून त्या अधिक बुद्धिवान व आपल्या नवऱ्याच्या योग्य सोब-

तीणी होतात, त्यांस चांगली मसलत देतां येती, व आपल्या मुलांस चांगलें वळण लावतां येतें.

२. **स्त्रियांस पुरुषांच्या मंडळींत मिळूं दिल्यानें.**— ख्रिस्ती धर्मांत स्त्रियांस पडद्यांत ठेवण्याची चाल नाहीं. राम सितेविषयीं ह्मणतो कीं, "घरें, वसनें किंवा आवाराच्या भिंती हीं स्त्रियांकरितां पडदे आहेत असें नाहीं, तर स्त्रीचें सतीत्व (सद्गुण) हेंच तिचें रक्षण आहे." स्त्रियांस योग्य प्रकारचें शिक्षण मिळालें आहे, आणि ज्यांस सद्धर्म आहे त्यांस सदाचरणी पुरुषांच्या मंडळींत जाण्यास कांहीं भय नाहीं. येणेंकरून स्त्रियांस स्वतः लाभ होतो. सुशिक्षित मनुष्यांशीं दळणवळण ठेवल्यानें त्यांची बुद्धि वाढते. नवऱ्याचा आपल्यावर भरंवसा आहे असें त्यांस समजल्यानें त्यांस स्वाभिमान उत्पन्न होतो. ख्रिस्ती देशांत तरुण व अविवाहित स्त्रिया एकट्याच बाहेर जातात. परंतु ह्या देशांत अशा प्रकरणांत एकाएकी फेरफार करणें हें इष्ट नाहीं, परंतु स्त्रियांस जनानखान्यांत कोंडून ठेवूं नये.

३. **अनेक बायका व उपपत्न्या ठेवण्याची चाल बंद केल्यानें.** हिंदु लोकांमध्यें नवऱ्याला एकच बायको असते हा साधारण नियम आहे हें खरें. परंतु ह्याचें कारण बहुधा गरिबी व सवती सवतीचें भांडणाची माहिती हें असतें. श्रीमंत लोकांत उपपत्न्या ठेवण्याची चाल फार आहे. हिंदु राजांस लग्नाच्या बायका व उपपत्न्या ह्या पुष्कळ

असत. असें करण्यांत दोष नाहीं. ह्याविषयीं त्यांस त्यापल्या देवाची उदाहरणें दाखवितां येतील. विष्णूचा मानलेला अवतार जो कृष्ण यास १६००० बायका व १८००० मुलें होतीं. खिस्ती धर्मात एक बायको असतां दुसरी करण्याची अगदीं मनाई आहे. व उपपत्न्या ठेवणें यांत मोठें पाप आहे असें सांगितलें आहे. येणेंकरून गृहकलह बंद होतात व स्त्रियांची योग्यता वाढती.

**४. व्यभिचाराच्या कारणावांचून बायकोस सूटपत्र देण्याची मनाई.** ह्या बाबतींत हिंदू लोक मुसलमानांपेक्षां बरें आहेत, असें ह्मटलें पाहिजे, कारण, "तुला सूटपत्र दिलें आहे," असें ह्मणून कोणत्याही क्षणीं ते आपल्या बायकांस लावून देतात. हिंदु लोकांत व्यभिचाराच्या कारणाशिवाय दुसऱ्यांही कित्येक कारणांवरून नवरा बायकोला टाकूं शकतो.

**५. बालविवाह करण्यास आज्ञा नसल्यामुळें व बायकोला आपला नवरा निवडून घेण्याची (स्वयंवर करण्याची मोकळीक) असल्यामुळें**—बालविवाहापासून होणारे अनर्थ हे आह्मी दाखविले आहेत. मुलींचें लग्न ज्या अर्थी लहानपणीं होत नाहीं त्या अर्थी त्या उपवर झाल्यावर त्यांस ज्या पुरुषांशीं लग्न करण्याची आवड असेल त्यांशीं आपल्या आईबापांच्या संमतीनें लग्न लावावें.

**६. विधवांस लग्न करण्याची मोकळीक दिल्यानें व सती जाण्याची मनाई करण्यानें.**—स्त्रिया एकदां विधवा झाल्या ह्मणजे त्यांस हिंदुधर्म दुःखसागरांत ढकलून देतो. त्यांच्या पापांमुळें त्यांचे नवरे मेले असें ह्मणतात. बहुत स्त्रियांकडून वैधव्य दशेंत पुष्कळ अनाचार व बालहत्या घडतात. तरुण विधवांनीं अविवाहित राहण्यापेक्षां लग्न करावें हें बरें असें ख्रिस्ती धर्माचें ह्मणणें आहे. उतारवयाच्या विधवांनीं गरिबांस सहाय्य करणें, रोग्यांची सुश्रुषा करणें इ० परोपकाराचीं कृत्यें करावीं असें सांगितलें आहे. सती जाण्याची क्रूर चाल ख्रिस्ती देशांत माहीत नाहीं. ख्रिस्ती लोक सती जाणें हें पुण्यकर्म आहे असें न मानतां ह्यांत महापाप आहे असें ते समजतात.

**७. त्यांस धर्मसंबंधी ज्ञान प्राप्त करून घेण्याची मोकळीक देण्यानें.**—मनूनें ह्या गोष्टीचा निषेध केला हें आह्मीं वर दाखविलेंच आहे. ह्या प्रकरणांत स्त्रिया व पुरुष हीं समान आहेत असें ख्रिस्ती धर्म वाजवी सांगतो. स्त्रियांस आपल्या लेंकरांस त्यांचीं ईश्वरसंबंधी कर्त्तव्यें शिकवावयाचीं आहेत; त्यांनीं आपल्या नवऱ्यांस भक्तिभावनेची प्रेरणा करावी. कारण ते संसाराच्या चिंतेंत गुंग होण्यासारखे आहेत. पुष्कळ ख्रिस्ती स्त्रिया अज्ञान्यास धर्मज्ञान शिकविण्याकरितां व जे मरणोन्मुख झाले आहेत त्यांची परलोकची तयारी करण्याकरितां बाहेर जात असतात, अशाप्रकारें स्त्रियांची योग्यता वाढेल.

## १२. मनुष्य पशुसारिखा नीच मानला जाणार नाहीं.

हिंदु शास्त्राप्रमाणें जीव तेथून एक असें आह्मीं मागें दर्शविलें आहे. मनुष्य कुत्रा, मासा, कीटक यांच्या व झाडांच्या योनींत जाऊं शकतो. मांजर, कुत्रा, बेडूक अथवा कावळा ह्यांच्या वधाबद्दल मनूनें जें प्रायश्चित् सांगितलें आहे तेंच शूद्राच्या वधाबद्दल सांगितलें आहे. ख्रिस्ती धर्म असें शिकवितो कीं, मनुष्य आणि नीच प्राणी यांच्यामध्यें दुस्तर मर्यादा आहे. मनुष्यास चिरकाल राहणारा असा आत्मा आहे; कनिष्ठ प्राण्यांचा जीव त्यांच्या शरीरांबरोबर नाश पावतो. मनुष्य आपल्या उत्पन्नकर्त्यास जाणून त्याचें भजन करूं शकतो, पश्वादि प्राण्यांस देवाविषयींचें ज्ञान शिकवितां येत नाहीं. आह्मास पूर्वजन्म नव्हता, आणि जन्मांतर नाहीं असेंही ख्रिस्ती धर्माचें मत आहे. मनुष्यास परलोकीं इहलोकच्या कर्माप्रमाणें बरेंवाईट फळ प्राप्त होईल.

## १३. पशुभक्ति आणि मूर्त्तिपूजा यांचा लय होईल.

हिंदुधर्मांत गायीचें शेणदेखील पवित्र मानिलें आहे असें आह्मीं मागें दाखविलें आहे. तिचें मूत्र हें सर्व तीर्थापेक्षां पवित्र जल आहे; तिच्या शेणाचें भस्म पापी मनुष्यावर शिंपडलें असतां तो लागलाच पवित्र होतो. पंचगव्य ( गायी-

चें दूध, दहीं, तूप व मलमूत्र हे पांच पदार्थ) प्राशन केल्यानें सर्व प्रकारच्या दोषांपासून शुद्धि प्राप्त होते. खिस्ती धर्मामध्यें हे सर्व प्रकार अगदीं ओंगळ मानिले आहेत.

प्राचीन काळीं युरोपांतील एका शहराविषयीं असें ह्मणत असत कीं, त्यांतील मूर्त्तीची संख्या इतकी होती कीं, तेथें मनुष्यांपेक्षां देवांचें दर्शन लवकर होत असे. हिंदुस्थानाविषयींही असेंच कांहीं प्रकारें ह्मणावें लागतें. सर्व देश मूर्तींनीं भरला आहे. वास्तविक पाहतां हिंदु लोक जिला भजत नाहींत अशी एकही वस्तु वर आकाशांत किंवा खालीं पृथ्वीवर नाहीं.

**मूर्तीपूजेचें मूर्खत्व.**—कोणी एकानें मूर्त्तिपूजेला पोरखेळाची उपमा दिली आहे, ती योग्य आहे. लेंकरें खेळतांना बाहुल्यांस जीव असल्याप्रमाणें त्यांच्याशीं बोलतात. त्यांस वस्त्रें नेसवितात, जेऊं घालतात, निजूं घालतात. मोठीं माणसें असेंच करितात; ते आपल्या मूर्त्तीस जीव असल्याप्रमाणें त्यांच्याशीं वागतात. जरी त्यांच्यानें कांहीं खाववत नाहीं तरी ते त्यांस नैवेद्य दाखवितात; आणि त्यांस दिसत नसतांही त्यांच्यापुढें दिवे लावतात; थंडीच्या दिवसांत त्यांजवर ऊबदार वस्त्रें घालतात, उष्णकाळांत त्यांस पंख्यानें वारा घालतात, आणि मच्छर डसूं नयेत ह्मणून त्यांस पडद्यांत ठेवितात.

मूर्तीनें आपल्या भक्तांचें संरक्षण करण्याबद्दल भक्तांसच तिचा संभाळ करावा लागतो. आपल्या देवांचे हातपाय मोडतील अशी भक्तांस काळजी असते. कधीं कधीं देवळांत चोर शिरून मूर्त्तीचे दागिने नेतात. आपल्या साह्यार्थ कोणी यावें ह्मणून देवाच्यानें एक देखील चांगली आरोळी मारवत नाहीं. एखादे वेळीं झुरळें मूर्त्तीचा रंग बिघडतात. उंदीर तिच्या आंगाला भोकें पाडतात, वडवाघुळ तिला भ्रष्ट करितात. माशाही प्रथम अमंगळ पदार्थावर बसून मग तिजवर येऊन बसतात. याप्रमाणें मूर्त्ति आपला अपमान करूत घेत असतां तिचें देवत्व कोठें असतें? ख्रिस्ती धर्मानें मूर्त्तिपूजा ही अत्यंत दोषी ठरविली आहे. त्याच्या दाहा आज्ञांपैकीं दुसऱ्या आज्ञेंत मूर्तिपूजेचा निषेध केला आहे. ब्रह्म निराकार आहे, असें हिंदु लोक कबूल करितात, देव आत्मा आहे असें ख्रिस्ती लोक ह्मणतात. खोदीव काम करणारास मनुष्याच्या शरीराचा पुतळा करितां येतो, पण त्याच्या आत्म्याचा आकार त्याच्यानें करवेल काय? तसेंच देवाची मूर्त्ति करणें अशक्य आहे. "तुह्मी माझी तुलना कोणाशीं कराल व कोणती प्रतिमा मला लावाल?" असें परमेश्वर ह्मणतो. जगांतील राष्ट्रें आपल्या मूर्ति वडवाघूळांस टाकतील व त्यांचा भक्ति बुडून जाईल असें भविष्य आहे.

## १४. एकच जो खरा देव त्याचीच भक्ति मात्र लोक करितील.

ऋग्वेदांत देव आपल्या बायकांसुद्धां तेहतीस आहेत असें साधारणतः सांगितलें आहे. त्यांची संख्या ३३ कोटीपर्यंत वाढली आहे. एकच देव आहे असें जें ख्रिस्ती मत त्याचा प्रसार होत चालला आहे. याकरितां सर्व देव निरनिराळ्या नांवांनीं एकच असें ह्मणून शिकलेले हिंदु लोक अनेक देवमताचे दोष उडवूं पाहतात. परंतु हें त्यांचें ह्मणणें खरें नाहीं हें मागें दाखविलेंच आहे. ज्या देवास असम सामर्थ्य आहे व जो देव दुसऱ्याची ईर्षा करीत नाहीं, असा शोधून काढून त्याची भक्ति करणें हें हिंदु लोकांस मोठें गूढ पडतें. त्यानें एकाचीच प्रार्थना करावी किंवा सर्वांची एकदम करावी? परंतु आणखी एक प्रश्न आहे तो असा कीं, हे देव खरोखर आहेत कीं काय? अशा प्रकारचे कोणी तरी आहेत कीं काय? इंद्राचा स्वर्ग मेरु पर्वताच्या शिखरावर आहे असें ह्मणतात. परंतु असा पर्वत मुळींच नाहीं असें आह्मीं सिद्ध करून दिल्हें आहें. हिमालय पर्वताच्या मानस सरोवराच्या उत्तरेस शिवाचें कैलास आहे असें ह्मणतात. हिमालयाच्या प्रदेशाचा पुष्कळ लोकांनीं शोध केला आहे, परंतु असें स्थल त्यांस कोठें सांपडलें नाहीं. जगांतील दुसऱ्या लोकांचे जसे सहस्त्रावधि देव आहेत तसे हिंदु लोकांचेही आहेत. अशांची प्रार्थना करणें अगदीं व्यर्थ आहे, इतकेंच नाहीं, तर त्यांची भक्ति करणारे सर्व सृष्टीचा जो खरा मालक त्याजविरुद्ध बंडखोर आहेत. अनेकदेवमत जगांतून नाहींसें

होईल. “ ज्या देवांनीं आकाश व पृथ्वी उत्पन्न केली नाहीं ते पृथ्वीवरून व आकाशाखालून नष्ट होतील.” बहुदेवमताखेरीज एकमेवाद्वितीयम ह्मणजे (एकावांचून दुसरें नाहीं) ह्या वाक्यांत जें अद्वैतमत तें आहे. ब्रह्म हेंच मात्र सद्वस्तु आहे इतर सर्व माया आहे असें ह्मटलें आहे. हें ब्रह्म निर्गुण असून निष्क्रिय आहे ह्मणजे कोणतेंही कर्म करीत नाहीं. सकल जगत मायेपासून झालें आहे. अहंब्रह्मास्मि हें अयुक्तिक व देवनिंदात्मक वाक्य, ह्याचा उपयोग केला पाहिजे असें अधिकारानें ह्मणतात. याप्रमाणें देव व मनुष्य यांचें स्वत्व नष्ट होतें. ख्रिस्ती धर्मांत जसें बहुदेवमतास दोष लाविला आहे त्याप्रमाणें हें मतही दूषणार्ह ठरविलें आहे. सृष्टीच्या आकाराविषयीं जो वरिष्ठ व कनिष्ठ विचार आहे त्याचें हें एकच रूप आहे. हिंदुस्थान ख्रिस्ती झालें असतां विष्णु, शिव, राम, काली, सरस्वती इत्यादिकांची भक्ति बंद होईल. आणि एकच खरा व जीवंत देव, जो आपल्या भक्तांची आरोळी ऐकण्यास व त्यांच्या प्रार्थनेचें उत्तर देण्यास शक्तिमान आहे, त्या आपल्या स्वर्गीय पित्यासमोर सर्व लोक गुडघे टेंकतील व त्याचें भजन करितील.

## १९. सुवंद्य असा देव प्राप्त होईल.

देवाविषयीं मनुष्याच्या मनांत जी कल्पना येती तिचें त्याच्या धर्मसंबंधी श्रद्धेवर व व्यावहारिक आचरणावर मोठें

वजन पडतें. ही सत्यता "यथा देव तथा प्रजा" ह्या ह्मणींत कबूल केली आहे. ज्या देवाची आपण भक्ति करितों त्यासारखे आमचे गुण होतात. जर तो खुनसी व अशुद्ध आहे तर आमच्या दुर्वासना बळकट होतील; जर तो पवित्र आणि प्रीति करणारा आहे तर आह्मी उत्तरोत्तर त्याच्या प्रतिमेसारिखे होऊं.

हिंदुशास्त्रामध्यें देवाविषयींचीं परस्पर विरुद्ध मतें आहेत असें कबूल केलें आहे. त्याच्या ठायीं सत्व, रज आणि तम असे तीन गुण आहेत असें मानिलें आहे. उदाहरणार्थ, ज्यांची भक्ति पुष्कळ लोक करितात असे विष्णु, शिव, व कालि हीं दैवतें घ्या. तीं मनुष्याप्रमाणें एकमेकांशीं भांडतात आणि भ्रष्ट मनोविकाराचे दास असल्याप्रमाणें वाईटाबद्दल वाईट करितात. कालिका देवी ही हिंसक आहे. मनुष्य जातीमध्यें जसें बलाढ्य व जुलमी अधिकाऱ्यांस भितात त्याप्रमाणें ह्यांचेंही लोक भय धरून त्यांस पूजतात. परंतु त्यांचें व त्यांच्या कर्मांचें ध्यान केल्यानें त्यांचे भक्त सुधारण्यापेक्षां अधिक वाईट होतात.

ख्रिस्ती धर्मांत ईश्वराविषयीं उत्तम कल्पना प्रगट केल्या आहेत, आणि त्याची भक्ति केल्यानें अत्यंत हितकारक परिणाम होण्याजोगतें आहेत. "मी आहें" असें ज्याचें नांव तोच तो स्वयंभू आहे. "त्याला दिवसांचा आरंभ व वर्षांचा अंत नाहीं." " अनादिकालापासून अनंतकालपर्यंत तूं

देव आहेस." तो "निर्विकार, आज, काल व सर्वकाल सारखाच आहे." तो सर्व समर्थ देव आहे. त्यानें शून्यापासून सकल विश्व उत्पन्न केलें, आणि त्याचें प्रभूत्व सर्वांवर चालतें. तो कधीं अचेतन असत नाहीं. तो कधीं डुकलीं किंवा झोंप घेत नाहीं. पृथ्वीच्या सीमांचा उत्पादक कधीं थकत किंवा भागत नाहीं. त्याच्या अपार राज्यांत जें कांहीं घडतें तें त्याला समजतें. त्यास समजल्यावांचून आमच्या मस्तकाचा एक केशही खालीं पडत नाहीं. आमच्या अंतःकरणांतील प्रत्येक कल्पना तो जाणतो. आपल्या लेंकरांच्या ओरडण्याकडे सदां कान लावतो. जो खरा एकच देव तो सगुण ब्रह्मासारखा नाहीं. तो सत्यतेचा देव आहे. तो प्रकाश आहे व त्याजमध्यें कांहीं अंधकार नाहीं. निष्कलंक शुद्धता हा त्याचा महा तेजोमय गुण आहे. पापाचा तो अत्यंत द्वेष करितो. " पवित्र, पवित्र, पवित्र, सैन्यांचा देव आहे." ब्रह्मासारखें स्वार्थाचें वर्त्तन दाखविण्याबद्दल तो आपल्या प्राण्यांचें निरंतर कल्याण करीत आहे. त्याच्या गुणांचें एकाच शब्दांत वर्णन केलें आहे. देव प्रीति आहे. तथापि, ही प्रीति बऱ्या वाईटाकडे समदृष्टीनें पाहती असें नाहीं. जर कोणी राजा अपराध्यांस शिक्षा देणार नाहीं तर त्याचें राज्य नरकासारिखें होईल. परंतु देवानें स्वतः असें ह्मणून दाखविलें आहे कीं, " प्रभु परमेश्वर ह्मणतो, दुष्टाच्या मरणाविषयीं मी कांहींच संतोषतों काय ? त्यानें आपले मार्ग सोडून

वांचावें याविषयीं मी संतोषतों कीं नाहीं ?" भक्ताचें वर्त्तन त्याच्या देवाच्या वर्त्तनासारखें होतें. मनुष्य ब्रह्माप्रमाणें जसजसा होत जाईल तसा तो स्वार्थी व निरुपयोगी होईल, हें आह्मीं वर सांगितलें आहें. ब्रह्मा, विष्णु, शिव व कृष्णा यांच्या कित्येक कर्मांचा कित्ता मनुष्यांस घेणें योग्य आहे काय? ख्रिस्ती मनुष्यानें तर परम उच्च स्थितीस पावणें ह्मणजे ईश्वराप्रमाणें विमल, प्रीतिमान व पवित्र होणें असें आहे. वर जे दोन पक्ष सांगितले आहेत, त्यांतून कोणता पक्ष रास्त आहे? कोणत्यावरून देवाविषयींची श्रेष्ठ कल्पना मनांत भरती? पृथ्वी व आकाश यांचें चिंतन केल्यानें मनांत ज्या भावना उत्पन्न व्हाव्या त्यांचें वर्णन मिल्टन कवीनें केलें आहे:—

"हे सर्व कल्याणाच्या पित्या, हीं सर्व तुझीं वैभवयुक्त कर्मै आहेत. हे सर्व समर्था, हीं सर्व तुझी विश्वसंख्या आश्चर्यकारक व सुंदर आहे, तर तूं किती आश्चर्यकारक असशील? जो तूं स्वर्गाच्या वर बसतोस, तो तूं अवर्णनीय आहेस. आह्मास तूं अदृश्य किंवा अस्पष्ट दिसतोस. ह्या तुझ्या भूलोकाच्या कर्मांमध्यें तुझें चांगुलपण व ईश्वरी शक्ति हीं प्रगट करितोस."

हा थोर परमेश्वर आमच्या भजनास पात्र आहे. त्यानें आह्मास प्रथम उत्पन्न केलें, आमचा प्रत्येक श्वासोश्वास त्याजवर अवलंबून आहे, आह्मी त्याच्या पृथ्वींत राहतों. जें कांहीं

आमच्यापाशीं आहे तें त्याची देणगी आहे. तो आमचा स्वर्गांतील बाप व राजा आहे, त्यावर आह्मीं परम प्रीति करावी. व त्याचा अत्यंत सन्मान करावा. त्याचें भजन करावें, हें आमचें कर्त्तव्य आहे. व तेणेंकरून आमच्या वर्तनावर उत्तम प्रकारचें वजन पडतें.

### १६. बरें व वाईट ह्यांचा जो अनादि भेद आहे तो ओळखिला जाईल.

हिंदु धर्माप्रमाणें देवास जें आवडतें तें करितां येतें, असें आह्मीं मागें दाखविलें आहे. वेदांतमतांतील जीवनमुक्त, पाप पुण्य समदृष्टीनें पाहतो. ख्रिस्ती धर्म असें शिकवितो कीं, पवित्रता आणि पाप हीं प्रकाश व अंधार ह्यांच्या सारखीं परस्पर विरुद्ध आहेत. मनुष्यानें केलें असतां ज्यांत पाप आहे तें कर्म देवानें केलें असतां त्यांत विशेष पाप आहे. ख्रिस्ती धर्मांत सांगितलेला देव निष्कलंक व पवित्र आहे. मनुष्यांस स्वतंत्र इच्छा आहे असें ख्रिस्ती धर्मांत सांगितलें आहे. त्यांस त्यांच्या कर्मांत आहे किंवा नशीबांत लिहिलें आहे ह्मणून पाप केलेंच पाहिजे असें नाहीं. ते पाप करितात तर ते स्वतांच दोषी होतात.

### १७. पापाची खरी क्षमा मिळेल.

**मनुष्यांचा पापिष्टपणा.**–मनुष्य पापी आहे व शिक्षेस पात्र आहे असा समज सर्वत्र आहे. "माझें तारण होण्या

करितां मला काय केलें पाहिजे? हा सर्वांहून मोठा प्रश्न आहे. पापाची क्षमा होते किंवा नाहीं याविषयीं हिंदुधर्मांत परस्पर विरुद्ध मतें आहेत असें आह्मीं मागें दर्शविलें आहे. सर्व बऱ्यावाईट कर्मांचें फळ भोगलेंच पाहिजे असें एक मत आहे. दुसरें असें आहे कीं, अगदी क्षुल्लक मतानें पापपरिहार होतो. दानधर्म, यात्रा, पवित्र मानलेल्या जलांत अंघोळ करणें अशा प्रकारचे दुसरे उपाय सांगितले आहेत. ब्रह्मपादोदक प्राशन करणें (ब्राह्मणाच्या पायांचें पाणी पिणें) किंवा हरिनामाचा जय करणें ह्यांकडून महापातकांची क्षमा होते. "पापोहं पापो कर्माहं" (मी पाप आहें, व मी पाप करितों.) हें हिंदु लोकांचें पापांगिकाराचें वचन मागें आह्मीं उतरून घेतलेंच आहे. अशा प्रकारचीं वचनें बायबलांतही आहेत. दाविद ह्मणतो, "पाहा, अन्यायांत मीं उत्पन्न झालों, व पापांत माझ्या आईनें माझें गर्भधारण केलें." अणखी असें ह्मटलें आहे कीं, "सर्व विषयांपेक्षां अंतःकरण कपटी आहे, व पराकाष्ठेचें दुष्ट आहे. तें कोण जाणेल?" अंतःकरणाचा पालट होईपर्यंत तें कडू निंबाच्या झाडासारिखें आहे. त्याचीं पानें कडू व त्याचें फळही कडू. सर्वांपेक्षां जे पवित्र लोक होऊन गेले त्यांनीं देखील आपलें पापिष्टपण कबूल केलें आहे. बहुत लोक आपली तुलना आपल्या शेजाऱ्यांशीं करितात, आणि त्यांसारखें आपण असलों तर बस आहे असें ह्मणून आपल्या मनाचें समा-

धान करून घेतात. दुसरीं मनुष्यें जे अट्टल सोदे, लुचे आहेत त्यांच्याशीं आपली तुलना करितात. आणि त्यांपेक्षां आपण चांगले आहों असें समजून मोठा ताठा बाळगितात. परंतु जे खरोखर चांगले आहेत ते देवाचे शास्त्रांत जो वर्त्तनाचा नेम सांगितला आहे, त्याशीं आपणांला ताडून पाहतात, व त्या नेमाच्या परिमाणाला आपण किती उणें आहों हें जाणून असें ह्मणतात कीं, "आह्मी सर्व विटाळलेल्या पदार्थाप्रमाणें आहों, व आमचीं सर्व पुण्यकर्में विटाळाच्या फडक्याप्रमाणें आहेत." सर्व मनुष्यें दोन गोष्टींविषयीं अपराधी आहेत ह्मणजे तीं अधर्मी व स्वार्थी आहेत. बाबेलोन देशचा राजा बेलसेजार याविषयीं देवानें जो दंड निर्णय केला तो हाच होता कीं, "तूं तागडींत तोललेला आहेस, व उणा आला आहेस." ह्या ठरावाचें कारण दानिएल भविष्यवाद्यानें राजाला उलगडा करून सांगितलें तें असें कीं, "ज्या देवाच्या हातांत तुझा श्वास आहे, व ज्याच्या स्वाधीन तुझे मार्ग आहेत त्याला तूं मान दिला नाहींस." जेव्हां मनुष्याचा विवेक जागृत होतो, तेव्हां त्याला आपलें गत आयुष्य केवळ दुराचरणांत गेलें असें त्याला समजूं लागतें. देव मनुष्याच्या कृतघ्नपणाची पशूच्या कृतघ्नतेशीं तुलना करून मनुष्याला दोष लावितो. तो ह्मणतो कीं, "म्यां लेंकरें पोसलीं व वाढविलीं आणि त्यांनीं मजवर फितूर केला आहे. बैल आपल्या धन्याला व गाढव

आपल्या कोंडीला ओळखतो, परंतु इस्राएल जाणत नाहींत, माझे लोक विचार करीत नाहींत."

**अवताराची आवश्यकता.**—जगामध्यें जीं दुःखें व कष्ट आहेत त्यांचा भार उतरण्याकरितां ईश्वर मनुष्यावतार घेऊन येईल अशी आशा सर्व राष्ट्रें फार प्राचीन काळापासून कमी जास्ती बाळगीत आलीं. हिंदुधर्मांत पुष्कळ अवतार सांगितले आहेत. कलंकी अवतार अजून होणार. कलियुगाच्या शेवटीं विष्णु पांढऱ्या घोड्यावर बसून हातांत धूमकेतूसारखें चमकणारें खड्ग (नागवी तरवार) धारण करून येईल. आणि दुष्टांचा नाश करून शुद्ध धर्माची स्थापना करील.

ख्रिस्ती धर्मही असें सांगतो कीं, मनुष्य पापामध्यें इतका बुडाला आहे, आणि त्याचा अपराध इतका मोठा आहे कीं, त्याच्या उद्धाराकरितां ईश्वरी अवताराचें अगत्य होतें. हा अवतार होईल असें प्रथम वचन सहस्रावधी वर्षांपूर्वी ईश्वरानें मनुष्यास दिलें होतें. देवाच्या पुत्रास मानव जातीची दया येऊन तो आमच्या तारणाकरितां स्वर्गांतून खालीं आला. खांबावर त्यानें मरण सोसून आमच्या पापांचें शासन त्यानें भोगिलें. त्यानें ईश्वराच्या आज्ञा पालन करून परिपूर्ण न्यायत्व (पुण्य) सिद्ध केलें. तें त्याच्या शिष्यांस निष्कलंक झग्याप्रमाणें दिलें जातें.

कित्येक हिंदु लोकांमध्यें ख्रीस्ताच्या अवताराविषयीं फार गैरसमज आहे. त्यांस वाटतें कीं, देव रागावला आहे व त्यास त्याच्या पुत्रानें प्रसन्न केलें आहे. परंतु अशी गोष्ट नाहीं, तर बापाच्या प्रीतीपासून प्रायश्चित्ताची उत्पत्ति आहे. "देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं, त्यानें आपला पुत्र आमचा तारणारा होण्याकरितां दिला." आणि पुत्रही तारणारा होण्याकरितां त्याप्रमाणेंच मान्य होता. त्यानें बापास असें उत्तर दिलें कीं, "हे माझ्या देवा, तुझा मनोदय साधायाला मी इच्छितों."

कित्येकांस असें वाटतें कीं प्रायश्चित्तावांचून देव पापाची क्षमा करूं शकतो. परंतु देव जसा आमचा बाप आहे तसा राजाही आहे. आणि न्यायाचें समाधान केल्यावांचून पापाची क्षमा केल्यानें सर्व सृष्टींत बंडाळी होण्याचा संभव आहे.

याच्या स्पष्टिकरणास पुढील दाखला देतातः—कोणी एक उत्तम राजा होता. त्याच्या सैन्याच्या कांहीं भागांतील लोकांनीं त्याजविरुद्ध कट केला. त्यांस राजानें धरून त्यांचीं शस्त्रें काढून घेतलीं, व त्यांची चौकशी करून त्यांस मरणाची शिक्षा ठरविली. राजाच्या मनांत त्यांचा जीव वांचवावा असें होतें. परंतु त्यांस फुकट क्षमा केली असती तर दुसऱ्यांस बंड करण्याचा मोह झाला असता. त्या सैन्याचा अधिपति राजाचा एकुलता पुत्र होता. त्याच्याही मनांत त्या दोषी ठरलेल्या मनुष्यांस मुक्त करण्याचें होतें.

त्यांच्या ऐवजीं राजपुत्रानें दंड भोगावा असें ठरलें. आणि असें झाल्यावर ज्यांनीं राजपुत्राच्या नांवानें क्षमा मागितली त्यांस ती मिळाली.

आणि दृष्टांतांतील राजपुत्र जसा बंडावलेल्या शिपायांचें रक्षण व्हावें ह्मणून आपण दुःख सोसण्यास राजी झाला, त्याचप्रमाणें देवाचा अनादि पुत्र आमच्या बदली दुःख सोसण्याकरितां प्रभु येशू ख्रीस्त असा मनुष्य होण्यास मान्य झाला. त्यानें ३३ वर्षें जगांत राहून देवाच्या आज्ञा पूर्णपणीं पाळल्या, आणि शेवटीं वधस्तंभावर मरण पावला. तिसऱ्या दिवशीं तो मेलेल्यांमधून उठला, आणि नंतर स्वर्गांत चढून गेला, तेथें तो सन्मानाच्या परम उंचस्थानीं बसला आहे. आतां जे कोणी त्याला आपला तारणारा असें पत्करून त्याच्या नांवानें देवापाशीं क्षमा मागतात, त्यांस ती प्राप्त होते. हा विषय कोणत्याही दृष्टांताकडून पूर्णत्वें स्पष्ट करून दाखवितां येत नाहीं, तथापि ख्रिस्ती धर्माच्या योगानें देवाचा न्याय व दया ह्यांचा मिलाफ कसा होतो ह्याविषयीं वरील दृष्टांतावरून कांहीं अंशीं बोध होतो.

## १८. पवित्राचरणाची वृद्धि होईल.

हिंदु लोकांच्या देवळांत मनुष्याच्या कर्त्तव्यांविषयीं कांहींच बोध होत नाहीं, हें आह्मीं मागें दर्शविलें आहे. तेथें जे मंत्र ह्मणतात त्यांचा अर्थ देवांची पूजा करणारांस

समजत नाहीं. कित्येक देवळांत भिंतीवरील चित्रें व दगडांत खोदून काढलेले पुतळे वगैरे यांच्यापासून व तेथें नाच करणाऱ्या स्त्रियांपासून नीतिभ्रष्टता मात्र उत्पन्न होते. खिस्ती भजनालयांत एकच जो खरा देव त्याची भक्ति गंभीर व योग्य रीतीनें करितात. आणि सदाचरणानें वागण्याविषयीं लोकांस उपदेश होतो. त्यांनीं लबाडी बोलूं नये, चोरी करूं नये, कोणाशीं अन्यायानें वागूं नये, सहनता धरावी, परस्परांशीं व सर्वांशीं शांतीनें वागावें, आणि आपल्या सद्वर्त्तनानें आपला विश्वास व धार्मिकता हीं प्रगट करावीं, अशा प्रकारचा आग्रहपूर्वक त्यांस बोध होत असतो. दुःखितांचें सांत्वन होतें; अशक्तांस बळ मिळतें; जे बहकले आहेत त्यांस सन्मार्गावर येण्यास सूचना होती; आणि अज्ञान्यांस शिक्षण मिळतें. खिस्ती धर्मोपदेशक तोंडच्या तोंडांत मंत्र ह्मणणारे नव्हेत, अथवा पोकळ व अर्थहीन क्रियाकर्में करणारे नव्हेत. मनुष्यांनीं पवित्राचरण करावें हें शिकविण्याचें त्यांचें काम आहे.

खिस्ती भजनालयांत अंतःकरणांत अशुद्ध भावना उत्पन्न होण्याजोगें कांहीं नसतें. जें कांहीं तेथें होतें त्यापासून ह्याच्या उलट परिणाम होतो.

हिंदु पुराणांत सुनीतिवर्धक बोध केला नाहीं. त्यांत देवांनीं केलेले अपराध ते अपराध नाहींत असें सांगितलें आहे. आणि जीं मनुष्यें देवांस भक्तिभावें पूजितात, त्यांचेही

अपराधांस त्यांचे देव अपराध समजत नाहींत. अशा प्रकारचीं पुस्तकें लोक जितकीं अधिक वाचतात तितके अधिक ते बेकैद व कपटी होतात.

बैबलांत स्पष्ट रीतीनें असें सांगितलें आहे कीं, दुराचरणी लोकांच्या भक्तीस ईश्वर धर्मशीलता असें मानीत नाहीं; आणखी त्याचें सांगणें असें आहे कीं, अंतःकरण पवित्र असल्यावांचून देवाला कोणी पाहणार नाहीं; आणि स्वर्गसुखाची प्राप्ति सज्जनांस मात्र होईल, आणि जे दुर्जन आहेत ते कोणत्याही धर्माचे असले तरी ते नरकांत पडतील.

"जसा देव तसा भक्त" ही ह्मण आह्मीं मागें सांगिली आहे. कृष्णाचें गोपीशीं क्रीडा करणें अथवा शिवाचें भांगप्राशन आणि ऋषिपत्न्यांशीं दुर्वर्त्तन यांचें चिंतन केल्यानें मनावर केवळ अपकारक गुण होतो. परंतु पवित्र देवाची भक्ति करण्यानें हितकारक परिणाम होतो. प्रभु येशू ख्रीस्त जो खरा अवतार त्यामध्यें सर्व ईश्वरी गुण प्रकाशमान होतो. तो पवित्र, निर्दोष, निष्कलंक, आणि पाप्यांपासून वेगळा असा होता. तो सर्वत्र बरें करीत फिरला. पुष्कळ ख्रिस्ती लोक ख्रीस्ताचा कित्ता वळवीत नाहींत ही गोष्ट खरी आहे, परंतु अशांस ख्रिस्ती ह्मणविणें योग्य नाहीं. जे ख्रीस्ताप्रमाणें होण्यास इच्छितात व यत्न करितात तेच मात्र खरे ख्रिस्ती आहेत.

आपल्यास शुद्ध करण्याकरितां हिंदु लोकांच्यानें देवाची प्रार्थना करवत नाहीं. कारण ते देव स्वतः पापलिप्त आहेत. ख्रिस्ती लोक जेव्हां पापांत पडतात तेव्हां त्यांस उठवावें, अथवा त्यांस पाप करण्याचा मोह प्राप्त होतो तेव्हां त्यांस शक्ति मिळावी, त्यांस सर्व प्रकारच्या दुर्गुणांपासून सोडवावें, आणि आपल्या स्वर्गीय पित्यासारखें त्यांनीं व्हावें म्हणून त्यांस देवाचा पवित्र आत्मा मागण्यास शिकवितात. ह्या सर्व उपायांनीं ख्रिस्ती धर्माकडून पवित्रतेची वृद्धि होती.

## १९. जन्मांतील वृथा भयांपासून मुक्त होणें.

हिंदु लोकांस ग्रहपिडेचें सर्वदां भय असतें. सर्वदां त्यांस अपशकुन होण्याचेंही भय असतें. दृष्टि लागण्याचें त्यांस भय असतें. त्यांस रोग व दुसरीं अरिष्टें लावण्याकरितां असंख्य भूतपिशाच्यें टपत बसलेलीं असतात, अशी त्यांची कल्पना आहे. हीं अरिष्टें दूर होण्याकरितां अथवा निवारण्याकरितां जोशाला विचारपूस करितात, अंगावर ताईत, दोरे, गंडे वगैरे बांधितात आणि मंत्रांचा जप करितात, आणि देवांस बकरें, कोंबडें वगैरे वाहतात.

ख्रिस्ती धर्म मनुष्यांस अशाप्रकारच्या सर्व वृथा भयांपासून मुक्त करितो. फलज्योतिष हें ईश्वराविरुद्ध पाप आहे. तें निर्जीव ग्रहांस त्यांच्या निर्माणकर्त्याच्या जागीं बसवितें.

एकच जो खरा देव तो वरील सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, नक्षत्रें या सर्वांचा व खालीं पृथ्वीचा प्रभु आहे. सर्व कांहीं त्याच्या स्वाधीन आहे. ग्रह हे सर्व त्याचे सेवक आहेत. मनुष्याच्या संसारांतील कामांवर त्यांचें कांहीं वजन नाहीं. ईश्वर कधीं बदलत नाहीं, व त्याच्या राज्याचा कधीं अंत होत नाहीं. कोणतीही एक वेळ दुसऱ्या वेळेपेक्षां शुभ किंवा अशुभ नाहीं. जें करणें योग्य आहे तें करायास सर्व वेळ चांगली आहे; परंतु जें अयोग्य आहे तें करण्यास सर्वदां मनाई आहे. ख्रिस्ती लोकांस ज्योश्यांस विचारपूस करण्याची गरज नाहीं.

शकुन अपशकुन हा पोरकट भोळेपणा आहे. कोणत्याही एका कामांत यश किंवा अपयश येणें याचा त्या कामास जातांना वाटेंत घोडा किंवा मांजर, ब्राह्मण किंवा शूद्र यांशीं गांठ पडण्याशीं मुळींच संबंध नाहीं. पाल हा जीव, होणार गोष्टी सांगणारा भविष्यवादी नव्हे. दक्षिण हिंदुस्थानांत अशी ह्मण आहे कीं, "गांवची शकुन देवता पाल होती. ती कढणाच्या भांड्यांत पडली." वादी, प्रतिवादी एकत्र मिळून एकाच शकुनावर व एकाच मुहूर्त्तावर कोर्टांत गेले तरी त्यांतून एक जण तंटा जिंकेल व दुसरा हरेल. ख्रिस्ती मनुष्य ग्रह व शकुनमुहूर्त्त न पाहतां देवानें त्याच्या कामाची वाट दाखवावी ह्मणून त्याची प्रार्थना करून त्यानें दिलेल्या बुद्धिप्रमाणें वर्त्ततो. ख्रिस्ती मनुष्यांस दृष्ट लागण्याचें

भय वाटत नाहीं. तिच्यामध्यें कांहीं शक्ति नाहीं व तिच्यानें त्याचें कांहीं वाईट करवत नाहीं हें त्याला माहीत असतें.

ज्या भूतांची हिंदु लोकांस रात्रंदिवस धास्ती असते त्यांचेंही त्यांस भय वाटत नाहीं. देवी, मरी आई, ओला-बीबी, मेसाई, जोखाई इ० हे कोणी नाहींत हें त्यांस ठाऊक आहे. कित्येक अज्ञान आईबापें आपल्या मुलांस ज्या बागु-लबावाचें भय दाखवितात, त्यासारिख्या त्या आहेत. देवी-च्या रोगापासून रक्षण करण्याचा उपाय त्या काढण्यांत आहे. स्वच्छ पाणी, पौष्टिक अन्न, शरीराची स्वच्छता हीं रोगांपासून रक्षण करण्यास साह्यभूत होतात.

खरा ख्रिस्ती, देव आपला स्वर्गांतील प्रीति करणारा बाप आहे असें समजून त्याचें सहाय्य मागतो. पितृवात्स-ल्यानें देव त्याची काळजी वाहतो. तो कोठेंही असला तरी रात्रंदिवस त्याची कृपादृष्टि त्याजवर असते. तो बापाप्रमाणें त्याच्या विनंतीकडे कान देतो. पृथ्वीवरील आईबापांच्यानें आपल्या लेंकराच्या सर्व गरजा पुरवत नाहीं. परंतु देवास सर्व सामर्थ्य आहे. तो बापाप्रमाणें त्यास वाट दाखवून त्याचें रक्षण करितो. जगांतील आईबापांकडून चुका होतील; त्यांस आपल्या लेंकरांस संकटापासून सोडविण्यास शक्ति नसेल; परंतु देवाविषयीं असें नाहीं. ख्रिस्ती मनुष्याला शेवटचें जाण्याचें ठिकाण त्याच्या बापाचें घर आहे.

ख्रिस्ती मनुष्य आपल्या आंगावर ताईत, नाडे, दोरे वगैरे कांहीं बाळगीत नाहीं. त्याचा मंत्र प्रार्थना आहे. ईश्वराच्या इच्छेवांचून त्याला कांहीं होत नाहीं. जें होतें तें परिणामीं त्याच्या कल्याणार्थ देवानें योजिलें आहे, असें त्याला ठाऊक आहे. जसें सोनें अग्नींत घालून शुद्ध करितात, त्याप्रमाणें त्यास शुद्ध करायास देव त्याला एकादे वेळेस दुःखरूप भट्टींत टाकतो; परंतु हें दुःख लवकरच समाप्त होईल असें जाणून तो सार्वकालिक (अक्षय) नित्यानंदाची वाट पाहतो. अहा! ईश्वर आपला बाप असणें ह्यांत केवढें सुख आहे. जगांतील सर्वांपेक्षां थोर अशा राजाच्यानेंही आमच्याकरितां जें कांहीं करवणार नाहीं तें देवाच्यानें करवतें. त्याच्या संपत्तीचा कधीं ऱ्हास होत नाहीं; त्याचें सामर्थ्य कधीं सरत नाहीं; आणि त्याच्या प्रीतीचा कधीं क्षय होत नाहीं.

## २०. ख्रिस्ती धर्म हा आशेचा धर्म आहे.

**जन्मांतील आशा.**–हिंदु धर्म हा निराशेचा धर्म आहे असें आह्मीं मागें दाखविलें आहे. सांप्रतचा काळ कलियुगाचा आहे असें कल्पिलें आहे. ह्या युगांत सर्व गोष्टी अधिकाधिक वाईट होत जातील. ख्रिस्ती धर्म ही गोष्ट क़बूल करीत नाहीं. जगाची स्थिति वाईट होण्यापेक्षां बरी होणार आहे. सांप्रत जीं मनुष्यें जीवंत आहेत त्यांच्याच हयातींत किती सुधारणा झाली आहे! कित्येक शहरास

चांगल्या पाण्याचा पुरवठा झाला आहे; रोग्यांकरितां धर्मार्थ दवाखाने झाले आहेत. क्विनन नांवाचें औषध जें तापावर रामबाण आहे तें लोकांस मिळूं लागलें आहे; रस्ते बांधले आहेत व आगगाड्या चालूं झाल्या आहेत. आणि गांवोगांव शाळा स्थापन झाल्या आहेत. पुढें धार्मिकतेचें राज्य चालूं होईल असें भविष्य आहे.

**मरणकालची आशा.**—मरण हें अपरिहार्य असून तें कोणाला चुकत नाहीं, हें आह्मीं मागें सांगितलेंच आहे. जगांतील अतिशय धनवान राजाच्यानें देखील द्रव्य देऊन त्यापासून आपली सुटका करून घेववत नाहीं; मोठमोठाल्या उंच भिंती व मोठे बळकट पहारे ह्यांच्यानें त्याच्या येण्यास अटकाव करवत नाहीं.

पुष्कळ हिंदु लोक जनावराप्रमाणें निश्चित मरतात. दुसरे कित्येक व्यर्थ आशेंत फसतात. त्यांस वाटतें कीं, आपण नदींत किंवा तळ्यांत स्नान करून आपलीं पापें धुतलीं आहेत, आणि ब्राह्मणांस दानधर्म केल्याकडून पुण्यसंचय केला आहे. ह्यांत कांहीं खरेपण नाहीं. हें आह्मीं मागेंच दर्शविलें आहे. विचारवंत हिंदूस "मा मोठा बावरा होऊन मरतों" असें ह्मणावें लागतें. जरी त्याच्या सांप्रतच्या जन्मांत त्यानें कांहीं दुराचरण केलें नसलें तरी त्याच्या अगणित पूर्वजन्मांत अशीं पापें घडलेलीं असतील कीं, त्याबद्दल त्यास एखाद्या भयंकर नरकांत शिक्षा भोगावीच लागेल.

ख्रिस्ती धर्म जन्मांतराचें मत कबूल करीत नाहीं. आह्मास पूर्वजन्म नव्हतें, यास्तव त्यांत कांहीं पापें घडलीं नाहींत, व त्यांबद्दल आह्मांस कांहीं शिक्षा भोगावी लागणार नाहीं. अशा गोष्टींचें ख्रिस्ती मनुष्यास भय नाहीं.

ख्रिस्ती मनुष्यानें ह्या जन्मांत पुष्कळ पापें केलीं आहेत, हें खरें आहे. तीं असंख्य असून अति दुष्ट आहेत हें ते कबूल करितात. परंतु त्यानें त्याला येशू ख्रीस्ताच्याद्वारें देवानें जी क्षमा करण्याचें कबूल केलें आहे ती स्वीकारिली आहे. त्याचीं पापें जरी पर्वतासारखीं आहेत, तरी तीं ईश्वरी कृपारूप समुद्राच्या तळीं टाकलीं आहेत. तो आपलीं अत्युत्तम कर्में पापलिप्त आहेत असें समजतो; परंतु तो ख्रीस्ताचा पुण्यरूप निष्कलंक झगा परिधान करून स्वर्गांत प्रवेश करितो. मृत्यु हा त्याच्या स्वर्गस्थ पित्याचा जासूद आहे, तो त्याला त्याच्या मंदिरीं अवर्णनीय आनंदांत राहण्याकरितां बोलवायास येतो.

स्वर्गसुखाचें वर्णन केवळ पृथ्वीवरील मनुष्याच्या भाषेनें करितां येतें. धार्मिकांविषयीं असें ह्मटलें आहे कीं:—"त्यांस अणखी भूक लागणार नाहीं, अणखी तहानही लागणार नाहीं, आणि देव त्यांच्या डोळ्यांपासून सर्व अश्रू पुसून टाकील." स्वर्गाला ज्याचे रस्ते नितळ कांचेसारिखे व शुद्ध सोन्याचे आहेत अशा एका नगराची उपमा दिली आहे. त्यांत ज्यांचा प्रवेश होतो, त्यांच्या मस्तकावर मुगुट,

हातांत खजुरीच्या झावळ्या असतात, व ते सुवर्णाचे ि घेऊन ज्यानें त्यांस तारिलें त्याची स्तुति गातात असें वर्णन केलें आहे. स्वर्गीय सुखाचें मुख्य लक्षण ह्मटलें तर तें चिरकालिक आहे. हिंदुधर्माप्रमाणें स्वर्गांतून नरकास जाण्यास वाट नाहीं. जे तेथें जातील ते " प्रभुपाशीं चिरकाल राहतील." ख्रिस्ती मनुष्य स्वपुण्यानें स्वर्गास जात नाहीं, तर तें देवाचें दान असें मिळवून जातो, त्यामुळें स्वपुण्याचा क्षय होऊन त्याला ह्या पापाच्या व दुःखाच्या जगांत पुन्हां येऊन पतन होण्याचें भय नसतें.

हिंदु मनुष्य या जगांत ज्यांवर प्रीति करितो त्यांची त्यास परलोकीं भेट होण्याची आशा नाहीं असें आह्मीं मागें सांगितलें आहे. आईला पुन्हां लेंकराची भेट होणार नाहीं; व लेंकराला आईची होणार नाहीं. परंतु ख्रिस्ती लोक आपल्या मेलेल्यांचा अशा प्रकारें शोक करीत नाहींत. ज्यांनीं मनोभावें ख्रीस्तावर विश्वास ठेविला त्यांच्याबरोबर अनंतकाल सुखांत राहण्याची त्यांस खचित आशा असते.

## २१. खरे ख्रिस्ती जगताच्या प्रभूचे दत्तपुत्र आहेत.

खरा जो एकच देव त्यानें जी पृथ्वी उत्पन्न केली व जिला त्याच्या सामर्थ्याचा आधार आहे, तिचा तो खरा मालक आहे असें आह्मीं मागें दाखविलें आहे. त्यासच मात्र भजावें हें आमचें कर्त्तव्य आहे. दुसऱ्यास नमन

करणें हें त्याच्या अधिकाराविरुद्ध बंड करणें असें आहे. आमचा जो खरा मालक त्याच्या जागीं हिंदुधर्म आह्मांस दोषलिप्त देव व निर्बुद्ध पशु व निर्जीव काष्टपाषाण ह्यांचें भजन करण्यास सांगतो. असें जे करितात ते ईश्वराविरुद्ध बंड करण्याचे दोषी होतात. त्यांस त्यांच्या पापाविषयीं पश्चात्ताप करण्यास देवानें वेळ दिली आहे, परंतु ते बंड-खोर असून ईश्वरी प्रसाद पावण्यास योग्य नाहींत. परंतु परलोकीं अनंतकालिक दुःखास मात्र पात्र आहेत. सर्व मनुष्यप्राणी एका अर्थानें देवाचीं लेंकरें आहेत. उत्पत्तीच्या संबंधानें तो त्यांचा पिता आहे. तथापि मनुष्यें जीं दुष्ट मुलें आपल्या प्रियकर, चांगल्या व ज्ञानी बापाला सोडून दुष्ट लोकांशीं संगत करितात त्यांसारिखीं आहेत. ते देवाला बाप मानून त्यावर प्रीति करीत नाहींत, ते त्याच्या आज्ञा मानीत नाहींत. ते त्याचीं लेंकरें आहेत असें आणखी मानलें जाणार नाहीं. परंतु देव दयाळू आहे, व जे कोणी आपल्या पापाविषयीं पश्चात्ताप करितात व त्याला शरण जाऊन क्षमा मागतात त्यांस तो आपल्या कुटुंबांत परत घेण्यास इच्छितो. त्यानें परम प्रीतीनें आह्मांस मार्ग दाख-विण्यास व आमचा तारणारा होण्यास प्रभु येशू ख्रीस्ताला जगांत पाठविलें. त्यानें आह्मांस पश्चात्ताप करण्यास शिक-विलें, व क्षमा मिळेल व देव आमचा स्वीकार करील अशी आमची खातरी केली. ही क्षमा जशी चाकरास करितात

तशी नव्हे, तर जीं मुलें पाप व बंडाई करून आपल्या बापाच्या घरांतील आपली जागा गमावल्यावर त्यांस जशी क्षमा करितात त्याप्रमाणें ही आहे. ह्याप्रमाणें आह्मी स्वर्गांतील संपत्ति व वैभव ह्यांचे वारीस होतों. ख्रिस्ती लोकांस देवाला आपला " स्वर्गीय पिता " ह्मणायास शिकवितात. त्यांच्या ममताळू व प्रिय बापास त्यांच्या सर्व गरजा माहीत आहेत. व त्यांस सर्व कल्याणकारक वस्तु देण्यास तो खुषी आहे. येथें शाळेंतील मुलांप्रमाणें आहे. ह्याबद्दतींत ते ज्या शाळेंत जाणाऱ्या मुलांस धडे शिकावेसें वाटत नाहीं त्यांसारखे आहेत. देव त्यांस दुःख पाठवून देऊन त्यांची परिक्षा करितो. परंतु तें दुःख परिणामीं त्यांच्या कल्याणार्थ योजिलें आहे, असें त्यांस ठाऊक आहे. तीं दुःखें त्यांस पापापासून शुद्ध करण्याकरितां व त्यांच्या आकाशांतील बापाबरोबर सर्वकाल राहण्यास योग्य करण्याकरितां असतात.

कोणी एक चांगला मनुष्य मरणोन्मुख झाला असतां तो आपल्याशीं असें ह्मणाला कीं, " मी ख्रिस्ती आहें—तर मग काय? कां मी उद्धरलेला पापी आहें, क्षमा पावलेला बंडखोर, हीं सर्व कृपेकडून आणि अनंत ज्ञानांनीं योजलेल्या चमत्कारिक उपायांकडून. मी ख्रिस्ती आहें—तर मग काय? मी देवाचें लेंकरूं आहे, व मजमध्यें पितृभक्ति ( प्रीति ), सन्मान, आनंद व कृतज्ञता हीं पूर्ण असलीं पाहिजेत. मी ख्रिस्ती आहें—तर मग काय? कां मी ख्रीस्ताचा शिष्य आहें

तर जो अंतःकरणानें लीन होता व ज्यानें स्वतांस संतोषविलें नाहीं त्याचें मीं अनुकरण केलें पाहिजे. मी ख्रिस्ती आहें तर मग काय? तर मी स्वर्गाचा वारीस आहें. मोशे व कोंकरा ह्यांचें गायन गौरवांतील गायक मंडळीसंगतीं गाण्याकरितां धन्यता पावलेले जे लोक त्यांच्या राहण्याच्या जागीं त्वरेनें जात आहे." ख्रिस्ती लोकांचें हिंदूंस असें अमंत्रण आहे कीं, "आह्मासंगतीं या ह्मणजे आह्मी तुमचें कल्याण करूं. आतांपासून तुह्मी, हे बापा, तूं माझ्या तरुणपणाचा वाटाड्या आहेस असें ह्मणणार नाहीं कीं काय?"

## २२. ख्रिस्ती धर्म अझून सर्व जगांत पसरेल.

जर कोणता धर्म सत्य व ईश्वरदत्त आहे तर तो सार्वत्रिक होण्यास योग्य होईल. ईश्वर एक आहे आणि त्याची इच्छाही एकच आहे. सर्व मनुष्यस्वभाव सारखाच आहे. सर्व पापी आहेत व सर्वांस क्षमेची गरज आहे. सर्वांस सदाचरणानें चालण्यास ईश्वरी सहाय्याचें अगत्य आहे. सर्वांस इहलोकीं ज्ञान व परलोकीं सुख पाहिजे. ज्याअर्थीं ह्या कल्याणकारक गोष्टी सर्वांस अवश्यक आहेत, त्याअर्थीं जो धर्म त्यांस त्या प्राप्त करून देतो तो सार्वत्रिक असला पाहिजे.

मानवी धर्मांपैकीं प्रत्येक धर्म एकएका लोकाच्या कल्पनेनें मात्र जुळलेला आहे, आणि तो सर्व साधारण असण्याच्या

ऐवजीं एकएका लोकास मात्र थोरपणा देतो, आणि इतर सर्व जगाला तुच्छ मानतो.

हिंदुधर्म केवळ हिंदु लोकांकरितांच आहे. हिंदु लोकांनीं जन्मापासून चार जातींपैकीं एका जातीचें असलें पाहिजे. तो धर्म आपला प्रसार होण्यास यत्न करीत नाहीं. परदेशचे लोक मलीन म्लेंच्छ आहेत.

परंतु ख्रिस्ती धर्म सर्व लोकांकरितां सारखा योजिलेला आहे. त्याचे आचार जगांतील सर्व लोकांस पाठ येतील असे आहेत. त्यास राष्ट्रांचा भेद नाहीं.

ख्रिस्ती धर्माचा स्थापक जो प्रभु ख्रीस्त यानें हें जग सोडून जातेसमयीं आपल्या शिष्यांस अशी आज्ञा दिली कीं, "अवध्या जगांत जाऊन सर्व सृष्टीला शुभवर्त्तमान गाजवा, आणि पाहा, मी तुह्मांबरोबर सर्वकाल आहें." ही आज्ञा प्रमाण मानून ख्रिस्ती उपदेशक सर्व ठिकाणीं जातात, आणि सर्व देशांतील लोकांस शिष्य करितात. आणि हें कार्य सिद्धीस जाण्यासाठीं युरोप आणि अमेरिका यांत पुष्कळ द्रव्य जमा करितात.

मूर्त्तिपूजा नष्ट होण्याविषयीं बायबलांत जीं भविष्यें आहेत त्यांविषयीं मागें आह्मीं सांगितलेंच आहे. आणखी दुसरें त्यांत असें सांगितलें आहे कीं, ख्रिस्ती धर्माचा प्रसार सर्वत्र होईल, आणि त्याचा कधीं लय होणार नाहीं. "जीं राष्ट्रें त्वां उत्पन्न केलीं तीं सर्व तुजपुढें येऊन

भजतील. आणि हे प्रभू, तुझ्या नांवाचें स्तवन करितील." "सूर्याच्या उदयापासून त्याच्या अस्तापर्यंत प्रभूचें नांव स्तविलें जाईल." "ह्या जगाचीं राज्यें आमच्या प्रभूचीं व त्याच्या ख्रीस्ताचीं होतील. आणि तो सदासर्वकाळ राज्य करील."

ख्रिस्ती धर्मानें अठराशें वर्षांमागें जसा युरोपाचा धर्म होण्यास यत्न केला तसा तो आतां हिंदुस्थानाचा धर्म होण्यास यत्न करीत आहे. तेव्हांची स्थिति व आतांची स्थिति पुष्कळ अंशीं सारखी आहे. आणि परिणामही सारखाच होईल.

हिंदु व युरोपियन, पूर्वेकडील आर्य लोक व पश्चिमेकडील आर्य लोक हे पूर्वीं एकदां एकत्र राहत असत, एकच भाषा बोलत असत, आणि त्यांच्या भक्तीचीं दैवतेंही एकच होतीं. पश्चिमेकडील आर्य हे युरोपास गेल्यानंतर पुष्कळ गोष्टींविषयीं त्यांचें एकमत होतें. हिंदु लोकांप्रमाणें त्यांच्यामध्यें तत्वज्ञानाच्या शाखा होत्या. त्यांच्या देवांचें वर्तन हिंदूंच्या देवांच्या सारखें होतें. आणि त्यांची पूजा अर्चा त्यांच्या पूजेसारखीच करीत. जसे आतां युरोपियन मिशनरी हिंदुस्थानांत येऊन ख्रिस्ती धर्माचा उपदेश करितात, तसे एशियांतून ख्रिस्ती मिशनेरीनें युरोपांत जाऊन उपदेश केला. दोन तीन शतकांपर्यंत ख्रिस्ती लोकांचा रोमन बादशाहानें छळ केला व पुष्कळांचा जीव घेतला. शेवटीं कान्स्टनटाईन

नांवाचा रोमन बादशाहा स्वतः ख्रिस्ती झाला व छळणूक बंद झाली. युरोपांत मूर्त्ति अगदीं नाहींशा झाल्या आहेत. प्राचीन काळच्या देवांचा आतां एकही भक्त राहिला नाहीं. केवळ त्यांच्या देवालयांचे जुने ढिगार मात्र राहिले आहेत. जगांत जीं सर्वांहून धनाढ्य, सर्वांहून सुधारलेलीं व सर्वांहून विद्याचारसंपन्न आणि ज्यांचें पाऊल सर्वांपेक्षां पुढें पडत चाललें आहे, अशीं जीं राष्ट्रें तीं ख्रिस्ती धर्मानुयायी आहेत. ग्लाडस्टन साहेब ह्मणतात, "ख्रिस्ती धर्म जगावर राज्य करितो." वाफेचें यंत्र, आगगाडी, तारायंत्र इ० ज्या युक्तींकडून मनुष्यांचें सुख वाढलें आहे, त्या ख्रिस्ती देशांमध्यें निघाल्या आहेत. हिंदु व मुसलमान राज्यें जुलमी व त्यांचीं राज्यें कायद्याच्या वर आहेत,(त्यांची इच्छा हाच कायदा); आपलीं राज्यें हीं आपली खासगत मालमत्ता आहे असें मानतात. यांस चौकशी केल्यावांचून आपल्या रयतेचा जीव घेतां येतो. ख्रिस्ती राष्ट्रांमध्यें प्रतिनिधि आणि कायदा हा राजे व अधिकारी ह्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे. ह्यावरून सर्वोत्कृष्ट सुधारणा ख्रिस्ती धर्मापासून उत्पन्न होते असें सिद्ध होत नाहीं कीं काय? ख्रिस्ती धर्म मनुष्यस्वभावास इतक्या उन्नतीस पोंचविण्यास समर्थ आहे कीं, आजपर्यंत तो स्वभाव त्याच्या साह्यावांचून तेथपर्यंत पोंहचला नाहीं. सुधारणेची कल्पना ख्रिस्ती धर्मापासूनच मनुष्यांस प्राप्त झाली आहे. जुन्या लोकांप्रमाणें चालावें हा हिंदु लोकांचा नियम

आहे. ह्या युगास ते कलियुग ह्मणतात. व यांत जगाची स्थिति अधिक बरी होण्यापेक्षां अधिकाधिक वाईट होईल असें त्यांचें मत आहे. चिनी लोकांची सुधारणा आज २००० वर्षांपासून जशीची तशीच थबकली आहे. महंमदी लोकांवर कुराणाचा अंमल चालत आहे. आणि त्याचा हुकूम मोडून तसूभर पुढें चालणें हें मोठें अधर्माचें काम मानिलें आहे. इंग्रज लोक ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याच्या अगोदर रानटी लोकांपेक्षां विशेष चांगले नव्हते, त्यांस लिपी नव्हती. आतां त्यांजमध्यें किती फरक पडला आहे. जगामध्यें हजारों वर्षांपासून जीं महादुःखें ह्मणजे लढाई, गुलामगिरी, अपराध, रोग व अज्ञान इ० वाढत आलीं आहेत. त्यांपासून मनुष्य जातीची सुटका करण्यास ख्रिस्ती धर्म मात्र एकटा दीर्घ व व्यवस्थित प्रयत्न करीत आहे. त्याच्यामध्यें अजून लढाया बंद झाल्या आहेत असें नाहीं. तथापि लढाईचें भयंकर व क्रूर रूप बदलून तें सौम्य झालें आहे. आणि सल्ला राखण्याची इच्छा वाढत चालली आहे. पुष्कळ प्रसंगीं लढाई टाळून तिऱ्हाईताच्या द्वारें कलह मिटले आहेत. "मनुष्यांचे पार्लिमेंतामध्यें व जगाच्या जुटीमध्यें, रणभेरी बंद होऊन व लढाईचा झेंडा गुंडाळला जाई तोंपर्यंत यत्न चालू राहतील."

गुलामगिरीचा व्यापार चहूंकडे बंद होण्याचा झटून प्रयत्न चालला आहे. तरुण अपराध्यांस सुधारण्याकरितां शाळा स्थापन झाल्या आहेत. कैद्यांस प्रामाणिकपणानें

आपला चरितार्थ चालवितां यावा ह्मणून त्यांस तुरुंगांत धंदे शिकवितात. डिस्पेनसऱ्या व इस्पितळें घातलीं आहेत. स्त्रियांस औषधोपचार करण्याकरितां लेडी डफरिन नांवाच्या सोसैटीसारख्या मंडळ्या स्थापिल्या आहेत. प्रत्येक मनुष्यास विद्या शिकण्याचा अधिकार आहे असें आतां मानिलें जात आहे. जीं सरकारें आपणांस ख्रिस्ती ह्मणवितात तीं मनुष्य जातीस मनुष्यपणांत आणण्यास, सुधारण्यास व त्यांस उन्नति प्राप्त करून देण्यास कमी जास्त उद्योग करीत आहेत.

ख्रिस्ती धर्म हाच मात्र सर्व जगांत आपला प्रसार होण्याकरितां मोठ्या बळानें प्रयत्न करीत आहे. त्याच्या स्थापकानें आपल्या शिष्यांस जी शेवटची आज्ञा दिली, ती जरी त्यांनीं कांहीं काळपर्यंत आवेशानें बजाविली, तरी मागाहून तिची उपेक्षा झाली, आणि केवळ अर्वाचीन काळांत मात्र ती आतां पाळूं लागले आहेत, आणि तीही पुरतेपणीं पाळली जात नाहीं. तथापि हजारों ख्रिस्ती मिशनरी जगभर पसरले आहेत. ज्यांत मिशन स्कूल नाहीं असें एकही मोठें गांव हिंदुस्थानांत क्वचित् असेल.

हिंदुस्थानांतील शिकलेल्या लोकांच्या विचारावर ख्रिस्ती धर्माचें मोठें वजन पडून चुकलें आहे. ख्रिस्ती धर्माचे कित्येक महत्वाचे सिद्धांत लोक खरे मानीत आहेत. सुशिक्षित हिंदु लोक जे एकदेवमत मानतात तें त्यांनीं ख्रिस्ती

धर्मापासून घेतलें आहे. हिंदुधर्मांत तर अनेकदेवमत व विश्वदेव ( वेदांत ) मत हीं दोन्हीं आहेत. तो धर्म आणखी असें शिकवितो कीं, मनुष्यांचे आत्मे अनुत्पन्न, स्वयंभू आणि अनादि आहेत. सुशिक्षित हिंदु लोक ईश्वर सर्व मानवजातीचा पिता आहे, व त्यानें आपणांस उत्पन्न केलें असें कबूल करितात. जातिभेद हा ईश्वरानें केला असें हिंदुधर्माचें मत आहे. आणि मनुष्यें ईश्वराच्या ठरावाप्रमाणें उंचनीच आहेत. ख्रिस्ती धर्माचा अणखी असा एक सिद्धांत आहे कीं, सर्व मनुष्यें परस्परांचे बंधु आहेत. ह्याही सिद्धांत बहुधा शिकलेले हिंदु लोक कबूल करितात. आतांच्या काळांत स्वार्थबुद्धीनें आपलेंच सुख व आपलेंच हित पूर्वीप्रमाणेंच न पाहतां सार्वजनिक कल्याण करण्याची लोकांस अधिक इच्छा उत्पन्न झाली आहे.

नीतिसंबंधी अधिक श्रेष्ठ कल्पनांचा प्रसार होत चालला आहे."समर्थास दोष नाहीं." ह्या ह्मणीच्या आधारावर हिंदु लोक आपल्या देवांचे दोष निवारण करूं पाहतात. हा तर्कवाद मिथ्या आहे असें शिकलेले हिंदु कबूल करितात. शेंकडों वर्षेंपर्यंत हिंदु लोकांच्या देवळांत भिंतींवर कोरलेलीं अतिशय बीभत्स चित्रें होतीं. त्यांच्या धर्मसंबंधी कृत्यांत वेश्या स्त्रिया उघड रीतीनें भाग घेत असत. ह्मणजे मूर्त्तिपुढें कळवंतिणींचा नाच वगैरे होत असे. त्याच्याविषयीं कोणी एक शब्दही बोलत नसत. हिंदूंच्या कित्येक जातींत लग्नाच्या

वेळीं मुलीच्या गळ्यांत वेश्येच्या हातून मंगलसूत्र बांधविण्याची चाल आहे. ह्या चालीची आतां कित्येक सुधारलेल्या हिंदु लोकांस लाज वाटून ते तिचा वर्त्तमानपत्रद्वारें खडसून निषेध करीत आहेत. सरकारच्या पिनलकोड नामक कायद्याच्या बुकांत कोणी बीभत्स पुस्तकें, चित्रें किंवा पुतळे विकायास मांडिलीं असतां किंवा दाखविण्यास ठेविलीं असतां त्यांस शिक्षा सांगितली आहे. परंतु धर्माच्या नांवानें असें करण्यास त्या कायद्याची परवानगी आहे. कित्येक सुशिक्षित हिंदु लोक खिस्ती धर्माचा प्रकाश पावून अशा प्रकारच्या ओंगळ चालींचा निषेध करूं लागले आहेत. हिंदु धर्माप्रामाणें स्त्रियांस धर्मशिक्षण देवूं नये, आणखी तिनें आपला भ्रतार हाच आपला देव आहे असें मानायास शिकविलें आहे. खिस्ती धर्माच्या वजनानें स्त्रीशिक्षणाचा प्रसार होत चालला आहे, आणि बहुत काळापासून स्त्रियांचे जे राजवी हक्क त्यांस नाकारिले होते ते जरी आतां त्यांच्या पदरीं पडले नाहींत, तरी ते आतां कबूल केले जात आहेत.

यूरोप खंडांत रोमन सरकाराकडून पराकाष्ठेचा अडथळा होत असतांही जें धर्मांतर झालें, तसेंच हिंदुस्थानांतही होईल. युरोपांत ज्युपितर व मिनरवा ह्यांचीं देवळें जशीं ओस पडलीं तशींच शिव आणि विष्णु ह्यांचींही पडतील. पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील आर्य लोक एकाच पादासनापुढें गुडघे टेंकून आणि "आमच्या स्वर्गस्थ पित्या"

असे शब्द जिच्या आरंभीं आहेत ती जुनी प्रार्थना ह्मणतील.

हा पालट केव्हां होईल हें सांगवत नाहीं. यूरोपांत मूर्तिपूजक धर्माचा मोड होण्यास तीनशें वर्षे लागलीं, आणि तितकींच कदाचित् अर्वाचीन हिंदुस्थानांत लागतील. तथापि प्रकाश उत्तरोत्तर पसरत चालला आहे, आणि कदाचित् फार त्वरेनें सुधारणा होईल.

## २३. ख्रिस्ती धर्माविषयीं साक्षी.

"Testimonies of Great Men to the Bible and Christianity" ह्या नांवाच्या पुस्तकांत मोठमोठे नामांकित पुरुषांनीं दिलेल्या पुष्कळ साक्षी आहेत. त्यांतून फार थोड्या एथें सांगतों.

ग्लाडस्टन साहेब जे मोठे राजकार्य धुरंधर प्रख्यात पुरुष आहेत ते असें ह्मणतात कीं:—

"गेल्या पंधराशें वर्षांत ख्रिस्ती धर्म सर्व प्रकारची मानवी सुधारणा व उन्नति यांच्या अग्रभागीं चालत आला आहे आणि मनुष्यजातींत जें कांहीं उत्तम व तेजस्वी आहे त्याकडून आपला रथ सज्ज केला आहे."

"ख्रिस्ती धर्म पूर्वीं जो काय होता तोच आतां आहे; मानवी स्वभावाच्या रोगावर तो मोठें औषध, आणि त्याच्या दुःखाचें मोठें सांत्वन, त्यांच्या अशक्तपणास मोठा

टेंका, ह्या जगदरण्यांतून वाट दाखवून देणारा असा मुख्य व एकच आणि पूर्ण मार्गदर्शक असा तो आहे."

हे गृहस्थ आपल्या स्वतःच्या विश्वासाविषयीं असें ह्मणतात कीं:—

"जें कांहीं मी लिहितों, जें कांहीं मी चिंतितों, ज्या कोणत्याही गोष्टीची मला आशा आहे, त्या सर्वांस आमच्या प्रभूच्या देवत्वाचा आधार आहे, तोच आह्मा बिचाऱ्या मानवजातीची केवळ मुख्य आशा आहे."

लेकी नांवाचा एक ग्रंथकार, युरोपाच्या नीतीचा इतिहास नामक आपल्या ग्रंथांत, ख्रिस्ती धर्माच्या फळाविषयीं पुढील साक्षी देतो:—

"अठराशें वर्षांमध्यें जे कांहीं फेरफार झाले, त्यांत मनुष्यांच्या अंतःकरणांत आवेशयुक्त प्रीति ज्यानें घातली, आणि सर्व युगें, देहस्वभाव, आणि स्थिति, यांजवर आपली क्रिया चालविण्यास आपण शक्तिमान आहे, असें ज्यानें दाखविलें, आणि जो सद्गुणांचा केवळ उत्तम नमुना होता, इतकेंच नाहीं, तर ते आचरण्यास अत्यंत बलवत्तर, उत्तेजक, आणि ज्यानें आपलें इतकें मोठें वजन चालविलें, तीन वर्षांचें जें उद्योगभरित जीवनचरित्र त्याकडून मनुष्यजातीचें पुनरुज्जीवन देऊन त्याला सौम्य करण्यास सर्व तत्वज्ञान्यांचे वाद व नीतिवेत्यांचे बोध यांपेक्षां ज्यानें अधिक केलें, असा पुरुष उत्पन्न होणें हें ख्रिस्ती धर्मासाठींच ठेवलें

होतें. ( असा पुरुष केवळ ख्रिस्ती धर्मासाठींच उत्पन्न झाला. )."

मकॉले नांवाचा प्रसिद्ध विद्वान ग्रंथकार पार्लमेंटामध्यें एकदां भाषण करितेवेळेस असें बोलला कीं," ख्रिस्ती धर्मानें न्याय, दया, आणि स्वतंत्रता, कलाकौशल्यें, विद्या, सुराज्य आणि गृहसुख यांची बहुत वृद्धि केली आहे. त्यानें गुलामाच्या बेड्या तोडिल्या आहेत, युद्धसंबंधी भयंकर दुःखें शमन केलीं आहेत, त्यानें स्त्रियांस दासीच्या व खेळवण्याच्या नीच स्थितींतून काढून सोबतीणी व मैत्रिणी केल्या आहेत." त्याचा हिरमोड करणें हा "मनुष्यजात व सुधारणा ह्यांच्याविरुद्ध फितुर करणें असा आहे."

ख्रिस्ती धर्माचे तो आणखी असें गुणलक्षण सांगतो कीं,

"त्याचें प्रौढ तत्वज्ञान दृढ आहे, त्याची निष्कलंक नीति तशीच आहे, त्याचीं अंतरबाह्य प्रमाणें हीं बळकट आहेत, त्यांस अत्यंत श्रेष्ठ आणि व्यापक बुद्धीचे मनुष्यांस देखील वश व्हावें लागतें."

इंग्लंड आणि अमेरिका एथील नास्तिक आपल्या देशांत ख्रिस्ती धर्माचा क्षय होत आहे असें हिंदु लोकांस भासविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु वास्तविक पाहतां त्याला सांप्रतकाळीं जसें जोर आहे, तसें पूर्वी कधीं नव्हतें. ह्या गोष्टीचें प्रमाण हिंदु लोकांच्या दृष्टीपुढें आहे. प्रत्येक वृद्ध हिंदूस ठाऊक आहे कीं, त्याच्या लहानपणीं

जितके ख्रिस्ती मिशनेरी ह्या देशांत होते त्यांच्यापेक्षां अधिक आतां आहेत. युनाईटेड स्टेटस्‌मध्यें एकंदरींत १७ ख्रिस्ती देवळें दररोज बांधिलीं जातात. मिशनेरी लोकांस केवळ हिंदुस्थानांत पाठवितात असें नाहीं, तर जेथें कोठें त्यांचा रीघ होण्यासारखा आहे, अशा जगाच्या सर्व भागांत पाठवितात.

## २४. उपसंहार.

हिंदुस्थानांतील लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा खऱ्या मनानें स्वीकार केल्यास त्यांस कोणकोणतीं सुखें प्राप्त होतील हें थोडक्यांत ह्या पुस्तकांत दर्शविलें आहे. आरोग्य आणि दीर्घायुष्य हीं वाढतील; सुज्ञानाचा प्रसार होईल; हिंदुस्थान जगांतील राष्ट्रांमध्यें उंचपद पावेल. लोकांस सामाजिक व धर्मसंबंधी स्वतंत्रतेचा उपभोग घेण्यास मिळेल; मनुष्य-जातीचें बंधुत्व कबूल केलें जाईल; मनुष्यांमध्यें न्यायाची वृद्धि होईल; सामाजिक सुधारणेस येणारे अडथळे बंद हो-तील. मनुष्यजातीचें दुःख कमी होऊन सुख वाढेल, स्त्रियांस त्यांचें योग्य पद प्राप्त होईल; मूर्त्तिपूजा आणि भक्तीचे दुसरे नीचत्व आणणारे सर्व प्रकार लयास जातील. परम पूज्य असा जो एकच देव त्याचीच मात्र भक्ति चालू होईल; पापाची खरी क्षमा प्राप्त होईल; पवित्र आचरणाची वृद्धि होईल; जन्मभर जीं मिथ्या भयें बाळगावीं लागतात

त्यांपासून सुटका होऊन अंतकाळाची गौरव आशा प्राप्त होईल; खरे ख्रिस्ती सकल जगताच्या प्रभूचे दत्तक पुत्र व कन्या होऊन उत्तरोत्तर त्यासारिखे होत जाऊन त्याच्या चिरकालिक सुखाचे विभागी होतील.

ख्रिस्ती शास्त्र वास्तविक असें सांगतें कीं," सुभक्ति सर्व गोष्टींविषयीं लाभदायक आहे." तिला इहजन्माचें वचनः "कां कीं शरिराची कसरत थोडी उपयोगी आहे,पण सुभक्ति अवघ्यांविषयीं उपयोगीं आहे, तिला सांप्रतच्या व होणाऱ्याही जीवनाचें वचन आहे."

ख्रिस्ती धर्माकडून हिंदु लोकांचें इहलोकीं व परलोकीं कल्याण होईल. परंतु त्याच्या स्वधर्माचें फळ ह्या सर्व गोष्टीं-च्या विरुद्ध आहे.

## एकराष्ट्रीय धर्म.

कित्येक सुशिक्षित हिंदु लोक आपणास एक राष्ट्रीय धर्म असावा ह्मणून ओरड करीत आहेत. हिंदुस्थानानें स्वधर्म त्याग करून परधर्म स्वीकारावा ह्यांत नीचपण आहे असें त्यांस वाटतें.

हिंदु लोकांत राष्ट्रीय भूगोलविद्या, रसायन शास्त्र, भूमि-ती इत्यादि नाहींत, हें आह्मीं मागें दर्शविलेंच आहें. विद्या ह्मटली असतां सर्व जगांत सारखीच आहे. तसेंच धर्मावि-षयींही आहे. प्रत्येक देशाचा जर निरनिराळा ईश्वर

असता तर धर्मही भिन्नभिन्न असते; परंतु सकल सृष्टीचा उत्पन्नकर्त्ता, रक्षणकर्त्ता, शास्ता असा एकच परमेश्वर आहे. याविषयीं सर्व सुशिक्षित लोकांचें एकच मत आहे. त्याचप्रमाणें मनुष्य जातीचें बंधुत्वही कबूल करितात.

ज्याअर्थी देव एक आहे आणि सर्व मनुष्यें त्याचीं समान लेंकरें आहेत, त्याअर्थी त्यानें एकच धर्म दिला असावा असें मानणें सुयुक्तिक आहे. राष्ट्रीय धर्म हा खरा धर्म नाहीं असें दिसून येतें.

यूरोप आणि अमेरिका यांतील अत्यंत विद्याचारसंपन्न राष्ट्रांनीं एशिया खंडांतील लोकांनीं जो धर्म त्यांस प्रथम कळविला, तो स्वीकारिला, आणि "आह्मांस राष्ट्रीय धर्म पाहिजे" असें खोट्या स्वदेशाभिमानानें ह्मणून तो नाकारिला नाहीं.

हिंदुस्थानांतील एक कवि असें ह्मणतो कीं, "जो रोग तुझ्याबरोबर जन्मला आहे तो तुझा नाश करील. जें औषध डोंगरांत असून तुझ्याबरोबर जन्मलें नाहीं तें तुला बरें करील."

खोट्या स्वदेशाभिमानाचे जे सर्व प्रकार आहेत त्यांत जो प्रकार भ्रामक धर्ममतें राष्ट्रीय आहेत ह्मणून तीं खरीं आहेत अशा आभास वादानें त्यांचें प्रतिपादन करूं पाहतो. तो सर्वांहून अत्यंत वाईट आहे. असे जे ह्मणणारे आहेत त्यांच्यामध्यें तेणेंकरून ढोंग व सत्याविषयींची उपेक्षा हीं उत्पन्न

होतात, आणि ते आपल्या देशबांधवांचा मोठा अन्याय करितात. तेणेंकरून धर्मसंबंधी अत्याचाराचें राज्य सदोदित चालण्याची प्रवृत्ति होते.

## हिंदुस्थानचा भावी धर्म.

हिंदुधर्माचा हिंदु लोकांच्या मनावर दृढ ग्रह आहे हें तर कबूल केलें पाहिजे. लोकांच्या मोठ्या भागाचें मन इतकें अशक्त झालें आहे कीं, अत्यंत परस्पर विरुद्ध व अत्यंत विस्मयकारक चमत्कार यांजवर कांहीं संशय न बाळगितां विश्वास ठेवितात. सर मॉनियर विलियम्स हे वास्तविक असें ह्मणतात कीं, "पदार्थविज्ञानसंबंधी, मानसिक विद्यासंबंधी तर्क स्पष्ट रीतीनें जितके बुद्धीला विरुद्ध असतील तितके ते कित्येक हिंदु चिंतकांस अधिक ग्राह्य आहेत." साधारण नियम असा आहे कीं, हिंदु लोक जातींच्या बेड्यांस बिळगून राहतात.; त्यांचे देव तर त्यांच्या मनासारखेच आहेत."

ख्रिस्ती धर्म खेरीज करून इतर सर्व धर्मांप्रमाणें हिंदुधर्म मनुष्य स्वभावास आवडता असा जो गर्व त्यापाशीं आपला वाद नेतो. मनुष्य आपणाला आपलाच तारणारा करून घ्यावयास इच्छितो. हिंदु मनुष्य स्वपुण्य ह्मणजे त्यानें जें संपादन केलेलें सत्कर्माचें फळ त्याखेरीज दुसऱ्या कशावरही आपल्या तारणासाठीं विश्वास ठेवण्यास मान्य होत नाहीं. आपल्या हातून कांहीं वाईट कर्मे घडलीं आहेत असें तो

कबूल करितो हें खरें आहे. परंतु तीं आपल्या दानधर्मादि कृत्यांकडून समतोल होतात असें त्यास वाटतें. एका हिंदी कवितेंत असें ह्मटलें आहे कीं, मनुष्य ऐरण चोरतो आणि सुई दान देतो. अशीं कर्में करून स्वर्गाचें विमान येऊन आपणास घेऊन जाईल अशी तो वाट पाहतो. मराठी अशी एक ह्मण आहे कीं, "गाजराची तुला आणि विमानाची वाट."

वर सांगितलेल्या गोष्टी लोकांस साधारणतः लागू आहेत. सुशिक्षित हिंदु लोकांविषयीं कित्येक उत्तम अपवाद खेरीज करून, कांहीं विशेष आशा बाळगण्याचें कारण दिसत नाहीं. पन्नास वर्षांमागें लिहून ठेविलेलें पुढील वर्णन थोडके लोकांस लागू आहे असें नाहीं:—

"त्यांस मूर्त्तिपूजेचा द्वेष आहे असें कांहीं ते दाखवीत नाहींत, तिच्या बंधनांतून आपल्या देशबांधवांची सुटका करण्याची त्यांस काळजी आहे असें दिसून येत नाहीं. त्यांच्यांत कांहीं उंच नीतीचें वर्त्तन दिसून येत नाहीं. अथवा त्यांत कांहीं थोर विषयांकडे त्यांचें लक्ष किंवा त्यांस कांहीं त्याची उमेद आहे असेंही दिसत नाहीं; त्यांचें मन गंभीर असतें किंवा ते धर्मसंबंधी सत्याविषयीं विचारपूर्वक शोध करितात असेंही नाहीं. त्यांतून बहुतेक असे आहेत कीं, ज्या मूर्त्तिपूजेचा ते आंतून धिःकार करि-

तात तिला ते आपल्या तारुण्याच्या भरांत व लहरींत बाहेरून मान देऊन आपला विवेक मारून टाकितात, अथवा जाणून बुजून ते प्रपंचासक्त होतात. त्यांच्या मानासिक व्यापारांत निरोगी जीव नसतो. ज्या संकर वर्गाविषयीं आह्मी लिहीत आहों, त्या वर्गांतील लोक ज्या गोष्टीचा ते धिःकार करितात, व जिच्यावर त्यांचा विश्वास नसतो तिजपासून आपली सुटका करून घेण्यास त्यांस धैर्य नसतें. ते पूर्वकालच्या लोवर एम्पायर नामक ग्रीक राज्यांतील लोकांप्रमाणें धूर्त व श्रद्धाहीन, धैर्यहीन व विवेकशून्य अशा प्रकारचें आचरण जन्मभर करितात, आणि कित्येक तर वरून मूर्त्तिपूजकाचें वस्त्र पांघरून आंतून नास्तिकाचें मन बाळगून वागतात."

दुसऱ्या पक्षीं कित्येक उत्तेजनदायक गोष्टी आहेत. "सत्य जय पावतें." ही हिंदुस्थानांतील ह्मण आह्मी वर उतरून घेतलीच आहे. हिंदुस्थानावर सांप्रतकालीं जो अज्ञानांधकार पसरला आहे त्याचें सत्यज्ञानप्रकाशाकडून उत्तरोत्तर निरसन होईल. सुशिक्षित हिंदु लोकांनीं ख्रिस्ती धर्मांतून फार महत्वाची धर्मसंबंधी सत्यता घेतल्या आहेत हें मागें आह्मीं दाखविलेंच आहे.

हिंदुस्थानांत वीस लक्षांहून जास्ती मनुष्यें ख्रिस्ती धर्मानुयायी झाले आहेत. त्यांतून कित्येक फार बुद्धिवान आहेत. राष्ट्रीय सभेच्या मोठ्या वक्त्यांपैकीं एक सभासद ख्रिस्ती गृहस्थ आहे. कालेंकरून हिंदुस्थानामध्यें लूथर उत्पन्न

होतील; आणि ख्रिस्ती धर्माच्या पक्षाची मोठी हालचाल होईल. ख्रिस्ती शास्त्रांत एक असें भविष्य आहे कीं, "ढगाप्रमाणें आणि खबुत्रें जशीं आपल्या खिडक्यांकडे उडतात त्याप्रमाणें उडत जाणारे हे कोण आहेत?" त्याकडून असें सुचाविलें जातें कीं, पुष्कळ लोकसमुदाय एकदम ख्रिस्ती होतील.

राष्ट्रीय गुणलक्षणांचें मोठें वजन आहे असें मागें दाखविलेंच आहे. इंग्लिश लोक मोठे साहसी, दीर्घ प्रयत्नी, आणि एकंदरीनें सत्यशील व न्यायी आहेत, तरी असेंही कबूल करावें लागतें कीं, त्यांच्या धर्मस्थापकांमध्यें सौम्यता व प्रीति हे जे वर्णनीय गुण होते ते ह्यांच्यांत कमी आहेत. हिंदु लोक जेव्हां ख्रिस्ती धर्म स्वीकारतील, तेव्हां काळानुक्रमानें ख्रिस्ती धर्माचें जें विशेष प्रीतियुक्त प्रतिरूप तें ते प्रगट करतील.

हिंदुस्थान इंग्लंदाप्रमाणें आपलें अनेक देवमत, मूर्तिपूजा व विश्वदेवमत हीं सोडून देईल. ही गोष्ट केव्हां घडेल हें जरी सांगवत नाहीं तरी ती निश्चयेंकरून घडेलच यांत संशय नाहीं. त्याकाळीं हिंदुस्थान देवळांनीं भरेल परंतु तीं देवळें खऱ्या देवाच्या भक्तीचीं होतील. त्यांत भक्तजनांची दाटी होईल, परंतु ते ईश्वराची भक्ति आत्म्यानें व सत्यतेनें करितील. त्याचे राजमार्ग यात्रेकऱ्यांनीं भरून जातील, परंतु ते स्वर्गास जाणारे यात्रेकरी होतील. मूर्तींच्या नांवांचा गजर करण्याबद्दल ईश्वराच्या व तारकाच्या स्तुतिपर गायनांचा मंजूळ स्वर निघत जाईल.

असा गौरवयुक्त काल त्वरेनें येऊन पोंचावा ह्मणून जे यत्न करितात ते धन्य होत; परंतु जें प्रस्तुतचें अति भक्तीचें राज्य सदोदित राहण्यासाठीं प्रयत्न करितात, त्यांचा परिणाम वाईट होईल.

शेवटीं ग्रंथकर्त्ता ईश्वराची ही पुढील प्रार्थना करितो व वाचकांनींही तिला मनापासून तथास्तु ह्मणावें अशी त्याची इच्छा आहे.

"हे परमेश्वरा, ज्या त्वां पृथ्वीवर राहण्याकरितां सर्व मनुष्यें एका रक्ताची उत्पन्न केलीस, आणि जे जवळचे व दूरचे त्यांस शांतीचा उपदेश करण्यास आपला पुत्र पाठविलास, तो तूं असें कर कीं, ह्या देशांतील सर्व लोकांनीं तुला शोधावें व पावावें. आणि हे स्वर्गीय पित्या, तुझें वचन पूर्ण करण्याविषयीं त्वरा कर, ह्मणजे सर्व मनुष्यजातीवर तुझा आत्मा ओत, आमचा तारणारा **प्रभु येशू ख्रिस्त** ह्याच्या नांवानें हें मागतों. आमेन.

समाप्त.

# मराठी गोष्टींचीं पुस्तकें.

## लहान मुलांकरितां.

एका ब्राह्मणाची गोष्ट किं० १ पै.
लंकेतील मुलीची गोष्ट. किं० १ पै.
मुलाची जन्मपत्रिका किं० १ पै.
पहिल्या भावांची गोष्ट. किं० १ पै.
पहिल्या मनुष्याची गोष्ट. किं० १ पै.
कारंजें आणि ढग..... किं० १ पै.
महापुराची गोष्ट. .. किं० १ पै.
कोंबडी आणि तिचीं पिलें. किं० १ पै.
राजपुत्र कसें व्हावें... किं० १ पै.
राजाच्या पुत्राची गोष्ट. किं० १ पै.
सूर्यप्रकाश. ... किं० १ पै.
लहान तुकाराम. .... किं० १ पै.
आंब्याची गोष्ट. ... किं० १ पै.
सर्वांत प्राचीन भाषा. किं० १ पै.
मोत्यांचा व्यापारी. . किं० १ पै.
भांडखोर बायकांची गोष्ट किं० १ पै.
राणीची गोष्ट. ... किं० १ पै.
राजा व त्याचे सेवक. किं० १ पै.
तांबड्या फळांची गोष्ट. किं० १ पै.
भयंकर तांबडा खुजा मनुष्य. किं० १ पै.
तरुण ब्राह्मण शेष आचार्य. किं० १ पै.
मुलगा आणि आई ह्यांची गोष्ट. किं० १ पै.
रामभटजींची गोष्ट. किं० १ पै.
लांडग्याची गोष्ट.... किं० १ पै.
मोठा चमत्कार, महारोगी बरा झाला. किं० १ पै.
तरुण राजाची गोष्ट. किं० १ पै.
सत्यार्थ जीव देणारे मुलगे. किं० १ पै.
सोन्याचें आमंत्रण. किं० १ पै.
बंडवाल्याची गोष्ट.... किं० १ पै.

## २. तरुण वाचकांकरितां मराठी पुस्तकें.

मुलांच्या गोष्टी.... किं० १ पैसा.
इंग्लंड देशाची प्राचीन स्थिति. ... किं० १ पैसा.
गोष्टींचा हार. ... किं० १ पैसा.
हसन चोर याची गोष्ट. किं० १ पैसा.
न्यायी सरदार.... किं० १ पैसा.

गोष्टींची कंठी.... किं० १ पैसा.
चित्रें आणि गोष्टी. किं० १ पैसा.
अमोलिक ठेवा..... किं० १ पैसा.
आगगाडी. ... किं० १ पैसा.
विद्यार्थ्यांच्या गोष्टी. किं० १ पैसा.
मोत्यांची माला....किं० १ पैसा.
विलायत अल्ली ह्याची गोष्ट. किं० १ पैसा.
चमत्कारिक औषध. किं० १ पैसा.
गोष्टींचा गजरा. भाग १ ला. किं० १ पैसा.
गोष्टींचा गजरा भाग २ रा. किं० १ पैसा.
आशीर्वादांचीं आठ मोत्यें. किं० २ पैसे.
फुलें आणि फळें. किं० २ पैसे.
शूर जयसिंग. .... किं० २ पैसे.
सत्य अवताराचा वृत्तांत. किं० ९ पै.
काशीस जाणारे दोन यात्रेकरू. किं० ९ पै.
बोधपर गोष्टी. ... किं० ९ पै.
प्रेमदास सोनार ह्याची गोष्ट. किं० ९ पै.
प्रभूची प्रार्थना, आज्ञा व ओंव्या. किं० १ पैसा.

## ३. हिंदु आईबापांकरितां मराठी पुस्तकें.

बालजन्म. ... किं० २ आणे.
लहान मुलांचें आरोग्य. किं० २॥ आणे.
मुलांचें गृहशिक्षण. किं० २॥ आणे.

## ४. स्त्रियांकरितां सुंदर सचित्र मराठी पुस्तकें.

देवाचा मित्र आब्राहाम ह्याची गोष्ट. ... किं० १ पैसा.
गुलाम मुख्य प्रधान झाल्याची गोष्ट. .... किं० १ पैसा.
पाण्यांतून बाहेर काढिलेल्या मुलाची गोष्ट. किं० १ पैसा.
एक विधवा व तिची सून ह्याची गोष्ट. किं० १ पैसा.
राक्षसरूपी मनुष्यास ठार मारणाऱ्या दाविदाची गोष्ट. किं० १ पैसा.
दासी करून नेलेल्या एका लहान मुलीची गोष्ट. किं० १ पैसा.
इराण देशाच्या वजिराची गोष्ट. ... किं० १ पैसा.
एस्तेर राणीची गोष्ट. किं० १ पैसा.

पुरातन गोष्टी व चित्रें. किं० २ आणे.
मुलींच्या गोष्टी. किं० १ आणा.
विधवा आणि पवित्र शास्त्र.
किं० ९ पै.
थोर स्त्रियांचीं चित्रें व चरित्रें.
किं० ४ आणे.

## रंगित चित्रांचीं पुस्तकें.

सद्गुणी सून आणि तिची सासू किंवा रूथ आणि नामी ह्यांची गोष्ट.... किं० ४ आणे.
पट्टराणी एस्तेर... किं० ४ आणे.

---

## ८. हिंदुस्थानांतील सुधारणेकरितां मराठी पुस्तकें.

लहानपणीं लग्न करणें. किं० १ पैसा.
ग्रह ह्मणजे काय? किं० १ पैसा.
ग्रहणें कशीं होतात? किं० १ पैसा.
मुहूर्त्त ज्योतिष. किं० २ पैसे.
भगवद्गीता शास्त्रमतपरीक्षा.
किं० २ पैसे.
मानवधर्मशास्त्र. ....किं० २ पैसे.
वेद कोणी लिहिले? किं० २ पैसे.
पटकी आणि आंतड्यांतले विकार. ... किं० १ पैसा.
ताप.... .. किं० १ पैसा.
तान्ह्या लेंकरांची जोगवण.
किं० २ पैसे.
हिंदुस्थानाच्या दारिद्र्यांचीं कारणें. ... किं० २ पैसे.
नवऱ्याचें बायकोशीं कर्त्तव्य.
किं० २ पैसे.
हिंदु लोकांच्या यात्रा. किं० २ पैसे.
वैदिक हिंदुधर्म. किं० ३ आणे.
हिंदु वाचकांकरितां ख्रिस्ती धर्माचें स्पष्टीकरण. किं० २ आणे.
नाकाचा उपयोग काय? किंवा स्वच्छतेपासून फायदे.
किं० १ पैसा.
हिंदु भक्ति आणि ख्रिस्ती भक्ति यांची तुलना. किं० २ पैसे.
कर्ज व कर्जमुक्त कसें व्हावें.
किं० २ पैसे.
खरा व खोटा दानधर्म.
किं० २ पैसे.
जादूटोणा, मंत्रतंत्र व देवभोळेपणाचे दुसरे प्रकार.
किं० २ पैसे.
खुणेचे दोन शब्द: रूढि व सुधारणा. ... किं० २ पैसे.
शुद्ध पाण्याची योग्यता.
किं० २ पैसे.
वेदधर्मी लोकांचा वृत्तांत.
किं० १ आणा.

---

## ६. अनेक प्रकारचीं मराठी पुस्तकें.

### खालीं दिलेल्या पुस्तकांपैकीं कित्येकांत सुंदर चित्रें घातलीं आहेत.

मुलांकरितां चित्रांचें पुस्तक. किं० १ आणा.
मुलांकरितां बोधपर गोष्टी. किं० १ आणा.
विद्यार्थी. ... किं० १ आणा.
"देवाचीं मुलें." सावकाराचीं कुळें. ... किं० १ आणा.
प्राचीन काळचीं प्रसिद्ध मुलें. किं० १॥ आणा.
सृष्टचमत्कार. किं० १॥ आणा.
जनरल गारफील्ड. किं० २ आणे.
प्राचीन ख्रिस्ती इतिहासांतील गोष्टी. ... किं० २ आणे.
युरोपांत गेलेला पहिला मिशनेरी : किंवा पौलस प्रेषिताचें चरित्र. ... किं० २ आणे.
खरा जपानी स्वदेशभक्त नीसिमा याचें चरित्र. किं० २ आणे.
सर्प, सुसरी व इतर सरपटणारे प्राणी. किं० २ आणे.
हिंदुस्थानांतल्या कल्पित गोष्टी. किं० २ आणे.
स्त्रियांकरितां दाखले व गोष्टी. किं० ३ आणे.
तरुणाचा मित्र. किं० ३ आणे.
तरुणाचा मित्र. (क्लॉथ बाइंडिंग) किं० ४ आणे.
पक्ष्यांच्या गोष्टी व चित्रें. किं० २ आणे.
मुलांकरितां गोष्टी व चित्रें. किं० २ आणे.
वनपशूंच्या गोष्टी व चित्रें. किं० २ आणे.
निवडक गोष्टी व चित्रें. किं० २ आणे.
कृष्ण. ... किं० ॥ आणा.
मुलांस शिक्षण कसें द्यावें. किं० ॥ आणा.
रोगांचीं कल्पित व खरीं कारणें. किं० ॥ आणा.
मुलें निरोगी कशीं राखावीं. किं० ॥ आणा.
स्वच्छतेचें महत्व. किं० ॥ आणा.
हिंदुस्थानांत हिंदु धर्माचीं फळें. किं० ॥ आणा.
निरनिराळ्या देशांतील गोष्टी व चित्रें. ... किं० ४ आणे.
इंग्लिश लोकांच्या गृहस्थितीचें सचित्र वर्णन. किं० ३ आणे.

हीं पुस्तकें मुंबई येथें ट्राक्ट सोसैटीच्या दुकानांत विकत मिळतील.